
किंमत १ रुपया
( वा. वर्गणी ६ रु. )

Reg. No. B. 3434
Licence No. 53.
**Licenced to post without prepayment**

# अर्थ

नोव्हेंबर १९६४

दिवाळी विशेषांक






साखर-विचार :

भारतीय सैन्याची सरहद्दीवरील युद्ध आघाडीची मजबुती वाढविण्याकरितां भारतांतील शेतकरी व कामगार यांनीं

उत्पादन आघाडीवर दिवस-रात्र झटलें पाहिजे हें लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून

—: सहकारी तत्त्वावर संघटित झालेला :—

शेतकऱ्यांच्या मालकीचा पहिला साखर कारखाना

## दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.

मुंबई ऑफिस :
सर विठ्ठलदास चेंबर्स,
१६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
टेलिफोन नं. २५२५३४

स्थापना : सन १९३२
तारेचा पत्ता :—
" माळीशुगर "
माळीनगर व मुंबई

रजिस्टर्ड ऑफिस :
माळीनगर, जि. सोलापूर
टेलिफोन नं. २१

दिवाळी आणि नूतन वर्षानिमित्त

सर्व भारतवासीयांचें अभीष्टचिंतन करीत आहे.

श्री. भ. मा. जाधव
चेअरमन

श्री. ह. व. गिरमे
मॅनेजिंग डायरेक्टर

संचालक मंडळ

श्री. शं. भा. राऊत
रा. व. ना. सो. बोरावके
श्री. मा. खं. पांढरे
श्री. पं. ह. गिरमे
श्री. भ. गे. गिरमे
श्री. ज. ग. रासकर
श्री. कृ. ल. गिरमे

# श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.

गंगानगर–इचलकरंजी ( जि. कोल्हापूर )

★ १९६३–६४ हंगामांत २,२५,००० पोतीं साखरेचें उत्पादन केलें असून ता. २६ ऑक्टोबर १९६४ रोजीं सन १९६४–६५ च्या ६ व्या गळीत हंगामास शुभारंभ केला आहे.

★ सुमारें १ कोटी रुपये खर्चाच्या लिफ्ट इरिगेशन योजना कार्यान्वित होत आहेत. त्यामुळें २४ हजार एकर जमीन पाण्याखाली येईल.

★ खेड्यापाड्यांतील जोड रस्ते व पाणंद रस्ते बांधणीचा रु. तीन लाखांचा कार्यक्रम हातीं घेतला आहे.

★ या भागाची सर्वांगीण उन्नति होणेचे दृष्टीनें आनुषंगिक उद्योगधंदे व बहुविध विकास कामें हातीं घेणेंत आलीं आहेत.

★ संस्थेचे चेअरमन आमदार श्री. रत्नाप्पा कुंभार इतर सहकाऱ्यांबरोबर सुमारें १२ कोटी रुपये भांडवलाचा सहकारी कागद कारखाना उभारण्याच्या दृष्टीनें पाहणी करण्यासाठी जागतिक दौऱ्यावर गेले आहेत.

★ नूतन वर्ष व दीपावली सर्वांना सुखदायी होवो !

बी. एन. गरगटे, मॅनेजिंग डायरेक्टर. एम. व्ही. सुलतानपुरे, व्हा. चेअरमन. रत्नाप्पा कुंभार, चेअरमन



"संस्थेच्या स्थापनेपासून सतत "अ" वर्गात असलेली कोल्हापुरांतील एकमेव नागरी सहकारी बँक"

# श्री महालक्ष्मी

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

[ स्थापना १९३१ इ. ]

मुख्य कार्यालय : बँक इमारत १६७–बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर, दूरध्वनि क्रमांक २३७

शाखा कार्यालय : २३२५–१ सी र. शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर दूरध्वनि क्रमांक ७०४

| | |
|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. २,००,००० |
| खपलेलें भाग भांडवल | रु. १,९९,९९५ |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २,४१,३९१ |
| ठेवी | रु. ४१ ५६,६६२ |
| सभासद | ४,७०४ |
| कर्जें | रु. २६,४०,३३० |
| खेळतें भांडवल | रु. ४८,४१,७३२ |

इतर कांहीं ठळक वैशिष्ट्यें :—

१. जनतेच्या सोईसाठी व त्यांच्या बहुमोल वस्तु व कागदपत्र सुरक्षित ठेवणेंसाठी बँकेनें आपल्या अद्ययावत् इमारतीच्या तळघरांत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय केलेली आहे.
२. आकर्षक व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.
३. उद्योगधंद्यांना व व्यापाऱ्यांना कर्जपुरवठा केला जातो.
४. अल्प कमिशनवर मुंबई, पुणें, सांगली, बेळगांव व महाराष्ट्रांतील इतर शहरांतील सहकारी बँकेवरील चेक्स विकत दिले जातात.

श्री. गो. बा. कुलकर्णी, इन्-चार्ज मॅनेजर. श्री. य. वि. शिराळकर, बी. ए., एलएल. बी., अॅडव्होकेट. प्रेसिडेंट.



# पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन

## सर्व्हंटस् को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें

स्थापना १९१४] ७३, बुधवार पेठ, पुणें २ [फोन नं. ५७१५६

। एकमेकां साह्य करूं अवघे धरूं सुपंथ ।

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल शेअर भांडवल | रु. ३,५८,६०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. १,२६,४०० |
| ठेवी | रु. ३३,४५,००० |
| इन्व्हेस्टमेन्टस् | रु. ३,७२,८०० |
| खेळतें भांडवल | रु. ३९,६०,००० |

*बँकेच्या ठेवींचे व्याजाचे दर खालीलप्रमाणें आहेत.*

सेव्हिंग्ज :—दरसाल दरशेंकडा तीन टक्के.

चालू :—दरसाल दरशेंकडा एक टक्का.

कायम ठेव :—एक वर्ष चार टक्के. दोन वर्षे सव्वाचार टक्के. तीन वर्षे साडेचार टक्के. चार वर्षे पावणेपांच व पांच वर्षे पांच.

रिकरिंग डिपॉझिट :—दरसाल दरशेंकडा तीन ते चार टक्के.

अधिक माहितीसाठी कृपया समक्ष भेटावें.

बँकेनें फडतरे चौक, पुणें, या शहराच्या मध्यवर्ती ठिकाणीं भव्य इमारत बांधण्याचा कार्यक्रम हातीं घेतला आहे.

फेब्रुवारी १९६४ मध्यें ना. यशवंतराव चव्हाण, भारताचे संरक्षणमंत्री यांचे शुभ हस्तें बँकेचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यांत आला.

ना. कृ. कुलकर्णी, मॅनेजर. स. ग. मिसाळ, कार्याध्यक्ष. द. ना. कुंभार, अध्यक्ष.



ही दीपावली आमच्या बँकेचे सभासद, ठेवीदार आणि हितचिंतक यांना सुखाची व भरभराटीची जावो!

सेवा, सहकार आणि सचोटी या त्रयीवर आधारित बेळगांव शहरांतील प्रथम श्रेणींतील सहकारी बँक

# दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

स्थापना १९४२ ] तालुका–बेळगांव [ फोन नं. ५३५

*२१ वर्षांची प्रगतिपर आणि भरीव वाटचाल*

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. २,००,००० |
| वसूल शेअर भांडवल | रु. १,६२,००० |
| रिझर्व्ह फंड्स् | रु. २,२२,००० |
| इन्व्हेस्टमेंटस् | रु. १२,४२,००० |
| ठेवी | रु. २३,२२,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २७,८८,००० |

*बँकेचीं खास वैशिष्ट्यें—*

आरंभापासून 'अ' वर्ग.
निरनिराळ्या प्रकारच्या ठेवींवर शें. ६ टक्केपर्यंत व्याज देण्यांत येतें.
अल्प वेतन मिळणाऱ्या लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी मुद्दाम सुरू केलेली 'संजीवनी दैनिक ठेव'.
सर्व प्रकारच्या बँकिंगचे व्यवहाराची व्यवस्था.

अधिक माहितीसाठी बँकेच्या कार्यालयांत समक्ष भेटा आणि आपला सर्व व्यवहार आजपासून याच बँकेत चालू करा.

अर्जुनराव गोविंदराव घोरपडे, चेअरमन.







स्थापना : सन १९०६ फोन क्र. ५६२८३

## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें २.

कॉसमॉस बँक बिल्डिंग, कुंटे चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

कामाची वेळ — सकाळीं ९-१५ ते ११-४५
सायंकाळीं ५-१५ ते ६-४५

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. २,७४,६०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २,५६,००० |
| ठेवी | रु. २५,४२,४०० |
| खेळतें भांडवल | रु. ३१,६५,६०० |

सल्लागार मंडळ :— ( १ ) मा. वा. रा. होनप, अध्यक्ष. ( २ ) मा. डॉ. न. का. घारपुरे, उपाध्यक्ष. ( ३ ) मा. गं. मो. भणगे, ( ४ ) मा. रा. द. भट, ( ५ ) मा. का. वा. सुभेदार.

कार्यकारी मंडळ :—(१) मा. शं. बि. दिवाकर, कार्याध्यक्ष ( २ ) मा. द. ग. देव, उपकार्याध्यक्ष ( ३ ) मा. डॉ. सु. मा. कुलकर्णी, ( ४ ) मा. अ. बा. देहाडराय, ( ५ ) मा. सौ. आशा वि. हर्डीकर, ( ६ ) मा. म. भ. राडकर, ( ७ ) मा. ह. गो. महाजन, ( ८ ) मा. स. ब. भागवत, ( ९ ) मा. म. ग. खांडेकर, ( १० ) मा. त. स. देशपांडे, ( ११ ) मा. द. मो. पाटसकर.

स्थानिक आयव्यय निरीक्षक :—( १ ) मा. म. ज. पेठे, ( २ ) मा. के. शं. कुलकर्णी.

( १ ) कर्जरूपानें आर्थिक सहाय्याच्या अनेक व्यवस्था.
( २ ) सेफ कस्टडीची व्यवस्था.
( ३ ) महाराष्ट्र राज्यांतील प्रमुख शहरांतील बँकांवर ड्राफ्टस देण्याची व्यवस्था.

*बँकिंगचे व कलेक्शनचे सर्व व्यवहार केले जातात.*

त्याबाबत चौकशी करावी.

—य. श्री. शाळिग्राम, कार्यवाह.

## दि गोवा स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

पोस्ट बॉक्स नं. १८३

**पणजी**

शाखा :— ( १ ) फोंडा ( २ ) म्हापसा ( ३ ) मडगांव

*अल्प काळांत नेत्रदीपक प्रगति :—*

| | |
|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. १५,००,००० |
| भरपाई झालेलें भाग भांडवल | रु. ५,८५,००० |
| ठेवी | रु. १८,००,००० |
| खेळतें भांडवल | रु. २७,००,००० |

*( गोवा, दमण व दीव सरकारनें ह्या बँकेचे रु. ३,००,०००चे शेअर्स खरेदी केले आहेत. )*

( १ ) सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात व त्यावर आकर्षक व्याज देण्यांत येतें.

( २ ) ह्या बँकेत ठेवलेला पैसा शेतीच्या व शेती उत्पादनाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयोगांत आणण्यांत येतो. तसेंच सहकारी ग्राहक व औद्योगिक संस्थांना खेळत्या भांडवलासाठी कर्जपुरवठा करण्यांत येतो.

( ३ ) इतर कोणत्याहि बँकेप्रमाणें ही बँक सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करते. तसेंच महाराष्ट्र, म्हैसूर व गुजराथ राज्यांतील सहकारी बँकांवर ड्रॉफ्टस देण्यांत येतात.

गोवा स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक गोव्याच्या शेती उत्पादनांत व औद्योगिक विकासांत निश्चितपणें भर घालते. तेव्हां बँकेची शक्ति वाढविण्यासाठी आपली ठेव ह्या बँकेत ठेवून आपली सेवा करण्याची संधी द्या.

व. त्र्यं. अग्निहोत्री, मॅनेजर. शांतीलाल खुशालदास, चेअरमन.


'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.

# अर्थ

## दिवाळी अंक

४ नोव्हेंबर १९६४





स्थापना : १९३५

संस्थापक :

प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

**ही दिवाळी व नवें वर्ष आमच्या हितचिंतकांस व वाचकांस सुखाचें जावो !**

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ संपादकीय | ६ |
| २ मानवश्रेष्ठ उद्योगपति | ७ |
| ३ पं. नेहरूंची आर्थिक विचारसरणी | ९ |
| ४ सहकारी खरेदी–विक्री आणि पीक–कर्जे | ११ |
| ५ संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया | १३ |
| ६ जपाननें कष्टानें मिळविलेलें वैभव | १५ |
| ७ कुटुंबनियोजनाविषयीं वस्तुस्थिति | १९ |
| ८ कुटुंबनियोजनासाठीं स्वतंत्र खातें हवें | २१ |
| ९ फक्त हिंदूंनींच कुटुंबनियोजन काय म्हणून करावें ? | २३ |
| १० ब्रिटिश भांडवलाची भारतांत गुंतवणूक | २५ |
| ११ सहकार, स्वाहाकार आणि राजकारण | २७ |
| १२ धरणें बांधण्यांत इटालिअन कंपन्या अग्रेसर | ३१ |
| १३ महागाईसंबंधीं गैरसमज | ३३ |
| १४ आर्थिक विकासाच्या मार्गातील धोंड | ३५ |
| १५ एक महत्त्वाचा निवाडा | ४१ |
| १६ बँकिंगच्या कलेची कसोटी | ४३ |



# शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली

## जिल्हा-सांगली ( महाराष्ट्र राज्य )

तार—साखर | फोन नं. १७० व १७५


सांगली जिल्ह्यांतील औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदु व सहकारी चळवळीचें स्फूर्तिस्थान, शेतकऱ्यांचे मालकीचा व अल्पकाळांत प्रगतिपथावर वाटचाल करणारा, मळीपासून रेक्टिफाइड स्पिरिटचें उत्पादन करीत असलेला, सन १९६३–६४ चे हंगामांत, निर्यातीसाठीं ९९,५२३ पोतीं कच्च्या साखरेसह, एकूण २,००,३३१ पोतीं साखर उत्पादन करून भारताला परदेशी चलन मिळवून देण्यांत पुढाकार घेतलेला, साखरनिर्मिती व निर्यात यांमध्यें अल्पावधींत अग्रगण्य ठरलेला

## शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली

**राष्ट्रीय संरक्षण व सर्वंकष विकासकार्यांतील आपला वांटा सहर्ष व साभिमान उचलीत आहे.**

आ. र. उपाध्याय, मॅनेजिंग डायरेक्टर. | आबासाहेब ग. शिंदे, व्हाइस चेअरमन. | वसंतराव पाटील, चेअरमन.





Kirloskar आमच्या सर्व मान्यवर ग्राहकांस आम्ही सुखकारक दीपावली इच्छितों.

दि म्हैसूर किर्लोस्कर लिमिटेड

रजि. ऑफिस : यंत्रपूर पो. ऑ.

हरिहर ( म्हैसूर राज्य )

MK 764

## कोंबडें झांकलें म्हणून.........

देशापुढील आजच्या सर्व समस्यांचें मूळ, उत्पादनाच्या वाढीच्या मानानें लोकसंख्येच्या भरमसाट वाढीमध्यें आढळतें. उत्पादनवाढ मुद्दाम, विवेकानें, योजनापूर्वक करावी लागते; त्याला श्रम पडतात; त्यासाठी व्यापक प्रमाणावर सहकार्य लागतें. परंतु जननाचें तसें नाहीं; निसर्गाचें, विकाराचें तें काम आपल्याला संतति नको असली तरी अव्याहत चालूंच राहतें. ह्या परिस्थितींतूनच तूट, महागाई, दारिद्र्य, परदेशांवर रोजच्या अन्नासाठी अवलंबन, लाचारी, कमकुवतपणा, भित्रेपणा, नैराश्य, लांचलुचपत, काळाबाजार हीं निष्पन्न होतात; वैयक्तिक आणि राष्ट्रीय नीतीचा अधःपात होतो आणि गुंड त्याचा गैरफायदा घेऊं लागतात.

ह्या सर्व गोष्टींची जाणीव होऊनहि सरकार त्याकडे दुर्लक्ष करतें, तांतडीचे प्रभावी उपाय योजण्याचे कामीं ढिलाई करतें, असें म्हणणें भाग आहे. लोकांच्या मतांवर निवडून येणारें सरकार “आम्ही तुम्हांला पोटभर खाऊं घालूं शकत नाहीं, तेव्हां तुम्ही तुमचीं मुलेंच कमी करा” असें सांगण्यास धजत नाहीं. उलट, लवकरच धान्याचा तुटवडा नाहींसा होईल असें आश्वासन दरवर्षीं देण्यांत येत असतें! अजून बहुसंख्य लोकांना कुटुंबनियोजनाची मुळींच माहिती नाहीं; त्याची त्यांना आवश्यकताहि वाटत नाहीं; ती त्यांना करून देण्याची अप्रगत देशांतील लोकशाही सरकारला तळमळ वाटत नाहीं.

आगामी आपत्तींची वेळीच जाणीव करून देण्यापेक्षा लोकांना आश्वासनांनीं आणि भिक्षांदेहीनें निष्क्रिय राखण्याची चूक सरकार करीत आहे. पण, कोंबडें किती वेळ झांकून ठेवणार ? देशाच्या दीर्घकालीन हिताचा विचार करून धोरण आंखण्याची व तें अमलांत आणण्याची — मग तें कितीहि अप्रिय असो— धमक पुढाऱ्यांत असेल, तरच उपयोग. परदेशी मदत कोणत्या क्षणीं थांबेल, कुणीं सांगावें ? कारण आपण त्याची किंमत देऊं शकत नाहीं. त्यांनीं तरी हें दान एकसारखें कां देत राहावें ! ( कलकत्ता, मुंबई, कांडला, भावनगर, नवलाखी आणि मद्रास ह्या सहा बंदरांत मिळून **दररोज २०,००० टन** अमेरिकन गहूं उतरवून घेण्यांत येत आहे. )

मूळ दुखण्याकडे प्रकर्षानें लक्ष वेधण्यासाठी आम्हीं ह्या वर्षीच्या दिवाळी अंकांत विशेष प्रयत्न केला आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईलच. कुटुंबनियोजनाची मोहीम सत्वर मोठ्या प्रमाणावर, उघडण्यांत आली पाहिजे. त्याबरोबरच नवी संपदा निर्माण करण्याचाहि निश्चय केला पाहिजे. तात्कालिक उपभोगांवर नियंत्रण ओघानें आलेंच. देशाच्या व्यापक आर्थिक प्रगतीच्या आड येऊन स्वतःपुरता उत्कर्ष साधणारांना ह्यापुढें थारा मिळतां कामा नये.

—संपादक

‘दुर्गाधिवास’ ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.

# मानवश्रेष्ठ उद्योगपति—एफ. डी. पदमजी

लेखक :—म. स. पारखे, पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि., पुणें

पाश्चात्य शिष्टाचारपद्धति आणि पौर्वात्य पिंड यांचें एक मधुर मीलन पदमजी शेटजींच्यांत अनुभवाला यायचें. भेट होतांच तुमच्याबद्दल चौकशी करतील: "प्रकृति ठीक आहे ना ?" हाच बहुधा त्यांचा तुम्हांला पहिला प्रश्न असेल. केवळ व्यवहार म्हणून नव्हे तर अगदीं अंतरींच्या जिव्हाळ्यानें तुमची विचारपूस करावी म्हणूनच त्यांनीं तो प्रश्न केलेला असावयाचा. तुमच्या कुटुंबियांशीं त्यांचा परिचय असेल तर पाठोपाठ त्यांचीहि चौकशी व्हावयाचीच. "तुमचं कसं काय चाललं आहे ?" हा दुसरा प्रश्न ठरलेलाच. "छान चाललं आहे. अशा अशा नवीन सुधारणा आहेत" एवढें तुम्हीं सांगितलेंत, कीं अगदीं मनापासून झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसायचा. अडचणी सांगितल्यात, तर ते तुमच्यापेक्षांहि अधिक कष्टी व्हावयाचे, आणि लगेच "मी कांहीं करूं शकत असेन तर जरूर सांगा" असा प्रश्न त्यांनीं तुम्हांला टाकला, म्हणून समजावेंच.

माझ्या बाबतींतलें त्यांचें वात्सल्य तर आणखी कांहीं आगळें होतें. औद्योगिक क्षेत्रांत जें थोडेंफार कार्य करण्याची संधि मला मिळाली आहे, त्याचें फार मोठें श्रेय एका आणीबाणीच्या वेळीं शेटजींनीं दाखविलेल्या सहानुभूतीला आहे. नव्यानेंच पदार्पण केलेल्या औद्योगिक क्षेत्रांत मला वाव मिळणार, का बुद्धिजीवी वर्गानें परंपरागत हाताळलेली नोकरीची चाकोरी मला रुळवावी लागणार, असा तो नाजूक प्रसंग होता. धंद्यांतील उज्ज्वल क्षितिजें मला दिसत होतीं, तर मंदीच्या लाटांनीं आलेला ताण सहन करण्याएवढा माझा पसारा वाढलेला नव्हता. शेटजींनीं मदत केली तरच आपण व्यवसायांत राहणार आहोंत, नाहींतर "पुरे झाले हे तुझे खेळ ! आतां कुठें तरी चांगलीशी नोकरी धर" हाच वडील मंडळींचा सल्ला मानणें मला प्राप्त होतें. पण शेटजींनीं मला नुसतें सांभाळूनच घेतलें असें नव्हे, तर माझी व्यावसायिक धडपड पुढें चालूं ठेवण्याला मदतहि केली. एक मोठा मार्मिक प्रश्न त्यांनीं मला विचारला, "तुम्हांला भावांत सवलत दिली तर गिरणीच्या मानानं ती कांहीं विशेष आहे असं नव्हे. पण खरो-खरच, मि. पारखे, तुम्हांला परवडणार आहे काय ?" माझ्या ताळेबंदाचें चित्र त्यांच्या डोळ्यांसमोर होतें आणि म्हणूनच जरी त्यांनीं मला हा प्रश्न केला असला, तरी माझ्या कारखान्याच्या भावी वाढीवर त्यांचा विश्वास होता. "मला वाटतं मी आपणांला माझी खटपट यशस्वी करून दाखवूं शकेन." मी म्हणालों.

योग्य वेळीं मिळालेलें साहाय्य आणि बदललेली अनुकूल परि-स्थिति ह्यायोगें माझ्या व्यवसायाला किफायतशीर वळण येत गेलें. शेटजी तेव्हां नुसते हसले आणि माझ्या व्यावसायिक धडपडीच्या दुसऱ्या पर्वाला त्यांनीं चालना दिली. पण याबद्दलच्या माझ्या ऋण-निर्देशाला ते अवधीच यावयाचे नाहींत. उलट ते म्हणायचे, "मीं एवढंसं केलं आणि तुम्हीं तर कितीतरी केलं आहे माझ्यासाठी !" एखाद्याच्या उपयोगी पडण्यासाठी संधि मिळाली यांतच आनंद मानणाऱ्या जीवाला आपण विशेष कांहींतरी केलें असें वाटणार तरी कसें ? उलट, दुसऱ्यानें आपणासाठी थोडीशी देखील तसदी घ्यावी हेंहि त्यांना कसें आवडणार ? तसें म्हटलें तर माझ्या हातुन त्यांच्यासाठीं फारसें काय होणार ? पण आमच्या भेटींत अलीकडे अलीकडे त्यांचें एक वाक्य ठरलेलं असायचंच, "मि. पारखे, रोज प्रार्थना करतांना तुमच्यासाठीहि मी एक प्रार्थना करीत असतों. तुमचा कारखाना मोठा व्हावयास पाहिजे." आणि जणू कांहीं अलीकडे झालेल्या कारखान्याच्या वाढीचें श्रेय त्यांच्या प्रार्थनेलाच जाईल असें न कळतहि मला वाटूं नये म्हणून लगेच ते गंभीर होऊन म्हणायचे, "पण तुमचं कर्तृत्वच तसं मोठं आहे कीं !" केवढी त्यांच्या मनाची व्यापकता ही ! आणि असा उल्लेख एकदा नव्हे, कितीतरी वेळां त्यांच्या तोंडांतून निघालेला आहे. इतरांच्या दृष्टीनें यशाचा वाटे-करी मी असलों तरी त्याची पायाभरणी त्यांनींच केलेली होती, हें मी कसें विसरूं शकेन ? जगाच्या तर तें लक्षांतहि राहणार नाहीं. पायाच्या मजबुतीवरच जरी इमारतीची उभारणी असली तरी कौतुक होत असतें तें दृश्य इमारतीचें ! कारण तो पाया दिसत नसतोच मुळीं कुणाला. इतरांच्याबद्दल एवढी आदराची, कौतु-काची भावना, तर ज्यांच्याकडून हें कागद–व्यवसायाचें लोण त्यांच्याकडे आलें, त्यांच्याबद्दल कोणतें स्थान शेटजींच्या हृदयांत असेल हें सांगावयास नको. आधींच दिलदार स्वभाव व कोणास विन्मुख पाठवावयचें नाहीं ही वृत्ति. पण कोठलीहि भरीव देणगी देतील तर ती वडिलांचे नांवानें ! स्वतः नवीन कारखाना सुरू केला तर तोहि वडिलांचे स्मरणार्थ ! एक दिवस असाच त्यांना भेटून मी खालीं उतरत होतों. शेटजींच्या थोर मनाबद्दल विचार मनांत आला आणि स्वतःबद्दल वाटूं लागलें, "त्यांच्यांतल्या किती गुणांचं अनुकरण आपण केलं आहे ? दुसऱ्याचं मनापासून कौतुक करण्याची शैली आपण उचलली आहे का ? आदरातिथ्याचं अनु-करण करूं शकलों आहोंत का ?" ज्या वयांत मन अनुकरणक्षम असतें तेव्हांपासून मी त्यांना अगदीं जवळून पाहात आलों आहें. त्यांच्या गुणसमुच्चयांचा माझ्या मनावर पगडा पडत गेला असला तरी राहून राहून असें वाटतें कीं, त्यांचें अनुकरण मला साधलें असतें तर !

कागद व्यवसायापुरतें बोलावयाचें झालें तर शेटजींच्यामध्यें सर्वांगीण नैपुण्य दिसून येई. यंत्रविभागांत तुम्ही त्यांचेबरोबर असाल व त्यांची तेथील अधिकाऱ्याबरोबर चाललेली चर्चा पाहिली कीं वाटे त्यांच्या मनाचा अधिक कल एंजिनिअरिंगकडे आहे. उत्पादन विभागांत ते असले आणि निरनिराळ्या अडचणी अगर निरनिराळे प्रयोग यांवर बोलणें निघालें कीं, केवळ अनुभवजन्यच नव्हे तर प्रगत राष्ट्रांतील एखाद्या अद्ययावत् सुधारणेचा आधार घेऊन ते तुम्हांला कांहीं समन्वयात्मक सूचना करतांना आढळत. व्यावसायिक पत्रव्यवहार तर विशिष्ट पद्धतीनें चालावयाचा. प्रत्येक पत्र वाचून उत्तराची ते सूचना देत. सूचनेबरहुकूम तयार झालेला मसुदा स्वतः वाचीत. मगच तो टंकलिखित व्हावयाचा. वाक्य-रचनेवर, शब्दांच्या निवडीवर, व्याकरणावर, आणि या सर्वांवर व्यापारी पद्धतीच्या मांडणीवर त्यांचा फार भर असावयाचा. ज्या वेळीं कागदाचे भाव पौंडास ३ पैसे खालीवर व्हावयाचे त्या काळीं ताळेबंदाची कसरत त्यांना करावयाची होती. पण अशा दगदगींत रंगून जाणें हेंच त्यांचें जीवन होतें. महिन्यामागून महिने काम झालें तरी विश्रांतीची गरज त्यांना वाटावयाची नाहीं. अगदीं जवळच्या मंडळींनीं आग्रह धरलाच तर चार दिवस सिंहगडावर जातील; महाबळेश्वर, उटकमंडला नव्हे. दोनतीन तासांच्या

अवधींत गिरणीवर परत येतां यावें किंवा केव्हांहि तेथील वर्तमान समजावें, हाच त्यामागील हेतु.

बहुधा मागासलेल्या भागांत तंत्रज्ञ मंडळीच कारखानदारीला सुरुवात करतात आणि व्यवसाय जसजसा वाढीला लागतो तसतसें तंत्रशास्त्रांतील थोडेसें प्रेम बाजूला ठेवून आर्थिक आणि व्यापार-विषयक बाबींनाच त्यांना वाहून घ्यावें लागतें. १९३० ते १९४० च्या हळूहळू वाढत गेलेल्या जागतिक मंदीच्या काळांतच शेटजींना ही जबाबदारी प्रकर्षानें पाळावी लागत होती. कितीहि काटकसरीनें व्यवसाय चालविला, सरकारकडून थोडेंफार संरक्षण मिळविलें, तरी कागद व्यवसायाला तोंडमिळवणी करतांना फार ताण पडावयाचा. अशाहि परिस्थितींत थोडी-फार सवड मिळाली कीं, शेटजींचें तंत्रज्ञ मन कांहीं ना कांहीं तरी नवीन करण्याकडे लागत असे. तसेंच स्वास्थ्य त्यांना लाभलें असतें आणि व्यवसायाच्या व्यावहारिक जबाबदाऱ्या अंगावर पडल्या नसत्या तर मला वाटतें गिरणीची संशोधनशाळा वाढविण्यांत आणि तींतच तासन्‌तास काम करण्यांत ते रंगून गेले असते. अगदीं अलीकडे अलीकडेसुद्धां स्वतःच्या राहत्या घरीं त्यांचे नेहमीं प्रयोग चालूं होतेच. पल्प करण्याच्या कांहीं विशिष्ट कल्पना त्यांच्या बनत चालल्या होत्या आणि त्याचे प्राथमिक प्रयोग करीत राहणें हाच त्यांचा फावल्या वेळेचा विरंगुळा होता. एतद्देशीय तंत्रज्ञांनीं चालविलेली पहिली कागदगिरणी हा मान पदमजी घराण्यानें जसा मिळविला, तद्वत्‌च पहिला ग्रीजप्रूफ्‌ कागद देशांत बनविण्याचें श्रेय फर्दुनजी शेटजींनीं मिळविलें आहे. वयाच्या ९० च्या जवळपास येत असतांना विकल होणाऱ्या त्यांच्या शरीरानें त्यांचा दुर्दम्य कर्तृत्ववाद किंचितसा देखील शिथिल केला नव्हता. एका मोठ्या गिरणीची उभारणी नव्या पिढीला हाताशीं धरून त्यांनीं करावयाला घेतली होती आणि बहुतेक प्रास्ताविक गोष्टी पुऱ्याहि झालेल्या आहेत. शरीराला दगदग सहन होत नव्हती तरी जातीनें गिरणीवर जाऊन नव्या मशीनरीच्या पेट्या पाहणें, आणि त्या-बद्दल चर्चा करणें अगदीं शेवटपर्यंत चालूं होतें. विश्रांतीसाठी डॉक्टरनीं औषधें यावींत पण त्यांचा परिणाम कमी होऊन ते जागे झाले कीं, पहिली आठवण त्यांना नव्या गिरणीची होई !

---

## शेक्सपिअरच्या सन्मानार्थ पोस्टाचीं तिकिटें
### अद्वितीय, वैशिष्ट्यपूर्ण गौरव

शेक्सपिअरच्या ४०० व्या जन्मदिनाच्या उत्सवानिमित्त ब्रिटिश पोस्ट ऑफिसानें पोस्टाचीं खास तिकिटें काढलीं आहेत. राजघराण्याबाहेरच्या व्यक्तीशीं प्रत्यक्ष संबंध असलेलीं हीं पहिलींच तिकिटें आहेत. त्याचप्रमाणें, राजा किंवा राणी ह्याव्यतिरिक्त इतरांचें चित्र तिकिटावर असण्याचाहि हा पहिलाच प्रसंग आहे. एकूण पांच तिकिटांपैकी चार तिकिटांवर मध्यभागीं शेक्सपिअरच्या नाटकांतील प्रसंग चित्रित केलेला आहे. ३ पेन्सच्या तिकिटावर 'ए मिडसमर नाइट्स ड्रीम' मधला देखावा असून ६ पेन्सच्या तिकिटावर 'ट्वेल्थ नाइट'मधील देखावा आहे. १ शि. ३ पेन्सच्या तिकिटावर 'रोमिओ अँड ज्युलिएट' मधील एक प्रसंग दाखविला असून १ शि. ६ पेन्सच्या तिकिटावर 'हेन्री दि फिफ्थ' मधील एक चित्र आहे. तिकिटांच्या उजव्या बाजूस राणीचा मुखवटा असून डाव्या बाजूस शेक्सपिअरचें चित्र आहे. पांचव्या, २ शि. ६ पेन्सच्या तिकिटावर उजव्या बाजूस राणीचा मुखवटा असून डाव्या बाजूस 'हॅम्लेट'च्या पांचव्या अंकांतील, पहिल्या प्रवेशामधील, यॉरिकच्या कवटीला उद्देशून बोलणारा हॅम्लेट दाखविला आहे.


# दि कराड अर्बन
## को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

स्थापना सन १९१७ ] [ फो. नं. ४३

*सतत ३५ वर्षांच्यावर 'अ' वर्गातील कराडांतील सर्वांत जुनी बँक*

अध्यक्ष :—श्री. वि. कृ. तांबवेकर, बी. ए., एल्‌एल्‌. बी.
उपाध्यक्ष :—यशवंतराव जगन्नाथराव मोहिते, बी. ए.

—: बँकेची प्रगति :—

| | सन १९६३-६४ |
|---|---|
| भाग भांडवल | रु. १,५९,९१० |
| गंगाजळी | रु. २,०१,६८१ |
| इतर निधि | रु. २,७८,२०१ |
| इमारत निधि | रु. १,३७,६०९ |
| ठेवी | रु. ५४,९३,२१४ |

सेवाभावी नियामक व सेवकवर्ग यांच्या परिश्रमानें बँक सुवर्ण महोत्सवाची वाटचाल करीत आहे. रेल्वे रिसीट्स्, हुंड्या, ड्राफ्टस्, वेतन बिलें, वगैरेंची वसुली तत्परतेनें व माफक दरानें केली जाते. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सर्व प्रकारच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात. एक वेळ बँकेस भेट द्या.

शं. पु. कुलकर्णी,
मॅनेजिंग डायरेक्टर.



दि कोल्हापूर मराठा मंडळाच्या विद्यमाने चाललेली

# दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि.
## कोल्हापूर.

स्थापना १९३३ ] ऑडिट वर्ग " अ " [ फोन ७१३

| | | |
|---|---|---|
| १ ) अधिकृत शेअर भांडवल | रु. | ३,००,००० |
| २ ) खपलेलें शेअर भांडवल | रु. | १,७१,१०० |
| ३ ) रिझर्व्ह फंड | रु. | ८७,०९७ |
| ४ ) इतर फंडस् | रु. | ५४,४२६ |
| ५ ) खेळतें भांडवल | रु. | ९,८४,८१२ |
| ६ ) एकूण व्यवहार | रु. | ५८,८७,४८३ |
| ७ ) सभासद संख्या | | ३,०८० |

**बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.**

ही दीपावली बँकेचे सभासद, खातेदार व हितचिंतक यांना आनंदाची व सुखाची जावो

जनार्दनपंत दत्तात्रय भोसले
प्रेसिडेंट

दत्तात्रय कृष्णाजी पाटील
मॅनेजर.

# पं. नेहरूंची आर्थिक विचारसरणी

## नियोजित अर्थव्यवस्थेचा पुरस्कार

भारत स्वतंत्र झाल्यापासून त्याच्या आर्थिक धोरणाचें अंतिम उद्दिष्ट काय, ह्या उद्दिष्टाचा रंग कोणता आणि त्याचा गाभा कोणता, ह्यासंबंधींच्या कल्पना स्पष्ट झालेल्या आहेत. त्याचप्रमाणें हें उद्दिष्ट गांठण्याचा मार्ग सामान्यतः कोणता, हेंहि ठरल्यासारखें आहे. अर्थात् ह्याचा अर्थ प्रत्येक बारीकसारीक तपशील ठरविण्यांत आला आहे असा मात्र नाहीं. पं. नेहरू ह्यांच्या आग्रहामुळें समाजवादी ढंगाच्या समाजरचनेचें अंतिम उद्दिष्ट ठरविण्यांत आलें ही गोष्ट प्रसिद्धच आहे. कोणी असें म्हणतील कीं, ह्याच गोष्टीवरून पं. नेहरूंच्या मनाच्या वृत्तीचा सैद्धान्तिक कल सिद्ध होतो; पण असा ग्रह करून घेणें हें त्यांना अन्याय करणारें आणि चुकीचें होईल. ह्या ग्रहाला पाठिंबा देणारीं पं. नेहरूंच्या ग्रंथांतील अवतरणें शोधून काढण्याचें काम कंटाळवाणें होईल. तथापि, पं. नेहरूंचीं भाषणें आणि लिखाण जर नीट तपासून पाहिलीं, तर त्यांची समाजवादाची कल्पना ही केवळ सैद्धान्तिक बैठकीपासून वेगळी होती, ह्यासंबंधीं पुरेसा पुरावा मिळूं शकेल. उलट त्यांच्या कांहीं क्षुद्र टीकाकारांनीं पं. नेहरूंच्या समाजवादाच्या कल्पनेच्या अस्पष्टपणाबद्दल त्यांना दोष दिलेला आढळून येतो, अशी वस्तुस्थिति आहे. सामाजिक न्याय आणि नीतितत्त्वें ह्यांच्याबद्दल पं. नेहरूंना अतिशय प्रेम होतें. ह्या प्रेमांतूनच त्यांच्या समाजवादाचा जन्म झालेला आहे. समाजवादाच्या मार्क्सवादी ग्रंथांतून समाजवादाची जी यंत्रणा सांगण्यांत आलेली आहे, तिच्याबद्दल त्यांना बौद्धिक आकर्षण नव्हतें. मार्क्सवादी विचारसरणींत कांहीं बाबतींत जी सखोलता आहे तिच्याबद्दल त्यांना फार आदर वाटत असे. परंतु, मार्क्सवादाचे सिद्धान्त विचार न करतां त्यांनीं कधींहि स्वीकारले नाहींत. उलट असें म्हणतां येईल कीं, पं. नेहरूंच्या निकटवर्तीयांत कांहीं लोकांना शुद्ध मार्क्सवादानें सुचविलेल्या विचारप्रणालीबद्दल अधिक आकर्षण वाटत होतें. ह्या लोकांच्या विचारांचा पं. नेहरूंच्या विचारावर थोडाबहुत परिणाम होत असे. परंतु तो झाला ह्यापेक्षा अधिक झाला नाहीं ह्यावरूनच पं. नेहरूंचा समाजवाद हा केवळ अनुकरणात्मक नसून स्वतंत्र प्रज्ञेचा होता ही गोष्ट सिद्ध होते.

### मंत्रिमंडळांतील मतभेद

पं. नेहरू आपल्या मंत्रिमंडळांत मतभिन्नता असलेल्याच काय पण मतविरोध असलेल्या लोकांचा आणि ज्यांची समाजवादावरील निष्ठा मिळमिळीत आहे अशा लोकांना स्थान देत असत असा आरोप त्यांच्यावर करण्यांत आलेला आहे. हा कशाचा पुरावा म्हणावा ? आर्थिक अनिर्णयाचा कीं राजकीय मुत्सद्देगिरीचा ? कदाचित् असें असेल कीं, पक्षाबाहेर परिणामकारक विरोध नसल्यामुळें स्वतःच्या पक्षांतूनच असा विरोध निर्माण करून ते विरोधाची भरपाई करीत असावेत ! अधिक गंभीरपणें बोलावयाचें तर असा प्रश्न विचारतां येईल कीं, पं. नेहरू आणि त्यांचे एकसंध मंत्रिमंडळ ह्यांच्यांत आर्थिक धोरणाची कोणती एकमेव व बरोबर दिशा स्वीकारावी ह्याबद्दलच्या मताची जास्तींत जास्त एकता होती किंवा नाहीं ? अशा प्रकारची कामचलाऊ एकवाक्यता होती असें गृहीत धरलें तर त्यांचें आर्थिक धोरण अमलांत आणण्यास योग्य ठरण्यासारखें अगर अयोग्य ठरण्यासारखें एखादें मंत्रिमंडळ आपणांस सांगतां येईल काय ? ह्या बाबतींत आपणास नेहरूंपेक्षा अधिक यश येईल काय ? पं. नेहरू संशयास्पद समाजवाद्यांना आणि उघडपणें भांडवलदारी वृत्तीच्या लोकांना सहिष्णुतेनें वागवीत. धोरण ठरविण्याच्या वरिष्ठ पातळीवरहि त्यांच्याभोंवतीं कांहीं कम्युनिस्टांचे सहप्रवासी असत असें म्हणतात. म्हणूनच कदाचित् कांहीं भांडवलदारी वृत्तीच्या लोकांनाहि त्यांनीं आश्रय दिला असावा. ते कसेहि असले तरी धोरणाच्या कांहीं मूलभूत मुद्यांसंबंधीं त्यांची भूमिका ठाम असे.

### नियोजनाची दीक्षा

देशाला नियोजित आर्थिक विकासाच्या कल्पनेची कायमची दीक्षा देण्याचें कार्य त्यांनीं केलें. आर्थिक धोरणाच्या बाबतींत दिलेली ही सर्वांत मोठी देणगी आहे. परंतु ही गोष्ट करणें अगदीं सोपें होतें, असें मात्र नाहीं. खुद्द देशांतल्या देशांत पं. नेहरूंना आपल्या गांधीवादी सहकाऱ्यांना विरोध करावा लागला. कारण, नियोजित आर्थिक विकास म्हणजे सरकारचा वरून लादलेला आर्थिक कार्यक्रम, अशी त्यांची भावना होती. ह्याउलट, गांधीवादी स्वतः स्वयंपूर्ण ग्रामरचनेला भावनिक दृष्ट्या बांधले गेलेले होते. आर्थिक विकास साधतांना पश्चिम युरोपांतील लोकशाही देशांची मदत घेणें प्राप्तच होतें. पण, ह्या देशांना नियोजित अर्थव्यवस्था आवडत नव्हती. ( परराष्ट्रीय धोरणांचें एक अंग म्हणून आर्थिक मदत देण्याचें धोरण रशिआनें १९४७ पर्यंत स्वीकारलेलें नव्हतें. ) नियोजन समितीच्या कार्याबद्दल कोणाचें कांहीं मत असो. पण, देशाच्या आर्थिक धोरणांत आणि विकासांत नियोजनसमितीची स्थापना ही गोष्ट अतिशय महत्त्वाची झाली ह्यांत मात्र शंका नाहीं. नियोजन समितीचें अध्यक्षपद पंतप्रधान नेहरूंनीं स्वतःकडे घेतलें हीहि गोष्ट महत्त्वाची आहे.

### भारी उद्योगधंद्यावरील भर

पं. नेहरूंनीं पाठिंबा दिल्यामुळें भारतांत आधुनिक पद्धतीचें म्हणजे भारी उद्योगधंद्यांना प्राधान्य असणारें औद्योगीकरणाचें धोरण स्वीकारण्यांत आलें. ह्या आर्थिक धोरणाबद्दल वाद असूं शकेल. पण पं. नेहरूंच्या पाठिंब्याशिवाय तें स्वीकारणें शक्य झालें नसतें. कांहीं राजकीय हितसंबंधीयांनीं ह्या धोरणाचा अर्थ भारतानें रशिआचा मार्ग स्वीकारला आणि पर्यायानें हुकूमशाहीकडे वाटचाल सुरू केली, असा केला. कांहीं लोकांच्या मतानें अशा पद्धतीचें औद्योगीकरण हें महात्मा गांधींच्या तत्त्वाविरुद्ध होतें. अर्थात् ह्या लोकांचा हेतु शुद्ध व प्रामाणिक होता. भारी उद्योगधंद्यावर देण्यांत आलेला जोर म्हणजे शेतीकडे दुर्लक्ष, खादी आणि ग्रामोद्योगांची इतिश्री आणि बेकारीच्या प्रश्नाविषयीं अनास्था असाहि करण्यांत येऊं लागला. तथापि, औद्योगीकरणाच्या नेहरूंच्या धोरणाचा असा अर्थ करणें चुकीचें आहे, इतकेंच नव्हे तर नियोजन समितीच्या पंचवार्षिक कार्यक्रमाविषयींच्या कागदपत्रांत ह्या अर्थाला आधार मिळणार नाहीं. उद्योगधंद्यांचा विकास आणि शेतीचा विकास ह्यांच्यांत विरोध असल्याचा जो निष्कर्ष काढण्यांत येत आहे, तो पूर्णपणें चुकीचा आहे.

### लवचिकपणाचा गुण

असा एक समज आहे कीं, पं. नेहरूंना भव्य आणि अवाढव्य गोष्टींचें फार आकर्षण होतें. मोठमोठे पोलादाचे कारखाने आणि

बहुविध उद्देशांच्या नदी विकास योजना, ह्यासारख्या गोष्टींनीं ते भारावून जात असत. कदाचित् तसें असेलहि. दुसरें असें म्हणतां येईल कीं, एखाद्या योजनेच्या प्रमुख कल्पनेपलीकडे ते क्वचितच जात असत. अशा योजनांच्या अनेक अंगांचा तपशीलवार विचार करण्याचे श्रम त्यांनीं फारसे घेतलेच नाहींत. ह्या मनोवृत्तीचा दोष त्यांच्याकडे किती जातो, अगर त्यांच्या सल्लागारांकडे व कारभाऱ्यांकडे किती जातो हा विवाद्य प्रश्न आहे. पण एक गोष्ट खरी कीं, धोरणाबाबत ते अनाग्रही आणि लवचीक असत. ह्यासंबंधीं शेतीच्या भविष्यकालीन रचनेविषयीं नागपूर येथील कॉंग्रेसनें केलेल्या ठरावाचें उदाहरण बघण्यासारखें आहे. ह्या ठरावांत असें स्पष्ट म्हटलें होतें कीं, शेतीच्या व्यवसायाची रचना सहकारी संयुक्त स्वरूपाची असावी, आणि ह्या रचनेंत शेतीची जमीन कसण्यासाठी एकत्र करण्यांत यावी. शेतीसंबंधींचा हा निर्देश बहुधा सर्व जमिनीला लागू असावा. आर्थिकदृष्ट्या न परवडणारी छोटी शेती करणाऱ्या शेतकऱ्यालाच तो लागू होता असें नाहीं. त्या वेळीं आणि नंतरहि बराच काळ पं. नेहरूंची अशी खात्री होती कीं, आपली भूमिका बरोबर आहे. पण, नंतर ह्या धोरणाचा विपरीत अर्थ लावण्याच्या कामीं आणि तें शेतकरीविरोधी व मालमत्तेची जप्ती करणारें आहे असें भासविण्याच्या कामीं कांहीं लोकांना यश आलें. शिवाय तें धोरण अमलांत आणण्यांत व्यावहारिक अडचणी होत्याच. ह्याचा परिणाम होऊन नागपूरचा ठराव हळूहळू अंतर्धान पावत गेला आणि त्याकडे दुर्लक्ष करण्यांत आलें. एकदा स्वीकारलेलें धोरण उलट्या बाजूकडे वळविण्यांत होणारी कुचंबणा आणि दोष पत्करूनसुद्धां तसें करण्याचें धैर्य त्यांनीं दाखविल्याचें दुसरें एक लक्षांत ठेवण्यासारखें उदाहरण आहे. प्राथमिक सहकारी संस्थांची रचना आणि स्वरूप कसें असावें ह्यासंबंधींच्या धोरणाचें हें उदाहरण आहे. प्राथमिक सहकारी पतपेढ्या सरकार पुरस्कृत, मोठ्या आणि स्वावलंबी असाव्या अशी सूचना रिझर्व्ह बँकेच्या रूरल क्रेडिट सर्व्हेच्या मार्गदर्शन समितीनें केली होती आणि ती भारत सरकारनें मान्य केली होती. सामान्यपणें ही शिफारस योग्य अशीच आहे. परंतु ती अंमलांत आणतांना तिला वेडी-वाकडी वळणें लागलीं. सरकारच्या पुरस्काराच्या कल्पनेचें कांहीं ठिकाणीं सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्चस्वांत रूपांतर झालें; आणि मोठ्या सहकारी संस्था उभारण्याच्या नादांत परस्परांना साह्य करण्याची मूलभूत कल्पना मागें पडली. ह्या बाबतींत पं. नेहरूंची प्रतिक्रिया जरा तीव्रच झाली. तिसऱ्या इंडिअन को–ऑपरेटिव्ह कॉंग्रेसचें उद्घाटन करतांना ते म्हणाले, "रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीच्या सर्व नाहीं पण कांहीं शिफारसी स्वीकारण्यांत सरकारची चूक झाली. लोक कार्यक्षम नाहींत, त्यांना आपल्याच बळावर एखादी गोष्ट करतां येणार नाहीं, अशा विचारांचा ठसा मार्गदर्शन समितीवर पडलेला दिसतो. तेव्हां सरकारी नोकरांनीं पुढें येऊन मदत करावी, सरकारी पैशांनीं त्यांना चालतें करावें; सरकारी पैशांबरोबर सरकारचे नोकर आलेच, अशी ही विचारसरणी आहे."

पुढें मग नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलनें ह्या प्रश्नाचा विचार केला आणि मोठ्या सहकारी सोसायट्यांची विचारहीन उभारणी थांबविण्यांत आली. त्याचप्रमाणें प्राथमिक सहकारी संस्था स्थापन करतांना सहकारी वृत्तीवर पुन्हा भर देण्यांत आला. पं. नेहरूंची ही तीव्र प्रतिक्रिया योग्य आहे कीं अयोग्य आहे हा प्रश्न निराळा. पण आर्थिक व्यवहारांत सरकारच्या हस्तक्षेपाची व्याप्ति वाढविण्यास ते किती नाखूष असत हें ह्यावरून दिसून येतें.

### मूलभूत आर्थिक धोरण सुदृढ

पं. नेहरूंच्या पुढारीपणाखालीं जें मूलभूत आर्थिक धोरण स्वीकारण्यांत आलें तें किती सुदृढ होतें, हें देशांतील आणि देशाबाहेरील विचारशील लोकांनीं त्याचा जो एकमुखी स्वीकार केला, त्यावरून दिसून येतें. ह्या धोरणाची ती एक कसोटीच म्हणतां येईल. प्रो. जॉन लेविस आपल्या भारतविषयक ग्रंथांत म्हणतात, "दुसऱ्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रचण्यांत आलेला आर्थिक व्यूह भक्कम पायावर उभारलेला आहे आणि तपशीलवार तयार करण्यांत आलेला आहे." ते पुढें असेंहि म्हणतात कीं, भारत सरकार ज्या प्रकारचा विकासाचा प्रयत्न करीत आहे त्याला राष्ट्रीय धोरणासंबंधीं विचार करणाऱ्या गटांपैकी फक्त दोन गटांचा मुळापासून विरोध आहे. एक गट नव गांधीवाद्यांचा आणि दुसरा अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांचा. पं. नेहरूंनीं देशासाठी आंखून दिलेलें धोरण आतां तसेंच चालू राहणार आहे. त्यांत किरकोळ बदल करावे लागण्याचा संभव आहे. परंतु हे बदल किरकोळ स्वरूपाचे असतील, ह्यांतच त्यांच्या आर्थिक मुत्सद्दीपणाचें गमक सांपडतें.

विविध प्रकारच्या कापडाच्या 'क्वालिटी' व 'गॅरेंटी' मुळें,
सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेलें पुण्यांतील अग्रेसर कापडदुकान
# ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स
'होम ऑफ क्वालिटी ॲण्ड व्हरायटी'
पेरूगेट रोड, पुणें २.
(फोन नं. ५७३१८)

# सहकारी खरेदी-विक्री आणि पीक-कर्जे

## योजनांचा अपुरेपणा

( डॉ. धनंजयराव गाडगीळ )

गेल्या दोनतीन वर्षांत रिझर्व्ह बँक व इतर अधिकारी संस्था व समित्यांमार्फत अखिल भारतीय सहकारी व्यवस्थेची निरनिराळ्या दृष्टींनें पाहणी झाली आहे. या सर्वांवरून असें आढळतें कीं, महाराष्ट्रानें सहकारी क्षेत्रांत गेल्या दहा वर्षांत भरीव प्रगति केली असून आज आपलें स्थान आघाडीवरचें आहे. संख्यात्मक व गुणात्मक या दोन्ही दृष्टींनीं आपलें कार्य उठून दिसत आहे. अशा रीतीनें सर्व पाहणींचा निष्कर्ष आपल्यापुरता बराच समाधानकारक असला तरी त्यावरून आपलीं अनेक वैगुण्येंहि लक्षांत आलीं आहेत. त्यांकडे लक्ष देणें जरुरीचें आहे.

### ऐपतदार कर्जदारांकडेच मोठ्या बाक्या

महाराष्ट्रांतील सहकारी कर्ज-व्यवहारांत अलीकडे आढळून येणारा मोठा दोष म्हणजे थकबाकीचें प्रमाण हा होय. १९६१–६२ व १९६२–६३ सालीं हें प्रमाण फार मोठें, फार काळजी करण्यासारखें होतें. १९६३–६४ सालीं थकबाकी कमी करण्यांत आपणांस बरेंच यश आलें आहे हें खालील आंकड्यावरून दिसून येईल.

| | येणें बाकी रु. लाखांत | थकबाकी रु. लाखांत | थकबाकीचें येणें बाकीशीं शें. प्र. |
|---|---|---|---|
| ३०–६–६२ | ३,९६०·५३ | १,०४२·४२ | २६·३ टक्के |
| ३०–६–६३ | ४,४२५·९१ | १,२७९·४१ | २८·९ टक्के |
| ३०–६–६४ | ५,२९८·४९ | १,००९·४३ | १९·१ टक्के |

असें झालें तरी आतां सर्व ठीक आहे असें मी मानत नाहीं. याचें कारण असें कीं, थकबाकीचें प्रमाण यंदा कमी झालें तें फार मोठ्या प्रमाणावर कायद्याचा अवलंब करून सक्तीची वसुली केली म्हणून झालें आहे. आणि ही कायदेशीर अंमलबजावणी करीत असतां असें आढळून आलें कीं, बाक्या फार मोठ्या प्रमाणावर ऐपतदार कर्जदारांकडेच थकल्या होत्या. थकबाकी वाढली म्हणजे कायदेशीर इलाज करणें अपरिहार्य ठरतें. पण जेथें असे इलाज वारंवार करावे लागतात ती व्यवस्था निकोप आहे असें म्हणतां येणार नाहीं. याकरितां कर्जवसुली वर्षानुवर्षे पुरती व वेळेवर कशी होईल याकडे आपणां सर्वांस लक्ष पुरविलें पाहिजे.

### पीक–कर्ज योजना

पीक–कर्जाच्या योजनेची उभारणी, वैयक्तिक अगर सार्वत्रिक आपत्तीचा अपवादात्मक काळ सोडला तर मालाची विक्री होतांच पीक–कर्ज १०० टक्के परत होईल या समजुतीवर झालेली आहे. प्रत्यक्ष व्यवहार याहून फार निराळा झाला तर ही योजना टिकूं शकणार नाहीं. पीक–कर्ज योजनेचा पाया भक्कम करण्यासाठी निदान दोन प्रकारें योजना केली पाहिजे. महाराष्ट्रांतील कांहीं भागांत पीक थोड्याफार प्रमाणांत बुडणें हें वारंवार घडतें. अशा भागांत अवर्षणाच्या वर्षी पीक–कर्जाचें रूपांतर मध्यम मुदतीच्या कर्जांत करणें आवश्यक आहे. असें न केल्यास पुढील व्यवहार खुंटतो, थकबाकीचें प्रमाण वाढतें व शेती उत्पादन व बँकेचा कारभार या दोहोंवर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव असतो. आपत्तीच्या काळीं मध्यम मुदतीच्या कर्जाचा आधार देतां यावा म्हणून एखादा विशिष्ट निधि निर्माण करण्याची कल्पना अनेक वर्षे चर्चिली जात आहे. तिला लवकरच मूर्त स्वरूप येऊन हा प्रश्न सुटण्याच्या मार्गास लागेल अशी मला आशा आहे.

### सहकारी खरेदी–विक्रीची वाढ

याहूनहि महत्त्वाचा आणि नित्याच्या नडीचा प्रश्न विक्री-योजनेचा आहे. तत्त्वत: सेवा सोसायटीच्या प्रत्येक कर्जदारावर आपल्या मालाची विक्री सहकारी संस्थांमार्फत करण्याचें बंधन असतें. परंतु अनेक कारणांमुळें याची अंमलबजावणी होत नाहीं. सहकारी खरेदी–विक्री संस्थांचा कारभार आज आहे त्यापेक्षा बराच जास्त व्यापक व कार्यक्षम झाल्याखेरीज ही अंमलबजावणी करणें सुकर अगर श्रेयस्कर होणार नाहीं. या अर्थी सहकारी कर्ज-व्यवहाराची सुस्थिति व सहकारी खरेदी–विक्री संस्थांचा व्याप व कार्यक्षमता हीं एकमेकांशीं फार निगडित आहेत. सहकारी खरेदी–विक्री संस्थांचा कारभार त्वरेनें सर्वव्यापी होण्यास अनुरूप सरकारी धोरणाचा त्यास पाठिंबा हवा. शेतमालाच्या किंमती स्थिरावणें व अन्नधान्यांचा पुरवठा व भाव यांवर वर्षभर योग्य नियमन ठेवणें या गोष्टींचें महत्त्व सरकारला यंदाच्या अनुभवावरून पूर्णपणें पटलें असेल, असें मानण्यास हरकत नसावी. हीं उद्दिष्टें साधण्याजोगी नियंत्रण योजना सरकारनें ताबडतोब हातीं घेतल्यास राज्य व जिल्हा पातळीवरील सहकारी खरेदी–विक्री संस्थांस मोठ्या प्रमाणावर संघटित कार्य करण्यास संधि मिळेल. सहकारी व्यवस्थेच्या प्रस्थापनेचा एक भाग म्हणून आणि सहकारी कर्जव्यवहाराच्या स्थैर्यास पोषक घटना म्हणून सहकारी खरेदी–विक्रीची वाढ मला फार महत्त्वाची वाटते. आणि याबाबतच्या सर्व हालचालीस सहकारी बँक व्यवस्था पूर्णपणें आर्थिक साहाय्य करण्यास तत्पर आहे असें मी याप्रसंगीं आश्वासन देतों.

### सहकारी कर्ज–एक प्रयोग

अलीकडे झालेल्या पाहणीमुळें पीक–कर्ज योजनेच्या एका मोठ्या अपुरेपणाकडे लक्ष वेधलें आहे. ज्यांची शेती मोठी व पिकें मोलाचीं त्यांसच पीक-कर्जाचा लाभ मोठ्या प्रमाणावर साहजिकपणें होतो. छोटे, कोरडवाहू भुसार पीक काढणारे शेतकरी यांना या पद्धतींत कर्ज अल्प प्रमाणांत प्राप्त होतें. एकंदरींत, निकृष्ट आर्थिक स्थितींतील उत्पादकांस पीककर्जाची मांडण फारशी अनुरूप नाहीं, असा निष्कर्ष अपरिहार्यपणें निघतो. हें मान्य झाल्यावर अशा उत्पादक वर्गाकरितां किंवा ज्यास पीक–कर्ज योजना अजिबात लागूच नाहीं अशा मजूर, कारागीर वर्गाकरितां सहकारी कर्जयोजना कशी उभारतां येईल, हा प्रश्न साहजिक उद्भूत होतो. या सर्व निकृष्ट आर्थिक स्थितींतील व्यावसायिकांचा आर्थिक व्यवहार बहुतांशीं अस्थिर, कोत्या आणि संमिश्र पायावर उभारलेला असतो. तेव्हां अशांकरितां एखादी साधी, सोपी व सार्वत्रिक योजना काढणें कठीण दिसतें. सर्व व्यवहार व्यक्तिगत तपासणें व संपूर्ण देखरेखीखालीं त्यास नवीन वळण देणें अशा दिशेनें हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे असें सकृद्दर्शनीं वाटतें. प्रयोग करून अनुभव मिळविल्याखेरीज याबाबतच्या व्यवहार्य योजना बनवितां येणार नाहींत. हें सर्व लक्षांत घेऊन आपल्या बँकेनें यंदा याविषयीं थोडें प्रयोगात्मक प्रयत्न करण्यास सुरुवात केली. कांहीं निवडक लहान

गांवांतील सेवा सोसायटींतील प्रत्येक सभासदाच्या आवकजावकीची संपूर्ण माहिती घेऊन, त्यास ठराविक अंदाजपत्रकानुसार कर्ज-पुरवठा मालाच्या रूपानें अगर रोखीनें करावयाचा व सबंध माल-विक्री व इतर योजनेनुसार परतफेडीची व्यवस्था करावयाची असें या प्रयोगाचें स्वरूप आहे. हा प्रयोग नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहकार्यानें होत आहे. प्रयोगासाठी निवडलेल्या सोसायट्या व त्यांना दिलेल्या कर्जाचा तपशील पुढीलप्रमाणें :—

| | | | |
|---|---|---|---|
| पतपेढ्यांची संख्या : ४ | सभासदांची संख्या : ३३६ | मागील वर्षी मंजूर झालेली कर्जमर्यादा ७३००० रुपये | |
| नवीन योजनेप्रमाणें मंजूर झालेली कर्जमर्यादा | रुपये | अंदाजी उत्पन्नाचे आंकडे | रुपये |
| (१) शेती कर्ज | १०२०७९ | (१) शेती उत्पन्नांतून | २७४०६० |
| (२) खावटी व इतर प्रापंचिक खर्च | ११४२६८ | (२) शेतमजुरींतून | ३५३६५ |
| | | (३) दुग्धव्यवसायांतून | ३५५५ |
| | | (४) इतर | ८३१८ |
| एकूण | २१६३४७ | एकूण | ३२१२९८ रु. |

हे प्रयोग यशस्वी व्हावयाचे तर सभासद पूर्णपणें शिस्त पाळणारे व कार्यवाह अत्यंत कार्यदक्ष हवेत. या उपक्रमास नुकतीच सुरुवात झाली असल्यामुळें इतक्यांत कांहीं अभिप्राय व्यक्त करणें शक्य नाहीं. यांतून थोडेबहुत यश प्राप्त होईल आणि पुढील वर्षी आणखी मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारें प्रयोग करतां येतील एवढीच आशा मी आज व्यक्त करतों.

( महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या वार्षिक सभेंतील अध्यक्षीय भाषण )

**भूतकाळाची वर्तमानाला मदत**—१९२२ सालीं इजिप्त मधील ३ हजार वर्षांपूर्वीच्या तुतानखामेन नांवाच्या राज्याचें थडगें उघडण्यांत आलें. हें थडगें एका पिरामिडच्या आकाराचें होतें. तें उघडल्यावर त्यात एक सोन्याचें सिंहासन व इतर अनेक प्राचीन वस्तु सांपडल्या. ह्या सर्व वस्तूंचे एक फिरतें प्रदर्शन भर-विण्यांत येणार असून, त्यापासून होणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग नाईल नदीच्या जवळील प्राचीन अवशेषांचें जतन करण्यासाठी करण्यांत येणार आहे. आस्वान येथें बांधण्यांत येणाऱ्या धरणामुळें हे अवशेष पाण्याखालीं जाणार आहेत. म्हणून ते येथून हलविण्यांत येणार आहेत.

**म्हैसूरमध्यें ॲल्युमिनमचा कारखाना**—चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत म्हैसूर राज्यांत ॲल्युमिनम तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यांत दरसाल ५० हजार टन ॲल्युमिनम तयार करण्यांत येईल. चौथ्या कार्यक्रमांतील निर-निराळ्या उद्योगधंद्यांतील उत्पादनाचीं उद्दिष्टें अद्याप ठरविण्यांत आलेलीं नाहींत. तीं ठरतील त्या वेळीं ॲल्युमिनमच्या उत्पादनाचें उद्दिष्टहि ठरविण्यांत येईल. म्हैसूरशिवाय महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशांतहि ॲल्युमिनमचे कारखाने काढण्यांत येणार आहेत.

**शेती पदवीधरांना काम नाहीं**—श्रीनगरमधील ३० शेतकी पदवीधरांनीं नोकरी नाहीं म्हणून अन्नसत्याग्रहाचा आश्रय करावा लागल्याचें जाहीर केलें आहे. देशांत अन्नधान्याचा तुटवडा अस-तांना शेतीसारख्या तांत्रिक विषयाचें ज्ञान असणाऱ्यांना काम नसल्याबद्दल त्यांनीं चिंता व्यक्त केली.


# बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., बीड

## मध्यवर्ती कचेरी : बीड

अधिक धान्य पिकविण्याची सध्यांची राष्ट्रीय गरज लक्षांत घेतां व शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना भरपूर कर्ज देणेचें धोरण या बँकेनें आंखलें आहे.

**तरी ही योजना यशस्वी करण्याच्या दृष्टीनें आपली ठेव याच बँकेंत ठेवून राष्ट्रीय कर्तव्यांत सहभागी व्हावें.**

सांपत्तिकस्थिति

( रुपये लाखांत )

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ३८·०५ |
| राखीव व इतर निधि | रु. ४·५८ |
| एकूण ठेवी | रु. ९१·६० |
| खेळतें भांडवल | रु. २९५·४१ |
| एकूण कर्जव्यवहार | रु. २०८·०४ |

आकर्षक व्याजाचे दर

| | |
|---|---|
| चालू खातें | ½ टक्के |
| सेव्हिंग खातें | २ टक्के |
| मुदत ठेवी खातें ३ ते ११ महिने | ३½ टक्के |
| मुदत ठेव एक वर्ष | ४ टक्के |
| मुदत ठेव दोन वर्षें | ४½ टक्के |
| मुदत ठेव तीन वर्षें | ५ टक्के |

**जिल्ह्यांत एकूण शाखा एकोणवीस**

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ना. वि. पांडे
मॅनेजर

भाऊसाहेब काशीनाथराव अजबे, (एम. एल. ए.)
चेअरमन

# संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेखेरीज आतां तरणोपाय नाहीं

## भारताचा नाश टाळण्यांचा एकमेव उपाय

लेखक:—कै. डॉ. गं. मा. फडके, एम. बी. (लंडन), एफ. आर. सी. एस. (इंग्लंड)

*(कै. डॉ. गं. मा. फडके, एफ. आर. सी. एस., ऑनररी डायरेक्टर, फॅमिली वेलफेअर ब्यूरो ऑफ एफ. पी. असोसिएशन ऑफ इंडिया, ह्यांनी संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेनंतर जरुरीप्रमाणें वीर्यवाहक नलिकेची वाट पुन्हा सुरू करून देतां येते, हें स्वतः शस्त्रक्रियांच्या द्वारां सिद्ध करून दिलें; त्यामुळें संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेला अनुकूल वातावरण होण्यास खूपच मदत होणार आहे. डॉक्टर महाशयांनी गेलीं कांहीं वर्षे संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेच्या प्रसारास वाहूनच घेतलें होतें. त्यांच्या मृत्यूमुळें देशाचें कल्पनातीत नुकसान झालें आहे; लोकसंख्या-वाढ रोखून धरण्याची निकड ते पोटतिडकीनें प्रतिपादन करीत आले आहेत. खांटमांडू (नेपाळ) येथें त्यांनीं कांहीं महिन्यांपूर्वी भरलेल्या परिषदेंत वाचलेल्या निबंधांचा सारांश आम्ही येथें देत आहों.)*

भारताची लोकसंख्या भरमसाट झपाट्यानें वाढत आहे काय? तिचें नियंत्रण करणें आवश्यक आहे काय? ह्या प्रश्नांचीं उत्तरें आतां देऊन झालेलीं आहेत. लोकसंख्येच्या वाढीस प्रभावी आळा कसा घालावा, एवढाच काय तो चर्चेचा विषय आहे.

(१) मृत्यूंचें प्रमाण वाढविणें आणि (२) जननांचें प्रमाण कमी करणें, ह्या दोन मार्गांनीं नियंत्रण घालतां येणें शक्य आहे. सुधारलेल्या समाजांत पहिला उपाय संभवतच नाहीं. तेव्हां, जननांचें प्रमाण शक्य तितक्या लवकर खूप खालीं आणण्याचा प्रयत्न करणें, एवढेंच आपल्या हातीं आहे.

### संततिनियमनाच्या साधनांची मर्यादा

संततिनियमनाचीं साधनें वापरून गर्भधारणा टाळतां येणें शक्य असतें. परंतु दाटीच्या वस्तीनें राहणाऱ्या बहुसंख्य गोरगरिबांना हीं साधनें परवडण्याजोगीं नाहींत. ८०% लोक खेड्यापाड्यांतून राहतात; वाहतुकीच्या साधनांच्या अभावीं संततिनियमनाच्या साधनांचा पुरवठा त्यांना सतत चालू ठेवणें कठीण जाईल. हीं साधनें रात्रंदिवस, ज्या ज्या वेळीं पति-पत्नी एकत्र येतात त्या त्या वेळीं, सतत वापरांत पाहिजेत ही आणखी एक मोठी अडचण आहे. विवाहानंतर किमान १०–१५ वर्षे तरी तीं वापरली गेलीं पाहिजेत. प्रारंभींचा, त्यांच्या वापराचा उत्साह टिकला, तरच उपयोग. जेथें संततिनियमनाचीं साधनें वापरण्याची माहिती असणाऱ्या शहरांतील स्त्रियांपैकीं २०% स्त्रिया त्या वापराचे बाबतींत हलगर्जीपणा करतात, तेथें खेड्यांतांची काय कथा? हीं साधनें सूचनेबरहुकूम वापरलीं, तरच १००% उपयुक्त ठरतात; पण इथेंच नव्हे, पाश्चात्त्य पुढारलेल्या देशांतहि, लोक कांहीं काळानें तीं वापरण्याचा कंटाळा करतात; त्या साधनांचा कांहींहि दोष नसतो.

येत्या १०–१५ वर्षांत आपलें जननाचें प्रमाण खूपच खालीं आणतां आलें नाहीं, तर आर्थिक, सामाजिक, राजकीय, नैतिक, सर्व दृष्टींनीं आपल्या देशाचा नाश झाल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां, लोकसंख्येंत वाढ होऊं देणार नाहीं, असाच उपाय आपण योजायला हवा. संततिनियमनाच्या साधनांनीं केवळ तें उद्दिष्ट साध्य होणार नाहीं. ज्या उपायाचा अवलंब करावयाचा, तो स्वस्त, सुलभ आणि वरचेवर करण्याची आवश्यकता नसणारा हवा. भारतांतील सुमारें ४०% कुटुंबांतून तीनपेक्षा जास्त अपत्यें असतात. स्वतःवर शस्त्रक्रिया करून घेण्यासाठीं जे आपण होऊन पुढें येतात, ते बहुधा सर्व ह्या गटांतीलच असतात; त्यांना अपत्यांची शक्यताच दूर करावयाची असते.

### शस्त्रक्रियेचा आग्रह का?

अपत्यसंभव अशक्य करण्याचे दोन प्रकार आहेत: (१) गर्भपात आणि (२) संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया. गर्भपाताचा अवलंब करून जननाचें प्रमाण १० वर्षांत ५०% कमी करून दाखविणारा जपान हा एकमेव देश आहे. युरोपांतील कांहीं देशांनींहि गर्भपाताचा संततिप्रतिबंधासाठीं उपयोग केला आहे. जपानमध्यें संततिनियमनाच्या साधनांच्या वापराचा मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्यांत येत असूनहि गर्भपातच प्रभावी ठरला आहे. भारतांत गर्भपाताला बहुसंख्य जनतेचा पाठिंबा मिळणें अशक्यप्राय आहे. गर्भपात कायदेशीर ठरवला, तरी मोठ्या प्रमाणावर गर्भपातांची सोय करणें व्यवहार्य होणार नाहीं. विशेषतः खेडोंपाडीं त्यासाठीं सुसज्ज इस्पितळांच्या सोयी कराव्या लागतील. तेव्हां उरलेला उपाय म्हणजे संततिप्रतिबंध शस्त्रक्रिया.

संततिप्रतिबंधाची शस्त्रक्रिया अगदीं सोपी असून त्यापासून दुष्परिणाम होण्याचा संभव नसतो. पेशंटची प्रकृति पूर्वीसारखीच कायम राहाते. गेलीं ३० वर्षे अशा शस्त्रक्रिया करण्यांत येत आहेत. पुरुषावरील शस्त्रक्रिया अगदीं सोपी असते; १५ मिनिटांत ती पुरी होते. पेशंट लागलीच घरींहि पाठवला जातो. खेड्यांतच, एका स्वच्छ खोलींत किंवा तंबूंत, लोकल अनेस्थेशियाखालीं अशा शस्त्रक्रिया सहज करतां येतात; त्यासाठीं लागणारीं उपकरणें छोट्या बॅगमध्येंहि मावतात. एकदा शस्त्रक्रिया केली, कीं त्या कुटुंबांत अपत्याचा संभव पूर्णपणें नाहींसा होतो, हा ह्या पद्धतीचा मुख्य फायदा आहे.

### उपयुक्तता पटविली पाहिजे

लोकसंख्येच्या भयानक समस्येवर तीन किंवा अधिक अपत्यें असणारांवर संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करणें, हाच तातडीचा उपाय आहे. सबंध देशभर अशा शस्त्रक्रिया पार पाडल्या पाहिजेत. कुटुंबनियोजनाच्या कार्यकर्त्यांना ह्या पद्धतीची उपयुक्तता पटल्यावर ते दुसरी पद्धति सुचविणारच नाहींत. पण त्यांनाच अद्याप त्याची नीटशी कल्पना आलेली नाहीं. पुरुषाच्या वीर्यवाहक नलिकेवर शस्त्रक्रिया करून किंवा स्त्रीच्या रजोवाहक नलिकेवर शस्त्रक्रिया करून शुक्रजंतु आणि स्त्री-बीज ह्यांचा सर्गमार्गामध्यें संयोग होऊं देण्यास प्रतिबंध करणें हाच ह्या शस्त्रक्रियेचा उद्देश असतो. ह्या शस्त्रक्रियेमध्यें लैंगिक अथवा प्रजोत्पादनाच्या ग्रंथी ह्या कांहीं शरीरांतून काढून टाकल्या जात नाहींत अगर त्यांच्या क्रियेमध्यें कोणत्याहि प्रकारचा बिघाड उत्पन्न होत नाहीं. त्यामुळें पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या कामवासनेंत

फरक होत नाहीं. ह्या शस्त्रक्रियेनंतर कोणतींच विशेष लक्षणें व्यक्तीमध्यें उत्पन्न झाल्याचें दिसून येत नाहीं. पण शस्त्रक्रिया ज्याच्यावर करावयाची त्याला हें कसें पटवून द्यावयाचें, हा खरा प्रश्न आहे. त्याची भीति घालविली पाहिजे. अशा शस्त्रक्रियेनंतर व्यक्तींची प्रकृति सुधारते, असा कित्येक बाबतींत अनुभव आला आहे. त्यांना सुखाचा आस्वाद अधिक समाधानानें घेतां येतो; गर्भधारणेची भीति न उरल्याचा तो परिणाम आहे.

एकदा संततिप्रतिबंधाची शस्त्रक्रिया केली, म्हणजे पुन: संतति हवी असली तरी ती मिळूं शकत नाहीं, अशी पूर्वी कल्पना होती. परंतु आतां शस्त्रक्रियेंतील सुधारणांमुळें आणि नव्या साधनांच्या उपलब्धतेमुळें, शस्त्रक्रियेनंतर दहा-पंधरा वर्षांनींहि वीर्यवाहक नलिकेची वाट पुन: सुरू करून देता येते; अशा शस्त्रक्रियांचे अनुभव अत्यंत उत्साहवर्धक आहेत. दुसरी शस्त्रक्रिया करून पहिली शस्त्रक्रिया रद्दबातल करता येते, ही एक फार मोठी घटना आहे. यामुळें संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करण्यास पुढें येणारांना मोठेंच आश्वासन मिळणार आहे.

### मोठे आकडे, पण शक्य कोटींतले

येतीं दहा वर्षें, दरसाल प्रत्येक १००० लोकवस्तींत पांच जणांवर शस्त्रक्रिया करण्यांत आली, तर दहा वर्षांचे अखेरीस आपलें जननांचें प्रमाण ५०% कमी होईल. ह्याचा अर्थ, ४ कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्रांत दरसाल २ लक्ष शस्त्रक्रिया करायला हव्यात; सबंध भारताचा विचार केला, तर दरसाल अशा शस्त्रक्रियांची संख्या किमान २० लक्ष तरी भरायला हवी. अशा रीतीनें दहा वर्षें गेलीं तर कुठें त्याचा परिणाम नीट दिसूं लागायचा. सकृत्-दर्शनीं हे आंकडे मोठे दिसले, तरी व्यवहारांत ते अगदीं शक्य कोटींतले आहेत. प्रथम प्रारंभ करायचा, तो ४ किंवा जास्त अपत्यें असणारांच्या कुटुंबांतून. लहान कुटुंबांचे फायदे लोकांना कळूं लागले, म्हणजे दुसरें अपत्य झाल्याबरोबरहि शस्त्रक्रियेसाठी लोक पुढें येऊं लागतील.

संततिनियमनाचीं साधनें मोफत पुरविण्याला एवढा प्रचंड खर्च येईल, कीं तो सरकारला परवडणारच नाहीं. शस्त्रक्रियेनें संततिप्रतिबंध करायला संततिनियमनाच्या साधनांपेक्षा वीस पटीनें खर्च कमी येतो. आपल्या ह्या गरीब देशांत ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. महाराष्ट्रांत, संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियांचें एक शिबिर भरविण्यांत आलें होतें, त्यांत २२२४ जणांवर सहा दिवसांत शस्त्रक्रिया करण्यांत आल्या; प्रत्येक पेशंटमागें १९ रु. खर्च आला. त्यांत, प्रत्येकाला खर्चासाठी दिलेल्या १० रुपयांचा समावेश आहे. म्हणजे, खरोखरीनें, प्रत्येक शस्त्रक्रियेस फक्त ९ रु. च खर्च आला.

आपल्या देशांत, लोकसंख्या आटोक्यांत ठेवण्यास संततिप्रतिबंधाच्या शस्त्रक्रियेला पर्यायच नाहीं. ह्या शस्त्रक्रिया लोकप्रिय करण्याच्या मार्गास तावडतोब लागलें पाहिजे. जननाचें प्रमाण १० वर्षांत ५०% उतरविलेंच पाहिजे, अशा नुसत्या घोषणांचा कांहीं उपयोग नाहीं, प्रत्यक्ष कृति पाहिजे. उद्दिष्ट फार मोठें आहे हें खरें आहे, त्याखेरीज ठराविक वेळांत इष्ट फलप्राप्ति होणारच नाहीं. आपलें सबंध घरच पेटलें आहे; आतां टंगळमंगळ करून चालणार नाहीं; नाहीं तर राखरांगोळी अटळ आहे.

शस्त्रक्रिया करायची, ती पुरुषावरच, असें का? स्त्रियांवरील शस्त्रक्रियेलाहि महत्त्वाचें स्थान नाहीं का? स्त्रियांपेक्षा पुरुषांवर मोठ्या प्रमाणावर शस्त्रक्रिया करणें अधिक सोपें आहे; हेंच त्याला उत्तर आहे; जास्त सांगण्याची जरूरी नाहीं.

### उपाय निकरानें अमलांत आणा

युरोपांतील एकेका सबंध देशाच्या लोकसंख्येइतक्या संख्येनें आपली लोकसंख्या दरसाल वाढत आहे. परिस्थिति भयानक आहे! आतां वेळ गमावून भागणार नाहीं. लोकसंख्या वाढूं न देण्याचें दुसरें कुठलें प्रभावी साधन उपलब्ध होत नाहीं, तोंपर्यंत संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेखेरीज तरणोपाय नाहीं. आणीबाणीच्या वेळेचा उपाय असें त्याला वाटलें तर म्हणा, पण तो उपाय निकरानें अमलांत आणा; येतीं कांहीं वर्षें त्यावर सर्व लक्ष केंद्रित करा. त्याखेरीज आपला निभाव लागणार नाहीं.

संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया सर्व दृष्टींनीं कशी हितकारक आहे हें पटवून देण्यासाठी कितीहि जीव तोडला, मुद्दे मांडले, तरीसुद्धां आपल्यांतीलच कित्येकजण त्याला अनैसर्गिक आणि असंस्कृत म्हणून ती त्याज्य असल्याचें सांगतील. त्यांना आपले राष्ट्राध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् ह्या तत्त्ववेत्याच्या शब्दांतच उत्तर दिलेलें बरें. ते म्हणतात, "देवानें आपणांस बुद्धि दिली असेल, तर ती वापरण्यासाठीच ना? बुद्धि ही मोठी दैवी देणगी आहे. फाजील जनन हा सृष्टीचा क्रम आहे; त्यांतील भरमसाट वाढीला आळा घालण्यासाठी आपण आपल्या बुद्धीचा वापर केला पाहिजे. निसर्गाचें उपकारक नियमन, म्हणजेच संस्कृति होय."


नवीन माल : : : : : योग्य किंमत

★ जरीचीं लुगडीं, ★ साड्या, ★ सुंदर बनारसी शालू

व

—— सर्व मिलचा माल ——

याकरितां

**शाहाडे आठवले प्रा. लि., दादर**

मुंबई २८.

( टे. नं. ६०५५४ )

# जपाननें कष्टानें मिळविलेलें वैभव

## जीवनाचा मनमुराद आस्वाद घेण्याची वृत्ति

*दुसऱ्या महायुद्धांत जपान खचला; पण कांहीं वर्षांतच जपानी नागरिकांनीं आपली आर्थिक घडी सावरली; आजच्या जपानांत अणुबाँबची स्मृति शिल्लक असली तरी तेथील लोक स्वकष्टार्जित समृद्धीचा आल्हाददायक उपभोग पुरेपूर घेत आहेत. भरभराटीबरोबरच जपानी लोक झपाट्यानें बदललेहि आहेत.*

दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपानी लोकांचें चित्र काढतांना परदेशीय लोक त्यांच्या तीन वैशिष्ट्यांचा प्रामुख्यानें उपयोग करीत असत. जपानी माणूस म्हटला कीं तो ठेंगणा, सोन्याचे दांत बसविलेला आणि चष्मा घातलेला असावयाचाच असा संकेतच रूढ झालेला होता. निदान परदेशीय लोकांची तशी समजूत होती आणि त्या समजुतीवर आधारलेली त्यांचीं व्यंगचित्रेंहि काढण्यांत येत असत. जपानी लोकांच्याविषयीं प्रसृत असलेली ही कल्पना अगदींच चुकीची होती, असेंहि नाहीं. तिला कांहींसा आधार होताच. दुसरें महायुद्ध संपून आतां २५ वर्षांवर काळ लोटला आहे. त्या वेळचें जपानी लोकांचें जीवन आणि त्यांचा आहार असा होता कीं, त्यांच्या खुज्या अंगकाठीचें आश्चर्य वाटण्याचें कारणच नाहीं. त्या वेळीं जपानी लोकांचा मुख्य आहार म्हणजे मासे आणि तांदूळ होता. ह्या तऱ्हेच्या आहारानें घट्टपुष्ट आणि निरोगी माणसें तयार होणें अशक्यच आहे. गेल्या पंचवीस वर्षांच्या काळांत मात्र जपानी लोकांनीं आहाराच्या बाबतींत खूप मजल मारली आहे. शहरांत काय आणि खेड्यांत काय, सर्वच ठिकाणीं आहाराच्या संवयींत खूप बदल घडून आलेला आहे. आहाराच्या बाबतींत फक्त नव्हे तर कपडे, घरें, इत्यादींबाबतहि संवयी बदललेल्या आढळून येतात. जपानी लोकांची जीवनाची राहणी सुधारली आहे. ते आतां अधिक चांगलें अन्न खातात; अधिक चांगले कपडे वापरतात आणि अधिक सुखसोयींचा उपभोग घेतात. त्यामुळें जपानमधील स्त्री-पुरुषांचें आरोग्यहि आतां खूपच सुधारलेलें आहे. तरुण मुलें आणि मुली आतां युद्धपूर्व पिढीच्या मानानें अधिक उंच झालेलीं आणि बांधेसूद दिसून येतात.

त्यांचे दांत चांगले स्वच्छ असतात; त्यांची दृष्टि निकोप असते आणि त्यांचें सर्वसामान्य आरोग्यहि सुधारलेलें दिसून येतें. जपानमधील लोकांत घडून आलेला हा बदल कशामुळें झाला असें विचारलें तर जपानांतील आर्थिक भरभराटीला आणि उत्कर्षाला त्याचें श्रेय द्यावें लागेल. पण, ह्याचा अर्थ जपानी लोकांनीं कांहींच केलें नाहीं असा मात्र नाहीं. उलट, आर्थिक भरभराटीचें सर्व श्रेय संपूर्णपणें त्यांनाच द्यावें लागेल. कारण, त्यांनींच आपल्या अपार कष्टानें ही श्रीमंती मिळविलेली आहे. अर्थात् कांहीं अनुकूल परिस्थितीचा त्यांना फायदा झाला हें खरें. गेल्या युद्धांतील पराजित देश म्हणून जपानला स्वसंरक्षणाचा फारसा खर्च नव्हता; शिवाय अमेरिकेनें जपानच्या आर्थिक पुनरुत्थानाला मदतहि केली. तरीसुद्धां जपानी लोकांच्या कष्टाळू वृत्तीचें त्यांच्या भरभराटीमधील स्थान विसरून चालण्यासारखें नाहीं.

### आकर्षक पोशाख केलेल्या स्त्रिया

कुठेंहि गेलांत तरी तुम्हांला जपानच्या समृद्धीच्या खुणा दिसल्याशिवाय राहणार नाहींत. ह्या बाबतींत शहरें आणि ग्रामीण विभाग असा फरक पडत नाहीं. बांधकामाची तर नुसती धमाल चाललेली दिसून येईल; लक्ष द्यावयाचें नाहीं म्हटलें तरी, तिकडे लक्ष गेल्याशिवाय राहणार नाहीं. शहरांत अनेक मजले असलेल्या शेंकडों इमारती उठविण्यांत येत आहेत. ह्याचा अर्थ ग्रामीण विभागांत बांधकाम कांहींच होत नाहीं, असा नाहीं. दिवसाच्या कोठल्याहि प्रहरांत हजारों रेस्टॉरंट, चहागृहें, मद्यकेंद्रें आणि रात्रीचे क्लब्स गिऱ्हाइकांनीं भरलेले असतात. त्यांच्यांतील वर्दळीला खळ म्हणून कधीं पडत नाहीं. फाटके कपडे घातलेला एखादा मनुष्य औषधालासुद्धां सांपडणार नाहीं. गर्दीच्या वेळीं भुयारी रेल्वेच्या दरवाजापाशीं तुम्ही उभे राहिलात आणि त्यांतून बाहेर पडणाऱ्या माणसांच्या अंगावर नजर टाकलीत तर एकहि स्त्री अगर पुरुष गबाळया अगर जीर्ण पोशाखांत सांपडणें मुष्कील जाईल. आजकालच्या जपानी मुली अद्ययावत् पोषाखाच्या निस्सीम उपासक आहेत. त्यांचे पोशाख कसे अगदीं व्यवस्थित असतात. ह्या बाबतींत अधिकारवाणीनें बोलणाऱ्यांचें असें मत आहे कीं, जपानी स्त्रिया ह्या जगांतील उत्तम पोशाख केलेल्या स्त्रियांत मोडतात. ह्या मताबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. स्त्रियांचे कपडे शिवण्याच्या जपानमधील धंद्याची भरभराट ह्याचा उत्तम पुरावा आहे. स्त्रियांची आत्मकेंद्रित वृत्ति प्रसिद्धच आहे. तिला अनुसरून जपानी तरुणी आपल्या एकेका पोशाखासाठी २७० रुपयांची म्हणजेच २० हजार येनची रक्कम बिनदिक्कत खर्च करते. ही गोष्ट उच्च वर्गांतील जपानी स्त्रियांबाबतच खरी आहे असें नव्हे. कारकुनी करणाऱ्या अगर दुकानांतून मदतनिसाचें काम करणाऱ्या जपानी तरुणींहि इतके पैसे सहज खर्च करतात. अशी स्थिति असल्यावर कपडे शिवण्याचें व तयार करण्याचें शिक्षण देणाऱ्या शाळा पैशाच्या खाणी व्हाव्यात ह्यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. ह्यांपैकी कांहीं भरभराटलेल्या शाळा अनेक मजले असलेल्या इमारतींतून चालविल्या जातात. ह्याच इमारतींमधून त्यांत काम करणाऱ्या स्त्रियांची रात्रीं राहण्याचीहि सोय करण्यांत येतें.

### राहणींत सुधारणा

नव्यानें बांधण्यांत येणाऱ्या व देखाव्यांचा कायापालट करणाऱ्या सर्वच मोठ्या इमारती कचेऱ्यांच्या असतात असेंहि नाहीं. राहण्याच्या बिऱ्हाडांच्या जागा असलेल्या मोठमोठ्या इमारतीसुद्धां जिकडे तिकडे बांधण्यांत येत आहेत. इमारतींना लागणारी जागा शहरांतून अपुरी पडत आहे आणि त्याचा परिणाम म्हणून अनेक मजले असणाऱ्या उंच उंच इमारती बांधल्या जात आहेत. पूर्वीं जपानमधील बांधकामांत लाकडाचा व इतर हलक्या वजनाच्या सामानाचा उपयोग बराच करीत असत. परंतु टोलेजंग इमारती बांधण्यास प्रारंभ झाल्यावर ह्या साहित्याचा उपयोग कमी कमी होऊं लागला आणि जेमतेम कशींतरी उभीं करण्यांत येणारीं घरें नाहींशी होऊं लागलीं आहेत. इमारतींचे मजले तर वाढत चाललेच आहेत; परंतु त्यामधील राहावयाच्या जागांचीं भाडींहि तशींच उंच होत चाललीं आहेत. विलासी पद्धतीनें बांधलेल्या राहण्याच्या घरांसाठी दरमहा २ लाख येन अथवा रु. २,६०० भाडें द्यावें लागतें. अवघ्या दोनच झोपण्याच्या खोल्या

ही दीपावली आमच्या असंख्य ठेवीदारांस आनंदाची, सुखाची व भरभराटीची जावो !

**आपला पैसा सुरक्षित राहील कीं नाहीं याची मुळींसुद्धां विवंचना करण्याचें कारण नाहीं.**

जिल्ह्यांतील ३७ शाखांमार्फत आपल्या सेवेंत सदैव तत्पर असलेली सेवा, शाश्वती आणि क्षमता यांची प्रतीक असलेली

# नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

दूरध्वनी क्र. ५११ पोस्ट बॉक्स क्र. १९

१२५१, दामोदर रोड, नाशिक

( ३१-८-६४ अखेर )

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भाग भांडवल | रु. ६८–२६ लाख |
| ठेवी | रु. ३५२–५४ लाख |
| दिलेलीं कर्जें | रु. ५४९–५४ लाख |
| खेळतें भांडवल | रु. ७१६–३२ लाख |

—ठेवीवरील व्याजाचे दर—

सेव्हिंग्ज बँक २॥ टक्के

मुदतीच्या ठेवी ३, ३॥ ते ५ टक्के

तु. मो. सोनवणे, मॅनेजर — न. का. ठाकरे, चेअरमन



# इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.

## इचलकरंजी

( स्थापना ७ फेब्रुवारी १९६३ )

**अल्पावधींत नेत्रदीपक प्रगति**

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. २,४५,०००.०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ३८,०००.०० |
| ठेवी | रु. नऊ लाखांवर |
| खेळतें भांडवल | रु. चौदा लाखांवर |

कॉल डिपॉझिटस् साडेपांच टक्के दरापर्यंत स्वीकारलीं जातात.

मुदतबंद ठेवीवर साडेचार ते साडेसहा व्याजाचा दर दिला जातो.

**बँकिंगचे सर्व धंदे केले जातात.**

अधिक माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

आर. पी. कुलकर्णी, मॅनेजर — के. बी. आवाडे, चेअरमन






# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक

लिमिटेड, मुंबई-४

शाखा : • फोर्ट • दादर • वरळी • वडाळा • माहिम • पुणे व • बेळगांव

महिला शाखा : सारस्वत बँक गृह, मुंबई ४



तारेचा पत्ता : सहकार बँक टेलिफोन नं. ९७

धुळें जिल्ह्यांतील शेतकरी बांधवांच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीनें सहकारी तत्त्वावर भरीव स्वरूपाचें कार्य करणारी एकमेव संस्था म्हणजेच—

# दि धुळें डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., धुळें

( स्थापना : १३–९–१९५७ )

मुख्य कचेरी : गरुड बाग, धुळें, ( पोष्ट बॉक्स नं. ३ )

चेअरमन : श्री. पुरुषोत्तम काळू पाटील, बी. कॉम., एलएल. बी.

व्हाइस चेअरमन : श्री. वसंतराव दगाजीराव पाटील

सहकारी शेती सोसायट्यांना भरपूर भांडवल-पुरवठा करणारी भारतांतील एकमेव बँक

ह्या बँकेंत ठेवलेला पैसा शेतकऱ्यांच्या व औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठीं वापरला जातो.

बँक अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारते.

बँकेचे मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची अल्प भाड्यांत सोय आहे, त्याचा जनतेनें फायदा घ्यावा.

ऑडिट वर्ग " अ " ता. ३०–६–१९६४ अखेर

| | |
|---|---|
| ( १ ) भरपाई झालेलें शेअर्स भांडवल | रु. ५४·०२ लाख |
| ( २ ) ठेवी | रु. २ कोटी, ११ लाख |
| ( ३ ) कर्जें | रु. ३ कोटी, ४७ लाख |
| ( ४ ) खेळतें भांडवल | रु. ४ कोटी, ४५ लाख |

जिल्ह्यांत ह्या बँकेची मुख्य कचेरी व ३२ शाखा कार्य करीत आहेत.

जी. क्यू. शेख, मॅनेजर

असणाऱ्या ह्या घरांसाठी इतकें भाडें देणारे ग्राहकहि भरपूर असतात. स्वतंत्र गाळ्यांतून राहण्याकडे लोकांचा कल अधिक दिसून येतो. त्यामुळें त्यांची राहण्याची पद्धतहि बदलली आहे. लोक आतां अधिक सुखांत राहूं लागले आहेत. हिंवाळ्याच्या दिवसांत कोळशाच्या शेगडीच्या भोंवतीं एकाच खोलींत दाटी-वाटीनें बसण्याची पद्धत आतां नाहींशी झाली आहे. कोळशाच्या ऐवजीं गॅस, केरोसिन वापरण्याची प्रथा फैलावली आहे. इमारतीं-मध्यें उष्णता पुरविण्याची मध्यवर्ती सोय बहुधा करण्यांत येते. ह्या राहणीच्या संवयीमुळें पूर्वी जमिनीवरच अधिक काळ वावर-णारा जपानी नागरिक आतां खुर्च्यांटेबलांचा अधिक प्रमाणांत वापर करूं लागला आहे. अष्टौप्रहर जमिनीवर बसण्याच्या संवयी-मुळें जपानी लोकांच्या गुडघ्याखालील पायाला बांक आलेला आढळून येई; पण आतां त्यांचे पाय चांगले ताठ व सरळ झालेले दिसून येतात.

## आहारांत झालेला बदल

युद्धानंतरच्या पहिल्या कांहीं वर्षांत जपानमध्यें तांदळाची टंचाई होती. त्यामुळें लोकांना आपल्या आहारांत पावरोटीला अधिक स्थान नाइलाजानें का होईना द्यावें लागलें. आहार समतोल नसला तर त्याचे आरोग्यावर वाईट परिणाम होतात ह्याची लोकांना जाणीव झाली आणि आहारांत बदल करण्याची जरुरी त्यांना पटली. त्याचबरोबर सरकारनेंहि आहारविषयक प्रचाराचा धडाका चालू ठेवला. त्यामुळें पावरोटी ही आतां जपानी नागरिकांच्या आहारांत कायमची आलेली आहे. शहरांतील लोक आतां युरोपिअन पद्धतीचा आहार रोज घेऊं लागले आहेत. त्यांची न्याहारी आतां भाजलेला पाव, अंडीं आणि कॉफी ह्यांच्याशिवाय पार पडत नाहीं. परिणामीं, जपानमध्यें चहाचा व कॉफीचा खप खूपच वाढला आहे. १० वर्षांपूर्वी जपान दरसाल अवघी २ हजार टन कॉफी आयात करीत असे; आतां कॉफीची आयात २० हजार टनांपेक्षाहि जास्त झाली आहे. ह्याच काळांत चहाची आयात ५ लाख किलोग्रॅम्सवरून २० लाख किलोग्रॅम्स-पर्यंत वाढली आहे. नागरिकांत आरोग्यविषयक जाणीव मोठ्या-प्रमाणावर झालेली असल्यानें जपानमध्यें जीवनसत्त्वांच्या गोळ्यांचा खप सारखा वाढत आहे. अर्थातच त्यांचें उत्पादन करणारे कारखानेहि भरभराटलेले आहेत. वृत्तपत्रें, रेडिओ आणि दूरचित्र-वाणी ह्यांच्या द्वारां जीवनसत्त्वाबद्दल सारख्या जाहिराती चालू असतात आणि ह्या जाहिरातींसाठी प्रचंड रकमा खर्च करण्यांत येत असतात. दूरचित्रवाणीवर जाहिराती देणाऱ्यांत, औषधांच्या कारखानदारांचा पहिला अनुक्रम लागतो.

## रिकाम्या वेळेचा प्रश्न

आधुनिक पद्धतीच्या राहणीला अनुसरून अनेक प्रकारच्या छोट्या-मोठ्या उपकरणांनीं आणि साधनांनीं जपानी गृहिणींच्या घरांत प्रवेश मिळविला आहे. जपानी स्वयंपाकघर म्हटलें कीं त्यांत स्वयंपाक करण्याच्या विजेच्या व गॅसच्या शेगड्या, कपडे धुण्याचें यंत्र, शीतक आणि इतर आधुनिक साधनें असायचींच हें ठरून गेलें आहे. ह्या सगळ्या गोतावळ्यांत दूर चित्रवाणीला स्थान नाहीं असें कसें होणार? श्रम वांचविणारी इतकीं साधनें हाताशीं असल्यावर घरधानिणीला वेळ घालविण्यास मोठी पंचाईत पडली नाहीं, तरच नवल. लोकांना असणाऱ्या रिकाम्या वेळाची दोन वर्षांच्या काळांतील राष्ट्रीय पाहणी जपान-मध्यें नुकतीच करण्यांत आली. त्यावरून असें दिसून आलें कीं, जपानमधील कुटुंबीय माणसांना आतां पूर्वीपेक्षा अधिक मोकळा वेळ मिळूं लागला आहे. जपानी माणूस आतां कामाच्या दिवशीं दररोज सरासरीं ४–४॥ तास रिकामा वेळ काढूं शकतो. रविवार-सारख्या सुट्टीच्या दिवशीं तर त्याला ७ तासांपर्यंतहि मोकळा वेळ मिळूं शकतो. जपानमधील गृहिणींनाच रिकामा वेळ सांपडतो असें नव्हे. उद्योगधंदे, शेती आणि किरकोळ व्यापार ह्यांत काम करणाऱ्या स्त्रियांचे कामाचे तासहि एक ते तीन तासांनीं कमी करण्यांत आले आहेत. रिकामा वेळ सांपडं लाग-ल्यावर तो घालवावा कसा, हा प्रश्न आलाच. जपानी स्त्रियांच्या हातांत पैसा आणि वेळ दोन्ही सांपडल्यावर त्यांचा विनियोग करणें प्राप्तच झालें. त्यांतून सुटका कशी होणार? मग काय, कांहीं हुशार लोकांनीं जपानी स्त्रियांना गोल्फ खेळण्यासाठी प्रवृत्त केलें. त्या खेळाच्या सोयी केल्या. कांहींनीं त्यांना मोटारींतून फिरण्याचें वेड लावलें, तर कांहींनीं त्यांना प्रवासाचें प्रलोभन दाखविलें. अशीं अनेक प्रकारचीं वेडें बरींचशीं वावटळीसारखीं आलीं व गेलींहि. परंतु गोल्फसारखे कांहीं छंद जपानमध्यें टिकून राहिले आहेत. युद्धांत आणि त्यानंतरच्या कांहीं वर्षांत जपानी लोकांनीं हालअपेष्टा काढल्या; टंचाईचे दिवस पाहिले; महागाई पाहिली. पण आतां चित्र पालटलें आहे. आतां ते जीवनाचा मनमुराद आस्वाद घेत आहेत, आणि एकेकाळीं चैनीच्या म्हणून गणल्या गेलेल्या अनेक गोष्टी त्यांच्या समाजजीवनांत स्थिरता पावल्या आहेत. सगळ्या वेडांत गोल्फच्या वेडानें पहिला मान पटकाविला आहे. जीवनांत यशस्वी झाल्याची निशाणी म्हणजे गोल्फचा खेळ खेळण्याची आर्थिक पात्रता. व्यापारधंद्यांत राबणाऱ्या कोठल्याहि महत्त्वाकांक्षी तरुणाला गोल्फ खेळणें व त्याविषयीं चर्चा करणें समाजांत प्रतिष्ठितपणा मिळाल्याचें एक लक्षण वाटतें. त्यामुळें मोठमोठ्या इमारतींच्या गच्च्यांवरून गोल्फचा सराव करण्याची सोय केलेली आहे ह्यांत आश्चर्य नाहीं. जेवणाची सुट्टी झाली रे झाली, कीं गोल्फ खेळण्यास उत्सुक असलेल्या तरुणी आणि तरुण हातांत गोल्फची काठी घेऊन वर धावलेच म्हणून समजावें. गोल्फ खेळण्याची सोय करणें हा एक मोठा धंदाच होऊन बसला आहे. गोल्फच्या क्लबांत प्रवेश मिळविण्या-साठी १० लाख येन अथवा १३ हजार रुपये प्रवेश फी द्यावी लागते. तरीहि हे क्लब्स चांगले चाललेले आहेत.

## भ्रमंतीची अनिवार हौस

एखादी छोटीशी मोटारगाडी असणें हें आतां स्वप्न राहिलेलें नाहीं. पुष्कळ मध्यमवर्गीय जपानी कुटुंबें आतां स्वतःच्या मालकीची गाडी वापरतात. कितीतरी तरुण गृहिणी मोटार चालविण्याचें शिक्षण देणाऱ्या शाळांतून गर्दी करतात. मोटार चालविणें शिकून पक्का परवाना मिळविण्यासाठी सुमारें ३० हजार येन अथवा ४०० रुपये खर्च येतो. परंतु हा खर्च करण्याचें जपानमधील स्त्रियांना कांहींच वाटत नाहीं. परदेशी प्रवासाला जाण्याची हौस अलीकडे फार वाढलेली आहे. निसर्गरम्य हवाई बेटाला जातां यावें म्हणून कित्येक जण पैसा सांठवीत असतात. परदेशांत प्रवासाला जाण्यावर असणारी परदेशीय हुंडणावळीवरील बंधनें गेल्या एप्रिलपासून रद्द करण्यांत आलीं आहेत. प्रवासी कंपन्या, विमान कंपन्या आणि बँका लोकांनीं परदेशांत प्रवास करावा म्हणून अनेक प्रकारच्या सवलती देऊं लागल्या आहेत. नाना प्रकारच्या योजना काढून परदेशी प्रवासाला उत्तेजन देण्यांत येत आहे. "आतां बचत करा, मग प्रवास करा" अशासारख्या योजनांत दरमहा थोडी थोडी रक्कम बचत करून दोनतीन वर्षांनीं परदेशी प्रवासाची सोय करण्यांत येते. बचतीची रक्कम परदेशां-तील प्रवासाचा काल आणि त्याचें अंतर ह्यावरून ठरविण्यांत येते. हवाई बेटाच्या आठ दिवसांच्या प्रवासापासून जगाच्या प्रवासापर्यंत

सर्व प्रवासाची व्यवस्था करणाऱ्या संघटना आहेत. प्रवासासंबंधीं प्रवाशाला अनेक प्रकारची जरुरीची माहिती पुरविणाऱ्या पुस्तिका काढण्यांत आलेल्या आहेत; ह्या पुस्तिकांतून जगांतील अनेक प्रेक्षणीय स्थळांची माहिती देण्यांत आलेली आहे. प्रवास करावयाचा तर ज्या देशांत प्रवासी जाणार असतील तेथील रीतिरिवाजांची आणि चालचलणुकीची माहिती प्रवाशांना लागणारच. ती पुरविणारे अभ्यासक्रमच अनेक हुशार लोकांनीं चालू केले आहेत. अभ्यासक्रमांत युरोपांतील लोकांच्या जीवनाची व वागणुकीची पद्धत फी घेऊन उत्तम तऱ्हेनें शिकविण्यांत येते. होनोलुलूसारख्या प्रवाशांना आकर्षण वाटणाऱ्या ठिकाणीं तर कांहीं जपानी धंदेवाल्यांनीं कोट्यवधि डॉलर्स खर्चून हॉटेल्स उघडलीं आहेत.

### कशाला उद्यांची बात ?

शाळा अगर कॉलेजांतून शिक्षण पुरें करून बाहेर पडणाऱ्या उमेदवाराला जपानमध्यें नोकरीची पंचाईत कधींच करावी लागत नाहीं. कुशल कामगारांना इतकी मागणी आहे कीं अनेक कंपन्यांतील निरीक्षक शाळाकॉलेजांतून चांगल्या माणसांना पारखून घेण्यासाठी कित्येक महिने आधीं नियमितपणें जात असतात. शिक्षण झाल्याबरोबर ह्या कुशल कामगारांनीं आपल्या कारखान्यांत यावें म्हणून त्यांना नाना प्रकारचीं प्रलोभनें दाखविण्यांत येत असतात. अगदीं मूर्ख सोडून इतर कोठल्याहि माणसाला जपानमध्यें आपल्या आवडीचें काम निवडतां येतें, आणि तें मिळतेंहि. आजच्या जपानचें जीवन हें असें आहे. तेथील दुकानांतून देशी आणि विदेशी माल कांठोकांठ भरून राहिला आहे. सर्व देशच पैसा खर्च करण्याच्या लाटेवर स्वार झालेला आहे. लोकांच्या मनावर भोगवादाचा पगडा बसूं लागलेला आहे. लोकांत जडवादी प्रवृत्ति वाढत चाललेली दिसत आहे. आजचा दिवस मजेंत घालवायचा, उद्यांची काळजी उद्यां करावयाची, अशी मनोवृत्ति दिसून येते. अलीकडे तर ही प्रवृत्ति बळावत चालली असून चालू घटकेचा उपभोग तन्मयतेनें घेण्यांतच सर्व रममाण झालेले आहेत.

---

**लोकसंख्येच्या वाढींत गुजरात पहिलें**—भारतामधील घटक राज्यांत लोकसंख्येच्या वाढीच्या वेगाच्या बाबतींत गुजरात राज्याचा अनुक्रम पहिला लागतो. हिंदमधील लोकसंख्येच्या वाढीचा सरासरी वार्षिक वेग २·३ टक्के आहे. पण गुजरातमधील लोकसंख्येची वार्षिक वाढ २·७ टक्क्यांनीं होत आहे. गुजरात राज्याच्या शेतकी मंत्र्यांनीं ह्या विषयासंबंधीं बोलतांना अशी चिंता व्यक्त केली कीं, अन्नधान्याच्या उत्पादनवाढीचे कितीहि प्रयत्न केले तरी ते ह्या वाढीपुढें फोल ठरतील.

**व्याज देण्याबाबत सवलत**—पश्चिम जर्मन सरकारनें भारताला आर्थिक मदत म्हणून १७ कोटी मार्कसचें कर्ज दिलेलें आहे. ह्या कर्जावरील व्याजाचा दर ५·५ टक्के असा आहे. परंतु ह्या व्याजापैकीं २·५ टक्के व्याजाची रक्कम रुपयांच्या चलनांत देण्याची सवलत जर्मनीनें भारताला दिली आहे. उरलेलें ३ टक्के व्याज मात्र परदेशीय चलनाच्या रूपांत द्यावें लागणार आहे.

**चीनला अन्नधान्याचा पुरवठा**—१९६४–६५ सालांत चीनला १० लाख टन अन्नधान्याचा पुरवठा करण्याची तयारी फ्रान्सनें दाखविली आहे. गेल्या तीन वर्षांपासून फ्रान्स चीनला अन्नधान्याची विक्री करीत आहे. परंतु ह्या वर्षी करण्यांत येणारा पुरवठा मागील पुरवठ्यापेक्षा दुप्पट अधिक आहे. फ्रान्स व चीन ह्यांचे व्यापारी संबंध अलीकडे वाढत चालले आहेत.

### मुळा पाणीपुरवठ्यासाठी रशिअन यंत्रसामग्री

अहमदनगर जिल्ह्यांतील शेतीला पाण्याचा पुरवठा करण्यासाठी नगर शहराजवळ मुळा नदीवर धरण बांधण्याच्या कामाला तीन वर्षांपासून सुरुवात झालेली आहे. परंतु ह्या व इतर कांहीं पाणीपुरवठ्याच्या योजनेचा प्रगति जलदीनें करण्याच्या कामीं आधुनिक यंत्रसामग्रीचा तुटवडा भासत होता. मुळा पाणीपुरवठ्याच्या योजनेचें काम त्वरित करण्यासाठी रशिआनें महाराष्ट्र सरकारला ४० लाख रुपये किंमतीची यंत्रसामग्री देण्याचा करार केला आहे. ह्या यंत्रसामग्रींत प्रत्येकीं ३०० अश्वशक्तीचे ६ ट्रॅक्टर्स आणि माती हलविण्याचें काम करणारीं २५ यांत्रिक खोरीं ह्यांचा समावेश आहे. मुळा नदीवर बांधण्यांत येत असलेल्या ह्या धरणासाठी आधुनिक बांधकामाच्या यंत्रसामग्रीची फार गरज होती. कारण, धरण मातीचें बांधण्यांत येणार आहे. आणि तें बांधण्यासाठी २५ कोटी घनफूट मातीचा उपयोग करावा लागणार आहे. नगरजवळ बांधण्यांत येत असलेल्या ह्या धरणाची लांबी ९,२५० फूट होणार असून जास्तींत जास्त उंची १६६ फूट असेल. धरणांत ८७८ चौरस मैल क्षेत्रांतील पाण्याचा सांठा होऊं शकेल. धरणाच्या पाण्यामुळ तीन तालुक्यांतील २·१९ लाख एकर जमीन कालव्याच्या पाण्याखालीं येईल. मुळा योजना पूर्ण होण्यास सुमारें १५ कोटी रुपये खर्च येणार आहे. १९६५ च्या पहिल्या तिमाहींत रशिअन यंत्रसामग्री हाताशीं येईल असा अंदाज आहे. धरणाच्या बांधकामासाठी लागणारी अशी यंत्रसामग्री रशिआनें भारतांतील इतर कामासाठींहि दिलेली आहे. परंतु महाराष्ट्राला ती पुरविण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. पाणी-पुरवठ्याचीं कामें करण्यासाठी लागणाऱ्या परदेशीय चलनांतील खर्चासाठी महाराष्ट्राला फक्त १ कोटी रुपये मिळणार आहेत.

---

### प्लॅस्टिकच्या उद्योगधंद्याची प्रगति

ऑल इंडिया प्लॅस्टिकस् मॅन्युफॅक्चरर्स परिषदेचें १७ वें अधिवेशन मुंबई येथें भरविण्यांत आलें होतें. संघटनेचे अध्यक्ष श्री. पारीख ह्यांनीं धंद्याच्या प्रगतीविषयीं आणि त्याच्यापुढें असणाऱ्या अडचणींविषयीं ह्या प्रसंगानें माहिती सांगितली. ते म्हणाले कीं, प्लॅस्टिकच्या धंद्याला लागणाऱ्या कच्च्या मालाचें उत्पादन १९६१ च्या मानानें १९६३ सालीं जवळ जवळ दुपटीनें अधिक झालें. १९५५ सालीं कच्च्या मालाचें उत्पादन अवघें ७०० टनांच्या आसपास होतें तें. १९६१ सालीं १२ हजार ७४५ टनांपर्यंत वाढलें आणि १९६३ सालीं तर २५ हजार टन कच्च्या मालाचें उत्पादन करण्यांत आलें. कच्च्या मालाचें उत्पादन जसजसें वाढूं लागलें तसतशी त्याची परदेशांतून होणारी आयात कमी होऊं लागली. १९६१–६२ सालीं धंद्यासाठीं लागणाऱ्या कच्च्या मालाची आयात करण्यासाठी ७·७७ कोटी रुपये खर्च करावे लागले होते. १९६२–६३ सालीं कच्च्या मालासाठी ६·४८ कोटी रुपयेच खर्च करावे लागले. चालू सालीं ह्या धंद्यानें निर्यातीचा उच्चांक गांठला आहे. १९६५–६६ सालांत ५ कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. परंतु आतांच २·६४ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात करण्यांत येऊं लागला आहे. १९६१-६२ सालीं अवघा ८३ लाखांचा माल निर्यात करण्यांत आला होता. ह्या धंद्यावर जबर कर बसविण्यांत आलेला आहे. त्यामुळें ४ थ्या पंचवार्षिक योजनेंत ठरविण्यांत आलेलें ४ लाखांचें प्लॅस्टिकचें उत्पादन गांठतां येईल किंवा नाहीं ह्याची खात्री देतां येत नाहीं. हा धंदा अजूनहि विकासाच्या अवस्थेंत असल्यामुळें करांच्या भारामुळें त्याच्या विकासांत अडचणी उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहींत. परदेशीय चलन मिळवून देण्याचा धंदा म्हणून त्याला वाढतें महत्त्व आहे.

# कुटुंबनियोजनाविषयीं वस्तुस्थिति

## मुंबईसारख्या शहरांतहि बहुसंख्य गरीब स्त्रियांचें कमालीचें अज्ञान

### पाहणीचा उद्बोधक निष्कर्ष

मुंबई येथील एस. एन्. डी. ठाकरसी कॉलेज फॉर वुइमेनच्या प्लॅनिंग फोरमनें मुंबईमधील मातांच्या आरोग्याची आणि कुटुंब-नियोजनाकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोणाची पाहणी करण्याचें ठरविलें. एक प्रश्नपत्रिका तयार करण्यांत आली आणि ५८ विद्यार्थिनींनीं ती प्रश्नपत्रिका मातांना प्रत्यक्ष भेटून भरून आणण्याचें काम केलें; त्या विद्यार्थिनींना आधीं हें काम समजावून सांगण्यांत आलें होतें. डॉ. श्री. चंद्रकला हाटे, एम्. ए., पीएच्. डी., प्लॅनिंग फोरमच्या चेअरमन, ह्यांनीं मार्गदर्शन केलें.

सरकारी आणि म्युनिसिपल मोफत इस्पितळांतील पेशंटां-पुरतीच ही पाहणी मर्यादित होती. बृहन्मुंबईतील बारा प्रमुख बाळंतपणाच्या इस्पितळांतील एकूण ५२२ पेशंटांकडून प्रश्नपत्रिका भरून घेण्यांत आल्या. पाहणीचा निष्कर्ष खालीलप्रमाणें आहे.

मोफत इस्पितळांतील पेशंट हे बहुसंख्येनें पैशानें गरीबच असतात; त्यांतील बहुतेकजण वार्षिक २,००० रु. उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्नाचे होते. एकूण ५२२ पैकी ८७ पेशंट विशेष रोगानें किंवा आजारानें पछाडलेले होते. त्यांचें एकूण संख्येशीं प्रमाण १६.६% पडलें. वार्षिक ६०० रुपयांपेक्षा कमी उत्पन्नाचे पेशंट विचारांत घेतले तर हें प्रमाण २३% होतें. म्हणजे, खराब प्रकृतीचा उत्पन्नाशीं निश्चित संबंध असलेला आढळला.

मुलाखत घेतलेल्या ५२२ स्त्रियांपैकी ४७३ स्त्रियांचा विवाह वयाच्या २२ वर्षांचें वय होण्याच्या आधीं झालेला होता; १९५ स्त्रियांचा (३७.३% स्त्रियांचा) विवाह त्या १५ वर्षांच्या होण्याच्या आधींच झालेला आढळला. फक्त एकीचाच विवाह वयाच्या तिसाव्या वर्षीं झाला होता. ज्यांचा विवाह लवकर झालेला होता, त्यांच्या प्रकृतींत बिघाड जास्त प्रमाणावर आढळला. १५ वर्षांच्या आधीं विवाह झालेल्यांत आरोग्यहीन स्त्रियांचें प्रमाण १९.५%, १५ ते १८ वर्षांच्या दरम्यान विवाह झालेल्यांत १४.५% आणि २२ ते २५ वर्षांच्या दरम्यान विवाह झालेल्यांत फक्त १०% आढळलें. २१ हें वर्ष विवाहाच्या दृष्टीनें आदर्श ठरलें.

आरोग्य नसण्याचा शिक्षणाशींहि संबंध आढळला. निरक्षर स्त्रियांपैकी १५.३% स्त्रिया रोगी होत्या; साक्षर स्त्रियांत तें प्रमाण १०% पडलें. प्राथमिक शिक्षण घेतलेल्यांत तें २३.६%, तर माध्यमिक शिक्षण घेतलेल्यांत ६.७% होतें.

मिळवत्या स्त्रियांत रोगिष्टपणाचें प्रमाण १७.६%, तर इतर स्त्रियांत तें १६.५% आढळलें. बाहेर काम करणारांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो, असें म्हणतां येईल; त्याबरोबरच मिळणाऱ्या पगारामुळें राहणी सुधारून तो दुष्परिणाम कांहीं अंशीं टळतो, हेंहि दिसून येईल.

५२२ स्त्रियांपैकी ४१८ स्त्रिया चाळींत राहणाऱ्या होत्या; ७३ स्त्रिया एका खोलीच्या झोपड्यांत राहात होत्या. एका खोलीच्या बिऱ्हाडाच्या चाळींत राहणाऱ्या स्त्रियांत आजारांचें प्रमाण खूपच मोठें (१६.९%) होतें; एका खोलीच्या झोपड्यांत राहणाऱ्या स्त्रियांत तें १५% होतें. ब्लॉक पद्धतीच्या बिऱ्हाडांतील स्त्रियांपैकी ११.०७% स्त्रिया आजारी आढळल्या. स्वतःच्या घरांत राहणाऱ्या आठहि स्त्रियांत आजार आढळला नाहीं. राहणीचा आरोग्याशीं अगदीं घनिष्ठ संबंध आहे आणि राहण्याच्या सोईच्या अभावामुळें मातांच्या आरोग्यावर निश्चित दुष्परिणाम झालेला आढळतो.

ज्यांचीं स्वतःचीं जिवंत मुलें नव्हतीं, अशा मातांपैकी ३३.३% माता बेमार होत्या; ज्यांचें एक मूल जिवंत, अशांपैकी १८.५% माता आजारी ह्या सदरांत होत्या. दोन, तीन मुलांपर्यंत प्रकृति सुधारत गेली, पण चार किंवा त्यांपेक्षा जास्त मुलांच्या आयांत पुन्हा आजार उद्भवलेले दिसले. ८ पेक्षा जास्त मुलें जिवंत असलेल्या मातांपैकी ८०% माता रोगिष्ट होत्या. मातेच्या आरोग्याच्या दृष्टीनें तिला २ ते ३ मुलें असणें हितावह, असें त्यावरून निष्पन्न होतें.

ज्यांना आपल्या मुलाच्या किंवा मुलांच्या मृत्यूचें दुःख सोसावें लागलें, अशांच्यांत आजारपण अधिक आढळलें; कांहीं अंशीं आईचें आजारपण हेंहि मुलाच्या मृत्यूचें कारण असूं शकेल. ज्यांचें एकहि मूल मृत्यु पावलें नाहीं, अशांपैकीं १३% स्त्रियांना आजार होता; ज्यांचें एक मूल गमावलें अशांपैकी २०.९ स्त्रिया आजारी होत्या आणि ज्यांचीं दोन मुलें गमावलीं अशांपैकी तर २८.५ स्त्रिया आजारी होत्या. दोहोंपेक्षा जास्त मुलें गमावलेल्या स्त्रियांची संख्या निष्कर्ष काढण्याइतकी मोठी नव्हती.

गर्भपाताचा आईच्या प्रकृतीवर अपायकारक परिणाम होतो. येथेंहि, आईची वाईट प्रकृति कांहीं अंशीं गर्भपाताचें कारण किंवा परिणामहि असूं शकेल. ज्यांचा एकदाहि गर्भपात झालेला नाहीं, अशांपैकी १४.६% स्त्रिया वाईट प्रकृतीच्या आढळल्या; एक गर्भ-पातवाल्यांपैकी २०.९% स्त्रियांची प्रकृति वाईट होती, दोनदा गर्भपात झालेल्यांपैकी २१.८% स्त्रिया वाईट प्रकृतीच्या होत्या, तर तीनदा गर्भपात झालेल्यांपैकी ७५% स्त्रियांच्या प्रकृतीला अपाय झालेला आढळला. तीनपेक्षा जास्त गर्भपाताच्या स्त्रियांची संख्या निष्कर्ष काढण्याइतकी मोठी नव्हती. बाळंतपणानंतर पुरेशी विश्रांति मिळणाऱ्या स्त्रियांत आजारीपणाचें प्रमाण कमी आढळलें; आपल्या मुलांना स्वतःचें दूध पाजणाऱ्या आयांत आजारीपणाचें प्रमाण कमी होतें; बाहेरचें पाजणाऱ्यांत तें अधिक होतें. स्वतःच्या मुलांना पाजूं न शकणाऱ्या आयांवरहि दुष्परिणाम होतो.

विवाहाच्या वेळेचें लहान वय, शिक्षणाचा अभाव, राहण्याच्या जागेची कुचंबणा, अपत्यें नसणें किंवा फार असणें, गर्भपात, वाईट अन्न, विश्रांतीचा अभाव, अर्भकांना आईचें दूध न मिळणें, हीं सर्व आयांच्या आरोग्यहीनतेचीं कारणें दिसून येतात. त्या सर्वांच्या मुळाशीं दारिद्र्य असतें, हें उघड आहे.

आपल्या कुटुंबांत सहा जण असावेत, म्हणजे चार अपत्यें असावींत, असें मत असणाऱ्या स्त्रिया बहुसंख्य होत्या. एकहि मूल असूं नये, असें म्हणणारी एकसुद्धां स्त्री आढळली नाहीं. बहुतेक स्त्रियांना कुटुंबनियोजन केंद्रांची माहितीहि नव्हती. तेव्हां, ह्या केंद्रांची संख्या वाढवून, विशेषतः गरिबांच्या वस्तींत त्यांचा प्रसार करण्याची आवश्यकता सिद्ध होते.

फक्त ४०% स्त्रियांना कुटुंबनियोजनाच्या पद्धतीचें ज्ञान होतें. व त्या त्याचा उपयोग करीत होत्या. ह्याचा अर्थ, मुंबई सारख्या शहरांतहि कुटुंबनियोजनाचा संदेश गरीबांच्या चाळीं-पर्यंत पोचलेला नाहीं. ९% स्त्रियांना ज्ञान होतें, पण त्या त्याचा उपयोग करीत नव्हत्या. म्हणजे, एकूण स्त्रियांपैकी फक्त १३·४% स्त्रियांना कुटुंबनियोजनाच्या पद्धतीची कल्पना होती. ५२२ पैकी २४८ स्त्रियांना त्याचें ज्ञान नव्हतें, परंतु तें मिळविण्याची इच्छा होती. म्हणजे, ४७·५% स्त्रियांना कुटुंबनियोजनाच्या कृतीची माहिती हवी होती. ह्यावरून हें स्पष्ट दिसून येतें, कीं कुटुंब-नियोजनाच्या प्रसाराला स्त्रियांच्या दृष्टिकोणाचा अडथळा येत नसून, त्याबद्दलच्या माहितीच्या प्रसाराची व्यवस्थाच अपुरी आहे. गरीब, अशिक्षित वर्गापर्यंत माहिती पोचलेलीच नाहीं; वास्तविक ह्या वर्गालाच त्याची सर्वांत जास्त गरज आहे. सुमारें १९५ स्त्रिया ( ३७·३% ) ह्या बाबतींत अज्ञानी असूनहि त्यांना ती माहिती करून घेण्याची इच्छा नव्हती. त्यांच्या अनिच्छेचें किंवा विरोधाचें कारण बहुतांशीं अज्ञान हेंच असलें पाहिजे.

सारांश, मुलाखत घेतलेल्यांपैकी एकतृतीयांश स्त्रिया कुटुंब-नियोजनाला अनुकूल नव्हत्या; दोनतृतीयांश अनुकूल होत्या आणि फक्त ४% स्त्रिया प्रत्यक्ष कृतींत आणीत होत्या. ह्यावरून कुटुंबनियोजनाचे सध्याचे प्रयत्न किती तोकडे पडत आहेत, तें दिसून येईल; सरकार आणि समाजसेवेच्या संस्था ह्यांनीं ह्या प्रश्नाकडे तातडीनें लक्ष पुरविणें अगत्याचें आहे.

ज्या १९५ स्त्रिया कुटुंबनियोजनाची माहिती करून घेण्यास अनुत्साही होत्या, त्यांतील १४९ निरक्षर होत्या; शिक्षणाचा अभाव हेंच त्यांच्या ह्या दृष्टिकोणाचें कारण होतें असें म्हणतां येईल.

कुटुंबनियोजनाला अनुकूल असलेल्या स्त्रियांपैकी बहुतेकांनीं, संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियाच योग्य, असें सांगितलें. ५२२ पैकी सुमारें १९ स्त्रियांवर नुकतीच शस्त्रक्रिया केलेली होती किंवा लागलीच करण्यांत यावयाची होती.

पाहणीचे वेळीं कित्येक स्त्रियांनीं काढलेले उद्गार ह्या सर्व प्रश्नावर प्रकाश टाकणारे आहेत. आपल्या पतीच्या संमतीवरच आमची कुटुंबनियोजनविषयक मतें अवलंबून आहेत, असें बहुतेक जणी म्हणाल्या. पतीची संमति असेल, तरच अपत्यांची संख्या मर्यादित करायला त्या तयार होत्या. " नवऱ्यापुढें आमचें कांहीं चालत नाहीं " असें बहुतेकांनीं स्पष्टच सांगितलें. दारिद्र्य, एकत्र कुटुंबपद्धति, राहण्याची वाईट जागा, नवऱ्याचें वर्चस्व, ह्यांमुळें कित्येकजणीं आयुष्याला कंटाळलेल्या दिसल्या. गरीब वर्गाच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनाचें हें प्रतिबिंब आहे.

प्रत्यक्ष परिस्थितीचे अशा पाहणीमुळें वास्तव ज्ञान होतें, वस्तु-स्थितीवर उत्कृष्ट प्रकाश पडतो, आणि त्यामुळें विचारांना आणि कृतींना चालना मिळते. म्हणून, अशा प्रकारच्या पाहण्या ठिक-ठिकाणीं करण्यांत येऊन त्यांच्या निष्कर्षांना प्रसिद्धि दिली पाहिजे. हा केवळ वैयक्तिक आणि कौटुंबिक प्रश्न नसून तो राष्ट्रीय प्रश्न बनला आहे; लोकसंख्या काबूंत ठेवण्यावर आपलेंच नव्हे तर आपल्या देशाचें अस्तित्व अवलंबून आहे. ह्या प्रश्नाचें गांभीर्य लक्षांत येण्यास अशा पाहण्यांचा खासच उपयोग होईल.

**प्रत्येक कुटुंबांतील जिवंत मुलांची संख्या**

| मुलांची संख्या | एकूण कुटुंबें |
|---|---|
| मूल नाहीं | १६ |
| १ मूल | १३५ |
| २ मुलें | १०७ |
| ३ मुलें | ८७ |
| ४ मुलें | ७७ |
| ५ मुलें | ४० |
| ६ मुलें | ३६ |
| ७ मुलें | १२ |
| ८ मुलें | ५ |
| ८ पेक्षा जास्त मुलें | २ |

वार्षिक ३,००० रु. प्राप्तीखालच्या आर्थिक पातळीमधील कुटुंबांमधील ही परिस्थिति आहे; आणि मुलांची संख्या वाढत जाणारी आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.


इचलकरंजीच्या वाढत्या उद्योगधंद्यांस ३४ वर्षें सतत भांडवल पुरविणारी व सार्वजनिक विश्वस्त निधीच्या ठेवी स्वीकारण्यास सरकार-मान्यता असलेली इचलकरंजींतील एकमेव नागरी बँक.

# दि इचलकरंजी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९३० ] इचलकरंजी [ फोन नं. ३६

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | ३,००,००० |
| भरलेलें भांडवल | रुपये | २,६६,००० |
| रिझर्व्ह फंड | रुपये | २,०८,००० |
| इतर फंडस् | रुपये | ३,५२,००० |
| खेळतें भांडवल | रुपये | ५२,३३,००० |

ठेवींचे दर :—

चालू : १ टक्का
सेव्हिंग्ज : ३-५० टक्के
मुदत ठेव : ४ ते ६ टक्के
कॉल डिपॉझिट : ४ ते ५-५० टक्के
कर्जाचे दर : ६ ते ९ टक्के

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात. ★ अधिक चौकशी बँकेचे ऑफिसांत करावी.

श्री. ज. दांडेकर, मॅनेजर. ★ दत्तात्रय बाबूराव कदम, चेअरमन.

# कुटुंबनियोजनाच्या कामासाठी स्वतंत्र खातें हवें

## मूळ प्रश्न सामाजिक स्वरूपाचा

भारत सरकारनें कुटुंबनियोजनाचें धोरण अधिकृत रीत्या स्वीकारल्यानंतर ह्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचें काम सरकारच्या आरोग्यखात्याकडे सोपविण्यांत आलें. माता आणि मुलें ह्या विषयाशीं आरोग्यखात्याचा संबंध त्यांच्या आरोग्यापुरता पोंचत असल्यामुळें आणि आरोग्यखात्यापाशीं या कामासाठी लागणारी संघटना कांहीं प्रमाणांत उपलब्ध असल्यामुळें असें करण्यांत आलें असावें. आतां भारताच्या विकासाच्या कार्यक्रमाला लोकसंख्येच्या वाढीमुळें गंभीर स्वरूपाचा धोका उत्पन्न झालेला आहे. त्यामुळें कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाची जबाबदारी सरकारच्या आरोग्यखात्यावर ठेवणें कितपत योग्य आहे ह्याचा विचार करण्याची वेळ आतां आली आहे. आरोग्यखात्याकडून हें काम काढून घ्यावयाचें ठरविलें तर दुसऱ्या कोठल्या खात्याकडे तें द्यावयाचें, तें प्रथम ठरविण्यांत आलें पाहिजे.

### निषेधात्मक वृत्तीचे परिणाम

वास्तविक कुटुंबांतील माणसांच्या संख्येचें स्वेच्छेनें नियमन करण्याचा, म्हणजेच संततिनियमनाचा प्रश्न हा सामाजिक स्वरूपाचा असून त्याचा आरोग्याशीं तसा संबंध नाहीं. अर्थात्, फार मुलें झाल्यामुळें मातेची प्रकृति खालावते हें विसरून चालणार नाहीं. संततिनियमनाचा जसा आरोग्याशीं संबंध आहे, तसाच अन्नाचाहि आहे. कारण, सकस आणि पुरेशा अन्नाच्या अभावामुळें देशांत आज आजाराचें प्रमाण बरेंच आहे. पण म्हणून कांहीं अन्न-पुरवठ्याचा तातडीचा प्रश्न आरोग्यखात्याकडे सोपविण्याचा विचार करण्यांत येत नाहीं. खरी परिस्थिति अशी आहे कीं, सकस अन्नाच्या अभावीं उत्पन्न होणारी रोगराई ही असमंजस मातृत्वामुळें उत्पन्न होणाऱ्या आजारापेक्षां कितीतरी अधिक आहे. लिंगभेद ही जीवशास्त्रांतील वस्तुस्थिति आहे. पण, ह्या वस्तुस्थितीविषयीं आपल्याकडे निषेधात्मक वृत्ति, कशी कोणास ठाऊक, प्रसृत झालेली आहे. हिंदुस्थानांत प्राचीन काळीं ही वृत्ति नव्हती हें जुन्या देवळांतील शिल्पकृतीवरून उघड दिसून येतें. जातिसंस्थेचा उगम झाल्यानंतर बहुधा ही वृत्ति उदय पावली असावी. स्वामी विवेकानंद एकदा असें म्हणाले कीं, भारतामधील धार्मिकता ही जातीजातींत सहभोजन करणें आणि आंतरजातीय विवाह करणें ह्या दोन गोष्टींवरील निर्बंधांत सामावलेली दिसते. संततिनियमनाचा लिंगभेदाशीं प्रत्यक्ष संबंध असल्यामुळें त्याविषयींहि निषेधात्मक वृत्ति दिसून येते; आणि त्यामुळें संततिनियमनाविषयीं स्पष्टपणें चर्चा करण्यांत येत नाहीं. ह्या निषेधात्मक वृत्तीमुळेंच संततिनियमन केंद्राकडून माहिती अगर सल्ला घेणें लोकांना आवडत नाहीं. कांहीं लोकांनीं माहिती अगर सल्ला विचारलाच तर तें गुप्तपणें आणि चोरूनमारून करण्यांत येतें. खेड्यांत प्रत्येकाला दुसऱ्याच्या हालचालींची माहिती असते. म्हणून खेड्यांतील लोकांना विशेषत: कमी उत्पन्नाच्या गटांतील स्त्रियांना कुटुंबनियोजन केंद्राकडे जातांना आपणास कोणी पाहूं नये असें वाटतें. केंद्रांत नांवें नोंदविणेंहि त्यांना आवडत नाहीं.

कुटुंबनियोजनाचा विचार करतांना ह्या विशिष्ट परिस्थितीची दखल घेण्यांत आली पाहिजे. पण आरोग्यखातें तिकडे लक्ष देत नाहीं. तेव्हां कुटुंबनियोजनाचीं स्वतंत्र केंद्रें, शस्त्रक्रियेचीं केंद्रें अगर फिरत्या मोटारी ह्यांची योजना केली तरी त्यांना यश येणें अशक्यच असतें. म्हणूनच मोठमोठ्या रकमा खर्च करूनहि जननाचें प्रमाण कमी करण्याच्या कामीं आरोग्यखात्याला फारसें यश आलेलें नाहीं.

### निर्बीजीकरणाच्या शस्त्रक्रियेचे प्रचारक

शिवाय कुटुंबनियोजनावरच मुख्य भर देण्यांत येत आहे. कुटुंबनियोजन प्रचाराविषयीं लोकसंख्येच्या प्रश्नांविषयीं विचारी तज्ज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ ह्यांना आस्था वाटेल. पण सर्वसामान्य लोकांना त्याविषयीं विशेष आस्था वाटत नाहीं. तेव्हां शिक्षण आणि प्रचाराचा भर वारंवार होणाऱ्या असंमजस मातृत्वावर देण्यांत आला पाहिजे. कारण ह्या विषयासंबंधीं निषेधात्मक वृत्ति दिसून येत नाहीं. स्त्रियांवर व पुरुषांवर प्रजाजनन करण्यास असमर्थ करणाऱ्या शस्त्रक्रिया करण्याकडे आरोग्यखातें बरेंच लक्ष देत आहे आणि तें बरोबरहि आहे. पण मुख्य प्रश्न अशा प्रकारची शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी लोकांचें मन कसें वळवावें हा आहे. ह्याविषयीं लोकांना शिक्षण देण्यासाठी शिक्षक नेमले जातात आणि त्यांच्यावर खूप खर्च केला जातो. परंतु परिणाम फारसा दिसून येत नाहीं. त्याऐवजीं पगारी प्रचारक नेमले तर तें स्वेच्छेनें शस्त्रक्रिया करून घेणारीं अधिक माणसें आणूं शकतात, असें अनेकदा सिद्ध झालेलें आहे. सरकारी नोकरांना प्रचाराच्या कामाबद्दल रोख रक्कम घेण्याची बंदी करण्यांत आलेली आहे. परिणामीं ज्या सरकारी नौकरांनीं अशा शस्त्रक्रिया करून घेतल्या आहेत, अगर जे शस्त्रक्रियेच्या केंद्रांतून काम करतात, त्यांना शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी आणखी माणसें आणण्यांत स्वारस्य वाटत नाहीं. तेव्हां पगारी प्रचारक म्हणून सरकारी नौकरांनीं काम करण्यास जी बंदी आहे, ती रद्द करण्यांत आली पाहिजे.

### तीन संघटनांशीं संबंध

संततिनियमनाच्या साधनांचा संबंध तीन संघटनांशीं येतो : आरोग्यखातें, व्यापारखातें आणि इंडिअन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च. शिवाय सर्व साधनांचा समावेश ' औषधें ' ह्या व्यापक नांवाखालीं करण्यांत आला असून त्यांना ड्रग्ज ॲक्ट लागू होतो. संततिनियमनाच्या साधनांबाबत सल्ला देण्याचें काम आरोग्यखात्याचेच दोन विभाग करतात. एक कुटुंबनियोजन संचालकमंडळ आणि दुसरा ड्रग कंट्रोल डिपार्टमेंट; पुष्कळदा त्यांनीं दिलेला सल्ला विसंगत असतो. म्हणून साधनें हीं औषधांच्या यादींतून बाहेर काढूनच आरोग्यखात्याला हा प्रश्न सोडवितां येईल. संततिनियमनाचीं साधनें लोकांना वापरण्यासाठी विकण्यापूर्वीं तीं उपयोगांत आणण्यास योग्य आहेत कीं नाहींत, ह्यासंबंधीं तपासणी करण्याचें काम आरोग्यखात्याचें असलें तरी तीं बनविण्याचा परवाना देण्याचें काम व्यापारखात्याकडेच आहे. कारण, ह्या कारखान्यासाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाची सोय करणें आणि जरूर ते कारखाने निघण्याची शक्यता अजमावणें इत्यादि बाबींकडे व्यापारखात्याला आणि त्याच्या तांत्रिक विकास विभागाला लक्ष द्यावें लागतें. व्यापारखातें आणि त्याचा तांत्रिक विभाग संततिनियमनाच्या साधनाच्या पुरवठ्याला आरोग्य खातें देईल इतका अग्रहक्क देणें अर्थातच शक्य नाहीं. त्यामुळें

विलंब लागून सर्वत्र कुचंबणेचें वातावरण निर्माण होतें. तयार करण्यांत आलेल्या साधनांची तपासणी कानपूर येथील संरक्षण-खात्याच्या प्रयोगशाळेंत केली जाते तर साधनांची व्यावहारिक चांचणी इंडिअन मेडिकल रिसर्च ह्या संस्थेतर्फे करण्यांत येते. ह्या दोन्ही संस्था त्यांच्याकडे सोपविलेल्या कामासंबंधीं लवकर अहवाल देण्याच्या कामीं फिकीर दाखवीत नाहींत. वास्तविक, संबंधित अहवाल लवकर हातीं आले तर साधनें तयार करणाऱ्या कंपन्या कांहीं तरी कृति जलदीनें करूं शकतील. एखाद्या साधनाची उपयुक्तता अजमावण्यासाठीं कित्येकदा नऊ महिन्यांपासून वर्षापर्यंतचाहि काळ लागतो. खरें पाहतां कांहीं चांचण्या तरी अगदीं थोड्या मिनिटांत करतां येण्यासारख्या असतात. उदाहरणार्थ रबरी पिशव्या.ह्या पिशव्यांत पाणी न गळतां राहूं शकतें कीं नाहीं एवढीच चांचणी करावयाची असते. ती करण्यासाठी एका मिनिटाचा अवधि पुरेसा आहे. पण ह्या साधनासंबंधीचा अहवाल खात्याकडे जाण्यास कित्येक महिने लागतात. शिवाय खात्याकडून संबंधित कारखान्याकडे पाठविण्यास लागणारा काळ वेगळाच. अर्थातच, ह्या कालावधीनें कारखानदारांची फारच कुचंबणा झाल्यास नवल नाहीं. गेलीं कित्येक वर्षें आरोग्यखात्याला हा प्रश्न सोडवितां आलेला नाहीं. कुटुंबनियोजनाच्या कार्यासाठीं स्वतंत्र खातें उघडण्यांत यावें अशी सूचना करण्यांत आलेली होती. ही सूचना ताबडतोब अमलांत आणणें शक्य नसेल तर समाजहित-संवर्धन खात्यांत कुटुंबनियोजनाच्या कामासाठी एक खास विभाग तरी उघडण्यांत यावा. किंवा मध्यवर्ती समाजहितवर्धन बोर्डाकडे तरी कुटुंबनियोजनाच्या कार्याची जबाबदारी सोपविण्यांत यावी. कुटुंबनियोजनाच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यासाठी मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांची एक कमिटी आतां बनविण्यांत आली आहे. तेव्हां ह्या प्रश्नाकडे निर्धारानें व निकडीनें लक्ष देण्यांत येईल अशी आशा आहे.

### कुटुंबनियोजनाच्या साधनांचें उत्पादन

मध्यवर्ती कुटुंबनियोजन मंडळाची बैठक मुंबई येथें भरविण्यांत आली होती. देशांतील वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी कुटुंबनियोजनाच्या साधनांची देशांतच निर्मिति करणें आवश्यक वाटूं लागलें आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागांत ह्या साधनांची निर्मिति करण्यांत यावी अशी जोराची शिफारस मंडळानें केली आहे. मध्यवर्ती सरकार ह्या प्रश्नाचा गंभीरपणें विचार करीतच आहे. निरनिराळ्या प्रकारच्या साधनांबद्दल संशोधनहि चालू आहे. कांहीं खाजगी कंपन्या कांहीं प्रकारच्या साधनांचें उत्पादन करूंहि लागल्या आहेत. सर्व प्रकारच्या साधनांच्या निर्मितीची जबाबदारी मध्यवर्ती सरकारनेंच आपल्याकडे तातडीनें घ्यावी असें आतां सुचविण्यांत आलें आहे. एखाद्या जोडप्याला तीन मुलें झाल्यावर त्यानें निर्बीजीकरणाचा अगर इतर योग्य साधनांचा अवलंब करावा म्हणून प्रयत्न करण्यांत यावे, अपत्यसंभव नष्ट करणाऱ्या शस्त्रक्रिया करून घेणारांसाठी इस्पितळांतून अधिक खाटा ठेवण्यांत याव्या आणि त्यांचा खर्च राज्यसरकारांना मध्यवर्ती सरकारनें द्यावा अशीहि शिफारस मंडळानें केली आहे. गर्भपातासंबंधींचा सध्यांचा कायदा शिथिल करतां येईल किंवा काय ह्याची चिकित्सा करण्यासाठी मंडळानें एका कमिटीची स्थापना केली आहे. अफाट जननसंख्या काबूंत आणण्यासाठी मुलींचें विवाह-योग्य वय वाढविण्यासंबंधींहि शिफारस करण्यांत आली आहे. सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांनीं ह्यासंबंधीं प्रचार करून मुलींचें विवाहाचें वय १८ वर्षांच्या आंत असूं नये म्हणून लोकमत तयार करण्यासाठी हातभार लावावा, असें मंडळानें मत व्यक्त केलें आहे.


## ठाणें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., ठाणें

**मुख्य कचेरी : १५-४, छत्रपती शिवाजी पथ, ठाणें**

: जिल्ह्यांतील शाखा :

१. कल्याण २. मुरबाड ३. भिवंडी ४. वसई ५. पालघर ६. डहाणू ७. वाडा
८. जव्हार ९. मोखाडा १०. शहापूर ११. विरार १२. तलासरी १३. डहाणू रोड.

* * * * * * *

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे, मच्छीमारी व जंगल कामगार सोसायट्यांच्या उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल : रु. १५ लाख, ६० हजार
ठेवी : रु. १ कोटी, ५५ लाखांचेवर
खेळतें भांडवल : रु. २ कोटींचे वर

महाराष्ट्रांत व इतर प्रमुख शहरांत हुंड्या, बिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते.

**सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.**

भा. के. धामणकर
बी. ए. (ऑनर्स), एच्. डी. सी.,
सी. ए. आय्. आय्. बी. मॅनेजर

द. दा. काळे
व्हा. चेअरमन

श्री. वै. धामणकर
चेअरमन

# फक्त हिंदूंनींच कुटुंबनियोजन काय म्हणून करावें ?

## कित्येक लोकांचा भीतिपोटीं विरोध

हिंदु समाजाचा, विशेषतः उत्तर प्रदेश आणि बिहारमधील हिंदु समाजाचा, कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाला विरोध आहे. त्यांना असें वाटतें कीं, धार्मिक व राजकीय कारणासाठी मुसलमानांचा आणि ख्रिस्ती लोकांचा कुटुंबनियोजनाला जोराचा विरोध असल्यामुळें फक्त हिंदूंनींच कुटुंबनियोजनाचा आश्रय केल्यास देशांतील हिंदु लोकांची आज जी बहुसंख्या आहे ती कालांतरानें अल्पसंख्या होईल. जनसंघ आणि हिंदुमहासभेसारख्या संघटनांचें आणि काँग्रेसमधील कांहीं लोकांचेंहि असेंच मत आहे. ह्या भीतीच्या पोटींच बऱ्याच राजकारणी लोकांनीं कुटुंबनियोजनाला दिलेला पाठिंबा फारसा मनापासून दिलेला नाहीं.

कुटुंबनियोजनाबाबतचा हा अभिप्राय प्रत्यक्ष परिस्थितीच्या कसोटीवर कितपत टिकतो, हें तपासून पाहणें जरूरीचें आहे. १९६२ सालीं भारताची शिरगणती करण्यांत आली. त्यांत 'धर्म' ह्या विभागांत देशांतील प्रमुख धार्मिक गटांची संख्या आणि त्यांत दरसाल होणारी टक्केवारी वाढ ह्यासंबंधीं गेल्या दहा वर्षांतील आंकडे पुढीलप्रमाणें दिले आहेत.

| धर्म | १९५१ ची लोकसंख्या (दशलक्षांत) | १९६१ ची लोकसंख्या (दशलक्षांत) | १९५१ ते ६१ मधील कालांत दरसाल वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| हिंदू | ३०३·६ | ३६६·५ | २·०३ |
| मुसलमान | ३५·४ | ४६·९ | २·५६ |
| ख्रिश्चन | ८·४ | १०·७ | २·७४ |
| इतर | १४·७ | १५·१ | ०·९९ |
| | ३६१·१ | ४३९·२ | २·१६ |

पुढील चार दशकांत वाढीचा वेग असाच राहिला तर पुढील आंकडेवारीप्रमाणें परिस्थिति असेल :—

(आंकडे दशलक्षाचे)

| | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|
| हिंदु | ४३९·८ | ५२७·८ | ६३३·३ | ७६०·० |
| मुसलमान | ५८·७ | ७३·३ | ९१·७ | ११४·६ |
| ख्रिश्चन | १२·७ | १७·४ | २२·२ | २८·३ |
| इतर | १५·१ | १६·६ | १८·२ | २०१ |

तथापि वाढीचा हाच वेग गृहीत धरण्यांत कांहींशीं गफलत आहे. कारण, निरनिराळ्या धार्मिक जमातींचा वाढीचा वेग सर्व देशभर एकच आढळून आलेला नाहीं. कांहीं राज्यांत तो निराळा दिसून आलेला आहे. उदाहरणार्थ, मध्य प्रदेश आणि राजस्थान ह्या राज्यांतील ख्रिश्चनांच्या वाढीचा वेग वाढीच्या सरासरी वेगापेक्षा अधिक आढळून आला आहे. त्याचप्रमाणें आसाम, बंगाल आणि पंजाबमधील मुसलमानांच्या वाढीचा वेगहि अधिक असल्याचें दिसतें.

देशांतील लोकसंख्येच्या वाढीचा सध्यांचा सरासरी वेग जर असाच टिकून राहिला तर पुढील चार दशकांत मुसलमानांची आणि ख्रिश्चनांची हिंदु जमातीशीं टक्केवारी कशी राहील तें पुढील कोष्टकावरून सक्षांत येईल.

| हिंदूंशीं असलेली टक्केवारी | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| मुसलमान | ११·५ | १२·८ | १३·४ | १३·९ | १४·५ | १५·१ |
| ख्रिश्चन | २·७ | २·९ | ३·० | ३·४ | ३·५ | ३·७ |

हिंदूंनीं कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर व मनापासून अमलांत आणला आणि लोकसंख्येच्या वाढीचा वेग उद्दिष्टाप्रमाणें ५० टक्के कमी केला तर पुढील चार दशकांत हिंदूंची लोकसंख्या पुढीलप्रमाणें असेल. (आंकडे दशलक्षाचे) १९६१ : ३६६·५; १९७१ : ४०३·२; १९८१ : ४४३·५; १९९१ : ४८७·८ आणि २००१ : ५३६·६. मुसलमानांनीं आणि ख्रिश्चनांनीं कुटुंबनियोजनाचा अवलंब केला नाहीं आणि लोकसंख्येच्या वाढीचा सध्यांचाच वेग टिकविला तर त्यांची हिंदूंच्या लोकसंख्येशीं टक्केवारी पुढीलप्रमाणें असेल. मुसलमानांची हिंदूंशीं टक्केवारी १९७१ : १४·५; १९८१ : १६·८; १९९१ : १८·८; २००·१ : २०·१; ख्रिश्चन जमात १९७१ : ३·४; १९८१ : ३·९; १९९१ : ४·६; २००१ : ५·३. ह्याचा अर्थ असा कीं, फक्त हिंदूंनींच कुटुंबनियोजनाचा स्वीकार केला आणि आपल्या वाढीचा वेग निम्म्यानें कमी केला, आणि बिगर–हिंदूंनीं तसें केलें नाहीं तरी चार दशकांनंतर बिगर-हिंदूंचें हिंदूंशीं असणारें प्रमाण फक्त एक–चतुर्थांशाइतकेंच असेल.

जगाकडे नजर टाकली तर असें दिसून येतें कीं, आर्थिक भरभराट होत चालली कीं जननाचा वेग कमी होत जातो. हिंदुस्थानांत होणाऱ्या आर्थिक भरभराटींत हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन व इतर ह्या सर्वांनाच स्थान असणार हें उघड आहे. तेव्हां फक्त हिंदूंनींच कुटुंबनियोजनाचा अवलंब केल्यास त्यांची बहुसंख्या नाहींशीं होऊन ते अल्पसंख्य होतील ह्या भीतीला आधार फारसा दिसत नाहीं.

---

### आर्थिक प्रगतीला प्रशस्तिपत्र

आंतरराष्ट्रीय नाणें निधीचे अध्यक्ष मि. स्वाइटझर पत्रकार परिषदेंत बोलतांना म्हणाले कीं, भारतामधील आर्थिक नियोजन योग्य कल्पनांवर आधारलेलें आहे. नियोजन म्हणजे साचेबंदपणा असा अर्थ कधीं कधीं केला जातो. परंतु भारताचें आर्थिक नियोजन हें परिस्थितीप्रमाणें बदलूं शकणारें आहे, हें विशेष आहे. नियोजनाच्या मार्गानें भारतानें केलेली प्रगति उत्साह वाटण्यासारखी आहे. संरक्षणासाठी करावा लागणारा प्रचंड खर्च लक्षांत घेतला तर झालेल्या आर्थिक प्रगतीचें महत्त्व विशेषच पटण्यासारखें आहे. रिझर्व्ह बँकेनें आपल्या व्याजाच्या दरांत जी वाढ केली आहे त्यामुळें आणि बँकेच्या द्रव्यविषयक धोरणामुळें देशांत आर्थिक स्थैर्य निर्माण होण्यास मदत होईल. आर्थिक स्थैर्यामुळें परदेशांतून येणाऱ्या भांडवलावर अप्रत्यक्ष पण चांगला परिणाम होईल.

महाराष्ट्र सरकार व राहुरी तालुक्यांतील ५१ गांवांतील उत्पादक सहकारी
भागीदारी पद्धतीनें चालविलेला अहमदनगर जिल्ह्यांतील

## दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि.

श्रीशिवाजीनगर ता. राहुरी, जि. अहमदनगर.

दूरध्वनि क्र. १०३ श्रीरामपूर, तार–छत्रपती राहुरी अगर श्रीरामपूर

स्थापना–१९५४ सभासदसंख्या–२,३६३

| महाराष्ट्र सरकारचे शेअर्स | सभासदांचे शेअर्स | अधिकृत भांडवल | विक्रीस काढलेलें भांडवल |
|---|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ४३,८८,०३८ | रु. ६१,००,००० | रु. ६१,००,००० |

| सीझन | ऊंस गळीत टन | साखर उत्पादन पोतीं | सरासरी उतारा |
|---|---|---|---|
| १९६१–६२ | १,८०,५७१ | २,१५,७७० | ११·८५३ |
| १९६२–६३ | १,७६,६५० | २,११,६६१ | ११·८५३ |
| १९६३–६४ | १,८१,२०७ | २,११,७७८ | १२·०१ |

कारखान्याचे सात गळीत हंगाम यशस्वी रीत्या पार पडलेले असून आठवा गळीत हंगाम तारीख १५–१०–१९६४ रोजीं विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर चालू करून जास्तीत जास्त साखरेचें उत्पादन करून आपल्या सेवेचा अल्पसा वांटा उचलण्याचा प्रयत्न करीत आहोंत.

**– दीपावलीच्या मंगल प्रसंगीं सर्वांना प्रणाम –**

पां. वा. पवार
मॅनेजिंग डायरेक्टर

एम. बी. पाटील
व्हा. चेअरमन

बी. बी. तनपुरे
चेअरमन



ही दीपावली व नूतन वर्ष आमच्या असंख्य ग्राहकांना व हितचिंतकांना सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

## दि सांगली बँक लिमिटेड

★ रजिस्टर्ड ऑफिस ★
राजवाडा चौक, सांगली.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : | : | रु. २०,००,००० |
| वसूल भांडवल | : | : | रु. ६,५६,७०० |
| रिझर्व्ह फंड व इतर फंडस् | : | : | रु. १०,४३,०३८ |
| खेळतें भांडवल | : | : | रु. ५,००,००,००० |

**महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत मिळून एकूण २७ शाखा.**

आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार अद्ययावत रीतीनें केले जातात.

हेड ऑफिस सांगली व इचलकरंजी, बेळगांव, रविवार पेठ पुणें, सदाशिव पेठ पुणें, या शाखांमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय करण्यांत आली आहे.

विजयादशमीपासून टर्म डिपॉझिटवरील नवीन आकर्षक व्याजाचे दरासाठीं बँकेकडे चौकशी करावी.

*अधिक माहितीसाठी नजिकच्या आमच्या शाखाधिकाऱ्यास अवश्य भेटा.*

हेड ऑफिस :
राजवाडा चौक
सांगली.

एस. के. गुप्ते
M. A., LL. B., C. A. I. I. B.
मॅनेजर.

# ब्रिटिश भांडवलाची भारतामधील उद्योगधंद्यांत होत असलेली गुंतवणूक

## नफ्याचें प्रमाण इतर देशांच्या मानानें चांगलें

स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपल्या देशांत पुष्कळ फेरबदल झाले आहेत. तरीसुद्धां देशाच्या अर्थव्यवस्थेंत ब्रिटिश कारखानदारी महत्त्वाचें कार्य करीत आहे. हिंदला भांडवलाचा पुरवठा करण्यांत ब्रिटनचें स्थान आतां अग्रेसर राहिलेलें नाहीं. आतां तें काम अमेरिका करीत आहे. तरीसुद्धां भारतांत गुंतविण्यांत आलेल्या एकूण परदेशीय भांडवलापैकी ६५ टक्के भांडवल ब्रिटनचें आहे. भारतापुढें परदेशीय हुंडणावळीच्या तुटवड्याचा प्रश्न अजूनहि खडा आहे. अर्थात्, ज्या देशांकडून भारताला द्रव्यविषयक साह्य मिळते त्याच देशांकडून त्याला आयातहि करावी लागते. ब्रिटन हें भारताचें सर्वांत मोठें गिऱ्हाईक आहे. भारताच्या एकूण निर्यातीपैकी एक चतुर्थांश निर्यात ब्रिटनला करण्यांत येते. देशांतल्या अर्थोत्पादनाच्या साधनांचा विकास करण्यासाठी भारतानें मोठ्या प्रमाणावर आयात करण्याचा कार्यक्रम आखला आहे. परंतु, त्याच्या निर्यातीमुळें भारताला जें परदेशीय चलन मिळतें तें ह्या आयातीच्या कार्यक्रमाला पुरें पडत नाहीं. भारताच्या वाढत्या आयातींत ब्रिटनच्या निर्यातवाल्याला जो वांटा मिळेल तो ब्रिटनकडून भारताला मिळणाऱ्या वाढत्या मदतीच्या प्रमाणावर सर्वस्वीं अवलंबून आहे. उभयता देशांतील व्यापाराबाबत ही गोष्ट फार महत्त्वाची होऊन बसलेली आहे.

### भारतांतील ब्रिटिश कारखानदारी

विकासाच्या कामासाठी भारत जी नवी आयात करीत आहे, तिचा उगमच आर्थिक मदतीच्या मार्गानें उभारण्यांत आलेल्या व्यापारांत आहे. तेव्हां ब्रिटनकडून ज्या प्रमाणांत मदत मिळत राहील त्या प्रमाणांतच ब्रिटनला व्यापार मिळविण्याची अपेक्षा राहील हें उघडच आहे. परदेशी चलनाचा साठा घटत चालल्यामुळें भारताला आयातीवर कडक निर्बंध घालावे लागले आहेत. अशा परिस्थितींत भारताच्या बाजारपेठेंत स्थान मिळविण्यासाठी अधिक ब्रिटिश भांडवल भारतांत येत आहे. भारतांतील बाजारपेठ मोठी असून ती वाढत चाललेली आहे. ह्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी आणि भारतांत माल विकण्यासाठी येथेंच कारखानदारी काढण्यास फार महत्त्व आलेलें आहे. भारत स्वतंत्र झाल्यापासून ब्रिटनची येथील खाजगी भांडवल—गुंतवणूक दुपटीपेक्षाहि अधिक झाली आहे. १९४८ सालीं एकूण २५५ कोटी रुपयांच्या परदेशी भांडवलापैकी ब्रिटनचें २०६ कोटी रुपयांचें होतें. १९६० सालीं ब्रिटनचे ४४६·४ कोटी रुपयांचें भांडवल भारतांत गुंतलेले होतें. त्या वेळीं एकूण परदेशीय भांडवल सुमारें ६९०·५ कोटी रुपयांचें होतें. ह्याचा अर्थ असा कीं, ब्रिटनची भारतामधील भांडवल—गुंतवणूक दरसाल सरासरी २ कोटी रुपयांनीं वाढत आहे.

### कोणत्या उद्योगधंद्यांचें आकर्षण ?

पुढें दिलेल्या कोष्टकांवरून ब्रिटिश भांडवलाला कोणत्या प्रकारच्या उद्योगधंद्याविषयीं आस्था वाटते तें दिसून येतें.

आकडे कोटी रुपयांचे

| | थेट गुंतवणूक | १९६० सरकारी | एकूण |
|---|---|---|---|
| ब्रिटन | ४०३·८ | ४२·६ | ४४६·४ |
| (१) मळे | ९४·९ | ३·७ | ९८·६ |
| (२) खाणी | ११·७ | १·३ | १३·० |
| (३) पेट्रोलिअम | १०१·९ | ३·२ | १०५·१ |
| (४) कारखाने | १११·५ | १७·७ | १२९·२ |
| (५) सर्व्हिसेस | ८३·८ | १६·७ | १००·५ |

गेल्या कांहीं वर्षांत खाजगी हिंदी भांडवलदारांशीं सहकार्य करून काढलेल्या संयुक्त मालकीच्या कारखान्यांत बरेंच ब्रिटिश भांडवल येत आहे. अशा प्रकारच्या गुंतवणुकींत भारत सरकारला आस्था असते. कारण त्यामुळें परदेशांतून आणाव्या लागणाऱ्या भांडवलासाठी आणि यंत्रसामग्रीसाठी लागणारें परदेशीय चलन उपलब्ध होतें आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास होण्यास मदत होते. त्याशिवाय विकासासाठी आवश्यक असणाऱ्या तांत्रिक ज्ञानाचाहि देशाला लाभ होतो. भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या चौकटींत अशा प्रकारच्या संयुक्त मालकीच्या संघटनांत परदेशी भांडवल गुंतविण्यास बराच मोठा वाव आहे, आणि ही गोष्ट खाजगी मालकीच्या विभागाप्रमाणेंच सार्वजनिक मालकीच्या विभागाबाबतहि खरी आहे. ह्या परिस्थितीचा फायदा बरेंच मोठें ब्रिटिश भांडवल भारतांत आलेंहि आहे. घेऊन पुढील कोष्टकावरून ब्रिटनच्या सहकार्यानें काढण्यांत आलेल्या संयुक्त कारखानदारीची कल्पना येऊं शकेल.

### परदेशीय सहकार्याचे करार

| काळ | एकूण संघटना | संयुक्त मालकीच्या संघटना |
|---|---|---|
| १९५९ एप्रिल ते १९६० मार्च | १७१ | ५१ |
| १९६० ,, १९६१ ,, | ४२८ | १३७ |
| १९६१ ,, १९६२ ,, | ४२५ | १२९ |
| १९६२ ,, १९६३ ,, | २५० | ७३ |

१९६२ मध्यें भारत सरकारनें परदेशांच्या सहकार्यानें काढण्यासाठी ज्या योजनांना मंजुरी दिली त्यांची संख्या ३९७ आहे. ह्या योजनांत तांत्रिक आणि आर्थिक सहकार्य असणाऱ्या आणि नव्या व चालू योजनांचा समावेश आहे. १५२ नव्या औद्योगिक संघटनांना मंजुरी देण्यांत आली होती, त्यांपैकी ४३ संघटनांत ब्रिटिश भांडवल गुंतविण्यांत आलेलें होतें. १९६२ सालीं गुंतविण्यांत आलेल्या ब्रिटिश भांडवलाची उद्योगधंद्यानुसार वर्गवारी अशी आहे.

| धंद्याचा प्रकार | संख्या |
|---|---|
| यंत्रसामग्री......... | १ |
| रासायनिक......... | ४ |
| एंजिनिअरिंग......... | ४ |
| धातुविषयक......... | ६ |
| वीज, एंजिनिअरिंग......... | ८ |
| मेकॅनिकल एंजिनिअरिंग......... | २ |
| यांत्रिक हत्यारें......... | ३ |
| अन्नपदार्थ......... | १ |
| शास्त्रीय उपकरणें......... | ३ |
| कापड धंदा......... | १ |
| संकीर्ण......... | ८ |

### भारत–ब्रिटन औद्योगिक सहकार्य

१९६३ सालीं एकूण ३२·५१ कोटी रुपयांच्या प्राथमिक भांडवल–उभारणीसाठी परवानगी देण्यांत आली. त्यापैकी संयुक्त मालकीच्या करारांतर्गत संघटनांना दिलेली भांडवल–उभारणीची परवानगी ४·९६ कोटी रुपयांची होती. सध्यां बऱ्याच प्रसिद्ध ब्रिटिश कंपन्या भारतांत काम करीत आहेत. भारताच्या अर्थ-व्यवस्थेंत ब्रिटिश कारखानदारी किती महत्त्वाचें कार्य करीत आहे तें उद्योगधंद्यानुसार करण्यांत येत असलेल्या सहकार्याच्या पाहणीवरून लक्षांत येण्यासारखें आहे. भारत-ब्रिटन औद्योगिक सहकार्यांतील सर्वांत लक्षांत भरण्यासारखें उदाहरण दुर्गापूर पोलाद कारखान्याचें देतां येईल. ह्या कारखान्याच्या उभारणींत १३ ब्रिटिश एंजिनिअरिंग कंपन्यांनीं भाग घेतलेला आहे. त्याची प्रारंभींची उत्पादनक्षमता दरसाल १० लाख टन पोलादांचे ठोकळे निर्माण करण्याची आहे. ब्रिटननें परदेशांत उभारलेला एंजिनिअरिंगचा हा सर्वांत मोठा कारखाना आहे. शिवाय भारतामधील सार्वजनिक मालकीच्या एका औद्योगिक संघटनेशीं खाजगी ब्रिटिश भांडवलानें केलेल्या सहकाराचें हें एक उदाहरण आहे. भारतामधील रासायनिक आणि खताच्या उद्योगधंद्यांच्या विकासांत ब्रिटननें महत्त्वाचें सहकार्य केलेलें आहे. सिंद्री येथील खताचा कारखाना हा सार्वजनिक विभागांतील पहिलाच खतकारखाना आहे. त्याच्या उभारणीसंबंधीं इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज भारत सरकारचे सल्लागार आहेत. त्याचप्रमाणें बिहारमध्यें उभारण्यांत आलेल्या व्यापारी स्फोटकांच्या पहिल्या सरकारी मालकीच्या कारखान्याच्या स्थापनेंतहि वरील संघटनेनें साह्य दिलेलें आहे. ऑइल इंडिआ लि. ह्या कंपनींत भारत सरकार आणि बर्मा ऑइल ह्यांची ५० टक्के भागीदारी आहे. ह्या कंपनीनें भारतामधील पहिलेच तेलवाहक नळ घालण्याचें काम नुकतेंच केलें आहे.

### भारत : किफायतशीर गुंतवणुकीस अनुकूल क्षेत्र

अर्थव्यवस्थेचा विकास व औद्योगीकरण साधण्यासाठी भारत प्रयत्न करीत आहे. पण ह्या बाबतींत परदेशीय चलनाचा नेहमींच भासणारा तुटवडा ही एक फार मोठी अडचण त्याला सोसावी लागत आहे. भारताच्या निर्यातींत फार मोठ्या प्रमाणावर वाढ झाली, तरीसुद्धां अजून बराच काळपर्यंत परदेशीय चलनाची गरज भासतच राहणार आहे, आणि निर्यातींत फार मोठी वाढ होण्याचीं लक्षणें अद्याप तरी दिसत नाहींत, ही गोष्ट उघड होत चालली आहे. परदेशीय चलनाची आवश्यकता आणि उपलब्ध परदेशीय चलन ह्यांच्यांत असणारी तफावत भरून काढण्याच्या कामीं उभयता देशांच्या सरकारांनीं सरकारी पातळीवर केलेले प्रयत्न पुरे पडणार नाहींत हें आतां स्पष्ट झालेलें आहे. सरकारी पातळीवरील आर्थिक मदत तोकडीच पडणार आहे. भांडवल पुरविण्याच्या कामीं ब्रिटनमधील खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना महत्त्वाचें आणि उपयुक्त कार्य करतां येण्यासारखें आहे. परदेशीय भांडवलाच्या गुंतवणुकीसाठी भारत ही एक उत्तम बाजारपेठ आहे ह्याविषयीं शंका नाहीं. ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडनें नुकतेच जे आंकडे दिले आहेत त्यावरून असें दिसतें कीं, इतर देशांतील गुंतवणुकीशीं तुलना करतां भारतामधील भांडवल-गुंतवणुकीवर ब्रिटनला अधिक चांगला नफा सुटतो. पुढील कोष्टकावरून हें स्पष्ट होईल.

### निवडक देशांत गुंतविलेल्या ब्रिटिश भांडवलावर सुटणाऱ्या नफ्याचें प्रमाण

| देश | परदेशीं गुंतविलेलें एकूण भांडवल (आंकडे दशलक्ष पौंडांचे) | परदेशांतील ब्रिटिश कंपन्यांच्या नफ्याचें प्रमाण % | निव्वळ भांडवलावर सुटलेल्या नफ्याचें प्रमाण % |
|---|---|---|---|
| मलाया | १०४·२ | १४·६ | १४·० |
| भारत | १७०·७ | १६·१ | ९·४ |
| ब्राझिल | ३५·३ | ३·० | ८·५ |
| ऑस्ट्रेलिआ | ४०१·३ | २८·५ | ७·१ |
| अर्जेंटायना | ३०·४ | २·१ | ६·९ |
| पाकिस्तान | ८३·९ | २·९ | ३·५ |
| कॅनडा | ६००·० | १८·३ | ३·० |

टेलर्स
व्ही. आर. सप्रे
अप्पा बळवंत चौक,
पुणें २.

रेखा फर्निशर्स
३२४, सदाशिव, पुणें.
( टेलिफोन नं. ५६५१३ )
उत्कृष्ट फर्निचरसाठी सुप्रसिद्ध;
घरांची व दुकानांची शोभा वाढविणें
हें आमचें वैशिष्ट्य आहे.

# सहकार, स्वाहाकार आणि राजकारण

## ( एका वृद्ध सहकाऱ्याची मनोव्यथा )

लेखक :—द. दि. चितळे

महाराष्ट्रांतील वेगवेगळ्या सहकारी संस्थांशीं माझा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष निकटचा संबंध गेलीं चाळीस–पंचेचाळीस वर्षे आलेला असल्यानें सहकारी चळवळींत झालेलीं अनेक स्थित्यंतरें मला आजवर पाहावयास मिळालीं आहेत. सहकारी संस्थांचा सभासद, संचालक, सेवक, सल्लागार, संस्थापक, वगैरे अनेक भूमिकेवरून मला या चळवळीची यथामति सेवा करण्याची आजवर संधि मिळाली आहे आणि म्हणून मी स्वतःस एक सहकारी असें समजतों. तसेंच हिंदुस्थानांत ही चळवळ सुरू होऊन सुमारें साठ वर्षे झालीं. परंतु माझें वय त्यापेक्षांहि सुमारें दहा वर्षांनीं जास्त असल्यानें मी स्वतःस आतां वृद्ध समजतों; आणि म्हणून माझे विचार हल्लींच्या माझ्या कांहीं तरुण सहकारी मित्रांना फारसे मानवणार नाहींत याची मला पूर्ण जाणीव आहे.

### सहकाराचीं फळें

या चळवळीमुळें महाराष्ट्रांतील सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक जीवनावर गेल्या चाळीस–पन्नास वर्षांच्या कालखंडांत काय परिणाम झाला याचें सिंहावलोकन केल्यास हें निश्चितपणें मान्य करावें लागेल कीं, सहकारी पतपेढ्यांचे सभासद असलेल्या अनेक लहान–मोठ्या शेतकऱ्यांचीं, दुकानदारांचीं, कारागिरांचीं, नोकरांची अगर कामगारांची राहणी उंचावली असून त्यांची आर्थिक स्थितीहि सुधारली आहे. एवढेंच नव्हे तर संघटितपणें व सहकार्यानें प्रयत्न केल्यास आपण लहान-मोठे कारखानदाराहि होऊं शकूं असा आत्मविश्वास अनेक शेतकऱ्यांमध्यें निर्माण झालेला आहे. ही सर्वसाधारण परिस्थिति विशेष आशाजनक आहे, यांत संशय नाहीं.

अशी परिस्थिति असली तरीहि आपण आत्मसंतुष्ट राहिल्यास या चळवळीची वाढ मंदावेल अगर ती खुंटेल अशी साधार भीति वाटते; आणि म्हणून अलीकडे या चळवळींत जे कांहीं दोष निर्माण होत आहेत अगर झाले आहेत असें मला वाटतें, त्या बाबतचे माझे कांहीं विचार मी खालीं देत आहें.

### स्वाहाकाराची कीड

अलीकडे "सहकार" म्हणजेच "स्वाहाकार" अशी टीका अनेक ठिकाणीं केल्याचें माझ्या ऐकिवांत आहे. या टीकेमुळें माझ्यासारख्या सहकाऱ्यास फार खेद व्हावा व दुःख वाटावें हें स्वाभाविक आहे. कारण "सहकारी" म्हटला कीं तो सच्छील, सदाचारी व प्रामाणिक असलाच पाहिजे असा माझा आजवरचा दावा आहे; आणि म्हणून ही टीका मला फार जाणवते. परंतु निर्विकारपणें मी जेव्हां त्याबाबतचा विचार करतों आणि त्या-संबंधीं शक्य तेथें चौकशी करतों तेव्हां मला असें दिसून येतें कीं, या प्रकारच्या टीकेंत बरीचशी सत्यता आहे. सामान्य खेड्या-पासून तों लहानमोठ्या शहरांत काम करीत असलेल्या बऱ्याच प्राथमिक संस्थांच्या किंवा मध्यवर्ती संस्थांच्या किंवा बँकांच्या कार्यकारी मंडळांत किंवा बोर्डांत ठिकठिकाणचे तथाकथित "पुढारी"सूक्तासूक्त मार्गानें घुसतात आणि मग त्या त्या संस्थांकडून आपल्या स्वतःचा, स्वतःच्या नातेवाइकांचा व इष्टमित्रांचा फायदा शक्य त्या, भल्या बुऱ्या मार्गानें, वाममार्गानें देखील ते करून घेत असतात. याबाबत त्यांना कसलीहि फिकीर वाटत नाहीं. सदसद्-विवेक बुद्धि जागृत असलेल्या कांहीं सभासदांनीं सहकारी खात्याच्या अधिकाऱ्यांकडे या कामीं तक्रार केली तर त्यांचेकडून कांहींहि दाद लागत नाहीं. एवढेंच नव्हे तर "आपणास जरूर वाटत असेल तर आपण परस्पर लवादाकडे फिर्याद करा" असा ते त्यांस पोक्त व साळसूदपणाचा सल्ला देतात ! कारण या "पुढाऱ्यांचा" वरपर्यंतहि वशिला पोहोंचण्याची त्यांना शक्यता वाटत असल्यानें ते अधिकारी त्या "पुढाऱ्यांना" फार भीत असतात; आणि माझ्या दृष्टीनें तें मनुष्यस्वभावास धरूनहि आहे.

### स्वाहाकाराचे नमुने


स्वाहाकाराचे कांहीं नमुने पुढील प्रकारचे असल्याचें माझ्या दृष्टीस आलें आहे :—

( १ ) सहकारी साखर कारखाना किंवा सहकारी तेलाची गिरणी उभारण्याचे ठरवितांच भाग, ठेवी, वगैरे साधनांनीं जम-विलेल्या भांडवलामधून संस्थेच्या बाल्यावस्थेंतच तिच्या चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर, वगैरे मंडळींचें मानधन आणि त्यांच्यासाठी विकत घेतल्या जाणाऱ्या बादशाही थाटाच्या मोटारगाड्या यासाठीं केला जाणारा हजारों रुपयांचा खर्च पाहिला, म्हणजे जनतेनें घाम गाळून मिळविलेल्या पैशाचा हे चालक लोक स्वाहा-कार करीत आहेत, अशी टीका केली गेल्यास ती योग्यच आहे असें म्हणावें लागेल.

( २ ) सहकारी संस्थांचे संचालक हे आपणाकडून जनतेची जास्तींत जास्त सेवा घडावी याच एका उच्च हेतूनें निःस्वार्थपणें काम करण्यासाठी पुढें येतात असें मानलें जातें; व तें बरोबरहि आहे. अशा स्वयंसेवकांना संस्थेचें काम करीत असतांना प्रत्यक्ष अशी झीज फारशी सोसावी लागूं नये म्हणून त्यांना प्रवासासाठीं वगैरे करावा लागणारा प्रत्यक्ष खर्च कांहीं नामवंत संस्था त्यांना देत असतात; परंतु त्याचा गैरफायदा घेणारे अनेक "पुढारी" माझ्या पाहण्यांत आहेत. महाराष्ट्रांतील एका जिल्ह्यांत असलेच एक "पुढारी" अनेक नामवंत सहकारी संस्थांच्या कार्यकारी मंडळावर अनेक खटपटी–लटपटी करून निवडून आले, अगर प्रतिनिधि म्हणून नेमले गेले. त्या "पुढाऱ्यांना" प्रवासभत्ता म्हणून दरमहा अवघे रुपये १२०० ते १३०० मिळत असत असें म्हणतात. ते खरें असेल तर एखाद्या जिल्ह्याचा कलेक्टर म्हणून, प्रसंगोपात लोकांची टीका व शिव्याशाप सहन करून, जनतेची जबाबदारीची पगारी सेवा करण्यापेक्षां त्या सद्-गृहस्थानें वर उल्लेख केलेल्या "पुढाऱ्या" प्रमाणें जनतेची बिन-जबाबदारीची मनोभावें निःस्वार्थपणें सेवा करणें हें त्यास आर्थिक दृष्टीनें अधिक सोयीचें होणार नाहीं काय, असें माझ्यासारख्या सहकाऱ्यास वाटल्यास त्यांत गैर काय आहे ?

( ३ ) माझे ऐकिवांत असें आहे कीं, महाराष्ट्रांतील एका मध्य-वर्ती सहकारी बँकेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची संख्या सुमारें वीस–एकवीस होती. एवढ्या मोठ्या कार्यकारी मंडळास दैनंदिन कामाकडे लक्ष देऊन वेगवेगळ्या विषयांबाबतचे निर्णय झटपट घेणें शक्य होणार नसल्यानें, त्या मंडळानें आपल्या वेग-

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

## — न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —

विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

# शिवदर्शन लॉज

डेक्कन जिमखाना कॉर्नर, पुणें ४.
फोन नं. ५७९८६
५५७३७ घरचा फोन

## बॉंबे ट्रायव्हल्स् (प्रा.) लि.

रेल्वे तिकिटें घरपोंच दिलीं जातात.
त्याचप्रमाणें विमानें–आगबोटीचीहि तिकिटें,
पासपोर्ट, व्हिसा वगैरे.

[१] पुण्यांतील उत्तमोत्तम वस्तींत.
[२] सर्वांनीं वाखाणलेलें.
[३] म्युनिसिपल बस स्टँड, टॅक्सी, रिक्षा, खाली
[४] पोस्ट ऑफिससमोर, थिएटर्सना नजिकच.
[५] स्वच्छता, टापटीप कटाक्षानें ठेवली जाते.
[६] हवेशीर खोल्या, व प्रत्येक खोलींत पंखा.

## मेसर्स बाबुराव शिरोळे अँड सन्स

प्रोप्रायटर्स

## पत्रानें आगाऊ खोल्या राखून ठेवल्या जातात.

सहकाराचा मार्ग हा दुर्बलांना सबल
करण्याचा मार्ग होय—डॉ. धनंजयराव गाडगीळ

अचूक मार्गदर्शन व तदनुरूप अपार कष्ट आणि म्हणून
भक्कम आर्थिक परिस्थिति लाभलेली

# दि सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सातारा

योजनाबद्ध सहकारी पद्धतीनें ग्रामीण अर्थव्यवस्था भक्कम करण्यांत आणि ठेवीदार व उत्पादक या दोघांना संतोष देण्यांतच अभिमान वाळगते.

फोन नं. ३८ ] मुख्य कचेरी : सातारा [ तार : कृषि बँक

ता. ३०–६–६४ अखेर
(लाखांत)

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. ४५·८६ |
| ठेवी | रु. २५६·६० |
| दिलेलीं कर्जें | रु. २६९·९२ |
| खेळतें भांडवल | रु. ४२९·५८ |

आपल्या १९ शाखांमार्फत जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचा योग्य वांटा उचलीत आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

स. गो. तिळवे,
मॅनेजर.

रघुनाथराव दौ. पाटील,
चेअरमन.

सतत २८ वर्षें अखंड प्रगति

# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

स्थापना : १९३५ ] [ शाखा : माधवनगर

सहकारी चळवळींत अग्रेसर राहून देशाच्या प्रगतीस साहाय्य करीत आहे.

## सेवा :

महाराष्ट्र, गुजराथ, सौराष्ट्र व कर्नाटक यांमधील ८०० गांवांवरील ड्राफ्टस् देण्याची सोय.

मोटर्स, स्कूटर्स इ. साठी बँकगॅरंटी देण्याची अद्ययावत सोय.

सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार.

ल. य. लागू,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजर.

ग. का. दांडेकर,
डी. एम. ई. ई.
चेअरमन.

वेगळ्या व सुटसुटीत अशा फक्त बारा–तेरा पोट समित्या नेमिल्या; व त्या प्रत्येक समितीवर आपल्यापैकीं अवघे सोळा–सतरा सदस्य नेमले. या योजनेमुळें त्या संस्थेच्या कार्यक्षमतेंत यत्किंचितहि वाढ झाली नसली, तरी त्यामुळें मंडळावरील प्रत्येक सदस्याचा आर्थिक फायदा पर्यायानें हमखास झाला यांत संशय नाहीं. या योजनेपूर्वी प्रत्येक सदस्यास दरमहा सामान्यतः एक वा दोन दिवसांचा प्रवासभत्ता मिळत असे; तो या योजनेमुळें दरमहा दहा ते पंधरा दिवसांचा प्रवासभत्ता त्यास सहजी मिळूं लागला. यास आपण "स्वार्थत्याग" म्हणावा अगर "स्वाहाकार" म्हणावा, हें कोडें मला अद्याप सुटलें नाहीं. याबाबत मीं असेंहि ऐकतों कीं, पोट समितीपुढें मांडण्यात येणारीं सर्व कामें एकाच सभेंत पुरीं न करतां समितीची सभा दोन दिवस रेंगाळत चालत असे. हेतु हा कीं, तेवढाच एक दिवसाचा जादा प्रवास भत्ता सदस्यांच्या पदरीं सहजीं पडावा. हें खरें असेल तर "आंधळें दळतें आणि कुत्रें पीठ खातें" ही म्हण यथार्थ आहे.

(४) सभासदास दिलें जाणारें कर्ज हें त्याला झेपेल असेंच असलें पाहिजे अशी विचारसरणी सुमारें सन १९५० पर्यंत प्रचलित होती. कर्ज देण्यापूर्वी कर्जदाराची कर्ज परत फेडण्याची ऐपत व त्याची जिंदगी म्हणजे त्याचा जमीनजुमला हा मुख्यतः विचारांत घेतला जात असे. म्हणजेच "तारणा" कडे लक्ष देऊन व कर्जफेड करण्याची त्याची ऐपत लक्षांत घेऊन त्यास कर्ज दिलें जात असे. परंतु हा जुना जमाना आतां पार बदलून गेला आहे. हल्लीं दिलें जाणरें कर्ज हें "तारणा" कडे न पाहतां "कारणाकडे" पाहून आणि कर्जदाराची गरज लक्षात घेऊनच देण्याचें धोरण ठरलें आहे. हें धोरण बरोबर आहे किंवा नाहीं याचें विवेचन मी येथें करणार नाहीं. या धोरणाचा स्वार्थी 'पुढाऱ्यांनीं' कसा फायदा करून घेतला आहे, तेंच मी येथें सांगणार आहें.

उसासारखें पीक कोरडवाहू शेतांत करण्याची मनीषा एखाद्या शेतकऱ्यानें कां बाळगूं नये, आणि उसाचें "कारण" पुढें करून त्यानें भरपूर कर्जाची मागणी आपल्या स्थानिक पतपेढी-कडे त्या उसासाठीं कां करूं नये, हें मला समजत नाहा. तसेंच स्वतःच्या ताब्यांत नसलेल्या शेतांत ऊंस लावण्याची त्यास इच्छा झाल्यास त्यांत गैर तें काय आहे ? अशा प्रकारचीं कर्जे आपल्या सभासदांना देतां यावींत म्हणून त्या पतपेढ्यांना तेथील स्थानिक मध्यवर्ती सहकारी बँकेनें कर्जे दिलीं तर त्याचा दोष मध्यवर्ती बँकांना कसा लावतां येईल ? हीं उदाहरणें मी काल्पनिक म्हणून देत नसून, तीं कांहीं ठिकाणीं घडल्याचें माझ्या ऐकिवांत आहे म्हणूनच मी तीं येथें नमूद केलीं आहेत. अशा प्रकारचें कर्ज एका शेतकरी सभासदानें इतर सभासदांप्रमाणेंच, आपल्या स्थानिक सहकारी पतपेढीकडून मिळविल्यानंतर त्याला पश्चात्ताप झाला व त्यानें आपणहूनच त्याबाबतची तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्यां-कडे केली असें मी ऐकतों. हें खरें असेल तर धन्य त्या शेत-कऱ्याची ! त्याला जनलज्जा नसली तरी मनलज्जा खासच वाटली असली पाहिजे असें दिसतें. अशा प्रकारचीं कर्जे डोळे मिटून देतांना लाचलुचपत तर झाली नसेल ना, आणि त्यांत "पुढाऱ्याचा" सिंहाचा वाटा तर नसेलना, असा संशय कोणी घेतल्यास दोष देतां येईल असें मला वाटत नाहीं.

हा प्रकार "स्वाहाकाराचा" नाहीं तर मग कशाचा ?

(५) प्राथमिक सहकारी संस्थेला मध्यवर्ती सहकारी बँकेनें मंजूर केलेल्या कॅश क्रेडिटचा उपयोग कांहीं स्वार्थी चालक अगर संचालक आपल्या स्वतःच्या खाजगी व्यवहारासाठीं व फायद्यासाठीं बिनबोभाटपणें, सरकारी व स्थानिक हिशेब तपास-नीस, बँकेचे तपासणी अंमलदार, वगैरेंच्या डोळ्यांत धूळ टाकून अनेक महिनेच नव्हे तर अनेक वर्षेंहि कसा करून घेत असतात याचे कांहीं मासले देण्याचा मोह मी आवरीत आहें. ज्या महा-भागांना हे व्यवहार गुपचूपपणें कसे होऊं शकतात हें अद्याप स्पष्टपणें कळलेलें नाहीं त्यांना तो तपशील समजल्यास त्यां-पैकीं कांहींना कदाचित् दुर्बुद्धि होईल अशी मला भीति वाटते व म्हणूनच मी त्या विषयासंबंधीं जास्त लिहिणार नाहीं. सहकारी संस्थांच्या भांडवलाचा हा "स्वाहाकार" नाहीं काय ?

## अधिकाऱ्यांना कांहीं सूचना

वर दिलेलें "स्वाहाकाराचें" वर्णन प्रत्येक सहकारी संस्थेस लागूं पडेलच असें मी म्हणत नाहीं. तथापि "शितावरून भाताची परीक्षा" या न्यायानें "सहकार" म्हणजेच "स्वाहाकार" अशी टीका केली जाण्यांत तूर्त भरपूर कारण आहे हें कोणीहि मान्य करील. ही अयोग्य परिस्थिति आपल्या देशांतील सहकारी चळवळीची प्रगति होण्याच्या दृष्टीनें बरी नाहीं असें मला वाटतें. या कामीं सहकारी खात्याच्या अंमलदारांनीं विशेष लक्ष घालावयास पाहिजे असें माझें स्वतःचें मत आहे. वर उल्लेख केलेल्या "पुढाऱ्यांची" कीड सहकारी चळवळीस लागतां कामा नये व ती तशी लागली असल्यास तिचा वेळींच बीमोड झाला पाहिजे या दृष्टीनें सरकारानेंदेखील जरूर ते इलाज वेळींच योजावेत अशी माझी सरकारास सूचना आहे.

## राजकारणाचा उपसर्ग

सहकारी चळवळ ही राजकारणापासून अगदीं अलिप्त असली पाहिजे असें माझें मत आहे. राजकारण हें सहकारी चळवळीस कुपथ्य आहे असें मानणारा मी आहें. राजकारणांत वेळोवेळीं परिस्थित्यनुरूप आंदोलनें होत असतात. परंतु सहकारी चळवळीस असे धक्के बसतां कामा नये. सहकार हा आर्थिक जीवन जगण्याचा विशिष्ट प्रकारचा मार्ग आहे किंवा आर्थिक जीवन जगण्याची ती एक विशिष्ट पद्धति आहे असें मानलें जातें. ही पद्धति स्थिर असावयास पाहिजे. नाहींतर त्याचा समाजाच्या आर्थिक ज. नावर व परिस्थितीवर फार मोठा आघात होण्याचा संभव असतो. आणि म्हणून या चळवळीनें राजकारणापासून चार पावलें दूरच राहणें अधिक चांगलें.

सहकारी चळवळीचा प्रसार आतां बहुतेक सर्व खेड्यापाड्यां-पर्यंत झालेला असल्यानें बहुसंख्य खेडुत व बरेचसे नागरिक आतां सहकारी छत्राखालीं आलेले आहेत. आपल्यासारख्या लोकशाही देशांत राजकारणांत पडणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचे डोळे नेहमीं निवडणुकांकडे लागलेले असणार हें उघड आहे. अशा कार्यकर्त्यांना जनतेशीं निकटचा संबंध ठेवण्यासाठी सहकारी संस्था फार उपयोगी पडतात असें अनुभवास आलेलें आहे. त्यामुळें राजकारणांत पडणाऱ्या वेगवेगळ्या पक्षांच्या किंवा गटांच्या कार्यकर्त्यांना आपली छाप वेगवेगळ्या सहकारी संस्थांवर सदोदित राहावी असें वाटणें स्वाभाविक आहे; आणि त्या दृष्टीनें ते आपापले पित्ते वेगवेगळ्या सहकारी संस्थांच्या कार्यकारी मंडळावर निवडून आणण्याचा अटोकाट प्रयत्न करीत असतात. हे कार्यकर्ते या निवडणुकीच्या प्रचारार्थ जेव्हां बाहेर पडतात व वेगवेगळ्या ठिकाणीं मतें मिळविण्यासाठी व्याख्यानें देतात तेव्हां ते आपणास सोयीचें होईल त्याप्रमाणें त्या त्या क्षेत्रांतील वेगवेगळ्या सहकारी संस्थांनीं केलेल्या कामगिरीची स्तुति अगर निंदा करतात. ही स्तुति किंवा निंदा परिस्थित्यनुरूप असतेच असें नाहीं. परंतु त्याचा परिणाम मात्र सहकारी चळवळी-

संबंधीं गैरसमज पसरविण्यांत कित्येक वेळां होतो असें अनुभवास आलेलें आहे. सहकारी चळवळीस आलेलें यश हें केवळ आपल्या पक्षांतील किंवा गटांतील वेगवेगळया सहकारी संस्थांच्या कार्यकारी मंडळावर काम करीत असलेल्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांचें फळ असून, अपयश हें मात्र इतर राजकीय पक्षांमधून अगर गटांमधून त्या त्या कार्यकारी मंडळावर निवडून गेलेल्या सदस्यांच्या अकार्यक्षमतेचें द्योतक आहे, असें सर्वच प्रचारक आपापल्या व्याख्यानांतून सांगत असतात. त्यामुळें सामान्य सहकारी सभासदांची दिशाभूल होते. त्यांस आपल्या सहकारी संस्थेचें खरेंखुरें चित्र समजूं शकत नाहीं. ही परिस्थिति सहकारी चळवळीच्या वाढीस फारच मारक ठरते असा अनुभव आहे. सबब सर्वच सहकारी सभासदांनीं राजकारणांत पडलेल्या कार्यकर्त्यांपासून दोन हात लांब राहावें हेंच चांगलें व त्यांतच त्यांचा फायदा होईल असें माझें मत आहे.

## निवडणुकीचे अड्डे

फारच थोडया कालावधींत घोडदौडीनें आपली प्रगति करून महाराष्ट्रांतील ज्या जिल्ह्यानें राज्यांतील सहकारी चळवळींत अग्रेसरत्व मिळविलें त्या जिल्ह्यांतील वेगवेगळया पातळीवर असलेल्या सहकारी संस्थांच्या साधारण सभांतून झालेली रणधुमाळी, त्याबाबत वेगवेगळया वर्तमानपत्रांतून आलेल्या अहवालावरून सहजीं समजून येते. त्यावरून आतां या संस्था "सहकारी" समजाव्यात किंवा कसें असा प्रश्न माझ्यासारख्या सामान्य सहकारी कार्यकर्त्यापुढें उभा राहतो. या सभांना पोलिसांचें संरक्षण घ्यावें लागावें ही गोष्ट माझ्या दृष्टीनें सहकारी चळवळीस कमीपणा आणणारी खासच आहे. वेगवेगळया प्रमुख सभागृहांत सहकारी संस्थांना आपल्या सभा भरविण्यास इंडियन पीनल कोडाच्या कलम १४४ अन्वयें बंदी घालण्याचा प्रसंग यावा, हें पाहून तर मला अत्यंत खेद वाटतो व मला स्वाभाविकच असें वाटतें कीं, या संस्था आतां "सहकारी संस्था" म्हणून राहिल्या नसून त्या वेगवेगळया राजकीय पक्षांतील किंवा गटांतील "पुढाऱ्यांचे" निवडणुकीचे अड्डेच बनले आहेत. ही परिस्थिति खऱ्या सहकारी चळवळीस निश्चितपणें मारकच ठरेल यांत संशय नाहीं. सबब सहकारी चळवळींतील निश्चितपणें ज्येष्ठ कार्यकर्त्यांनीं, सहकारी खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं आणि सरकारनेंदेखील, याची वेळींच दखल घ्यावी अशी माझी त्यांना प्रेमाची सूचना आहे. ही गुंडगिरीची वृत्ति अद्याप फारशी बोकाळलेली दिसत नाहीं तोंच शिस्तीचे कडक इलाज सत्वर अमलांत आणले जावेत असें मला वाटतें. नाहींतर महाराष्ट्रांतील नामवंत जिल्ह्यांतून सहकारी चळवळीचें उच्चाटन होईल अशी भीति वाटते; व कदाचित ही चळवळ म्हणजे समाजांतील शांतता बिघडविणारी एक चळवळ आहे असा तिचा बद्लौकिक होऊन त्याचा गैरफायदा या चळवळीचे विरोधक घेऊं शकतील अशीहि भीति वाटते. त्या जिल्ह्यांत निर्माण झालेली ही वावटळ आपल्या राज्यांतील इतर जिल्ह्यांतून हळूहळूं पसरणार तर नाहींना अशीहि मला साधार भीति वाटते. सबब खऱ्या सहकारी कार्यकर्त्यांनीं राजकारणांत पडलेल्या कार्यकर्त्यांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा अशी माझी त्यांना अत्यंत कळकळीची विनंती आहे. सहकारी चळवळ ही मुख्यत: गरीबगुरीबांसाठी व सांपत्तिक दृष्टीनें कमकुवत असलेल्या लोकांसाठीं असून ती श्रीमंत व्यापारी, मोठाले व धनवान शेतकरी, वगैरे यांच्यासाठीं नाहीं हें सर्वश्रुत आहे. सबब अशा लोकांना या चळवळींत महत्त्व असूं नये असें मला त्यांना सुचवावयाचें आहे.

## नोकरांची दैन्यावस्था

वर उल्लेख केलेल्या जिल्ह्यांतील वेगवेगळया सहकारी संस्थांत काम करीत असलेल्या सेवकांना वरील परिस्थितीचा फारच उपसर्ग पोहोंचतो आहे असें मी ऐकतों. त्यांना नेहमींच तारेवरील नाच करण्याचा प्रसंग येत असतो असेंहि माझ्या ऐकिवांत आहे. तेथें मोठमोठे ऐरावत नेहमीं झुंजत असतात आणि या झुंजींत सेवकरूपी गरीब बापडीं बकरीं नाहक चिरडलीं जातात असें म्हणतात. या कामीं कांहीं जुन्या व अनेक वर्षें उत्तम प्रकारें कामगिरी केलेल्या निवडक नोकरांनादेखील निष्कारण झळ सोसावी लागली असें वर्तमानपत्रांत वाचून मला फार दुःख झालें.

ही सर्व परिस्थिति आपल्या राज्यांत सहकारी चळवळीची योग्य प्रकारें वाढ होण्याच्या दृष्टीनें फारच असमाधानकारक आहे असें मला वाटतें. या सर्वांस राजकारणच जबाबदार आहे असें माझें ठाम मत आहे. बा राजकारणा, धन्य आहे तुझी आणि धन्य आहे त्या गटबाजीची !!!


✣ ही दीपावली सुखाची जावो ✣

महागाईच्या काळांतसुद्धां रुचकर भोजनाबद्दल पुण्यांत सर्वतोमुखीं असलेलें आपलें आवडतें ठिकाण

**जनसेवा भोजनालय** यास भेट द्या. मग खात्री पटेल.

टे. नं. ५७१२६

प्रोप्रा.—डी. जी. गोरे

डेकन जिमखाना पोस्टाजवळ, पुणें ४.



**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

बचतीच्या आकर्षक योजना

| | व्याजाचा दर |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

# धरणें बांधण्याच्या कामांत इटालिअन कंपन्या आघाडीवर

## अमेरिकन कंपन्यांचें वेगळें तंत्र

मोठीं धरणें बांधण्याची पद्धत विसाव्या शतकांतील आहे. त्यांपैकी कांहीं प्रचंड असून शिवाय दिसायलाहि सुरेख आहेत. टिकाऊ असल्यामुळें २० व्या शतकांतील बांधकामाचीं स्मारकें म्हणून तीं इजिप्तमधील पिरॅमिडस् अगर रोमन लोकांनीं बांधलेले रस्ते ह्यांच्याप्रमाणें चिरकालीन आहेत. मोठीं धरणें बांधणारे एंजिनिअर्स धरणांची उंची ५० फूटांपेक्षा अधिक असेल तरच त्यांना 'मोठी' असें म्हणतात. सध्यां जगांत अस्तित्वांत असलेलीं, बांधलीं जात असलेलीं अगर अजून कल्पनेत असलेलीं अशीं १० हजार मोठीं धरणें आहेत. त्यांपैकी फक्त एकदशांश धरणें विसाव्या शतकाला प्रारंभ होण्यापूर्वींचीं आहेत. जगांतील एकूण धरणांपैकी निम्मी धरणें १९३९ सालापूर्वी बांधलीं गेलेलीं अगर आराखडा काढला गेलेलीं आहेत. नवीन धरणांपैकी कांहीं आफ्रिका, मध्यपूर्व आणि आशिया ह्या भूभागांतून बांधण्यांत येते आहेत. पुष्कळदां त्यांपैकी बरीच नव्यानें उदयास आलेल्या राज्यांच्या इभ्रतीसाठी बांधण्यांत येतात असें दिसतें. घानामध्यें 'व्होल्टा' धरण पुरें होण्याच्या मार्गावर आहे. र्‍होडेशिआंत 'करीबा' धरण बांधण्यांत येत आहे. त्याशिवाय सुदानमध्यें आणि नायजेरिआंतहि मोठीं धरणें बांधण्यांत येत आहेत. पण, ह्या सर्वांपेक्षा इजिप्तमधील आस्वान धरण अतिप्रचंड आहे. आस्वान सोडून बाकीचीं धरणें इटालिअन एंजिनिअर्स बांधीत आहेत. ह्यावरून असें वाटेल कीं, आफ्रिकेंतील देशांतच धरणें बांधण्याचा हव्यास आहे. पण तसें नाहीं. गोष्ट आश्चर्य वाटण्यासारखी आहे; परंतु बांधून पुऱ्या झालेल्या धरणांपैकी चवथा हिस्सा धरणें अमेरिकेंतील आहेत. जपानमध्यें अमेरिकेच्या खालोखाल १,७०० धरणें पुरीं करण्यांत आलीं आहेत. रशिआंत मात्र ४४ च धरणें पुरीं झालीं आहेत. ब्रिटनमध्यें सुमारें ४०० धरणें बांधलेलीं आहेत. ह्या बाबतींत ब्रिटनचा अनुक्रम तिसरा लागतो. त्यानंतर इटली, भारत, स्पेन, कॅनडा, फ्रान्स व ऑस्ट्रेलिआ ह्यांचें अनुक्रम लागतात. अर्थात् धरणांच्या नुसत्या संख्येवरून गैरसमजूत होण्याचा संभव असतो. रशिआंतील कांहीं मोठीं धरणें १०० वर छोट्या धरणाइतकी वीज निर्माण करतात. रशिआचें स्टॅलिनग्रॅड येथील एकटेंच धरण ब्रिटनमधील सर्व विद्युत् धरणांच्या दुप्पट वीज निर्माण करते. (१९५८ चे आंकडे.) ह्या धरणाची कल्पना काढणाऱ्याचें नांव आतां त्याला नाहीं. लेनिननें कम्युनिझमची सुटसुटीत व्याख्या 'सोव्हिएट संघटना अधिक वीज अशी' केली आहे. ह्या कल्पनेचें स्मारक म्हणून हें धरण दाखवितां येईल. धरणांची उपयुक्तता ठरवितांना त्यापासून उत्पन्न होणाऱ्या विजेचीच फक्त कसोटी वापरावी असें नाहीं. कांहीं धरणें पाण्याचा सांठा करण्यासाठी बांधलीं जातात, तर कांहीं पुरावर नियंत्रण ठेवण्यासाठी बांधलीं जातात. कांहीं नदीच्या पात्रांतील वाहतूक सुधारण्यासाठी, तर कांहीं मच्छीमारीच्या धंद्यासाठीहि बांधलीं जातात.

### प्रचंड धरणें बांधणारी अमेरिका

धरणांचें महत्त्व मापण्याची कोणतीहि कसोटी घेतली तरी अमेरिका हा देश अजूनहि जगांतील सर्वांत मोठीं धरणें बांधणारा आहे. सध्यां अमेरिकेंत ८०० पेक्षा अधिक धरणें बांधलीं जात आहेत अगर त्यांचे नकाशे काढले जात आहेत. संख्येच्या बाबतींत भारताचा अनुक्रम अमेरिकेनंतर लागतो. भारतांत ३०० धरणांचें बांधकाम चालू आहे. नंतर जपानचा अनुक्रम लागतो. बहुतेक देश स्वतःचीं धरणें स्वतःच बांधतात. त्यामुळें बहुतेकांच्या स्वतःच्या बांधकामाच्या औद्योगिक संघटना आहेत. त्यांपैकी कांहीं संघटना तर परदेशांतून बांधल्या जाणाऱ्या धरणांसाठी टेंडर्स भरण्याइतक्या मोठ्या आहेत. आफ्रिकेंपुरतें पहावयाचें झाल्यास तेथें इटालिअन बांधकाम कंपन्यांना अधिक कामें मिळविण्यांत यश आलेलें आहे. ह्याचें कारण काय? ब्रिटिश आणि फ्रेंच एंजिनिअरिंग कंपन्या इटालिअन कंपन्यांशीं अलीकडे स्पर्धा करूं लागल्या आहेत. कांहीं ब्रिटिश कंपन्या असें म्हणतात कीं, इटालिअन लोक कमी वेतनावर काम करतात आणि त्यांची राहणीहि कमी प्रतीची आहे. म्हणून त्यांना स्वस्त काम करणें परवडतें. पण, ह्या म्हणण्यांत फारसें तथ्य नसावें. कारण आफ्रिकेंत बांधण्यांत येत असलेल्या धरणावरील ८० टक्के मजुरीचें काम स्थानिक लोक करतात; आणि त्यांचें वेतन सगळ्या परदेशीय कंपन्यांना सारखेंच स्वस्त पडतें. इटलींत बेकारी असल्यामुळें इटालिअन कंपन्यांतील कुशल कामगारांना व तंत्रज्ञांना आफ्रिकेंत कमी पगारावर राबवितां येतें, असेंहि ब्रिटिश कंपन्या म्हणतात. परंतु हेंहि कारण खरें नाहीं. युद्धोत्तर काळांत इटलीमधील बांधकामाचा उद्योगधंदा इतका झपाट्यानें वाढला कीं, युद्धकाळांतील हानि भरून काढण्यासाठी आवश्यक असलेलें सामर्थ्य तर त्यानें पैदा केलेंच; पण त्याहीपेक्षा अधिक सामर्थ्य त्याच्याजवळ शिल्लक उरलें. युरोपपेक्षां इटलींत विद्युत्शक्तीचा उपयोग अधिक प्रमाणांत करण्यांत येतो; परंतु विद्युत्शक्तीसाठी बांधावयाच्या धरणाच्या सोयीस्कर जागा मात्र संपत आल्या आहेत. परिणामीं इटालिअन बांधकाम कंपन्यांना देशाबाहेर कामें मिळविल्याशिवाय अन्य मार्गच राहिलेला नाहीं. इटालीमधील बांधकामांना पुरून उरतील अशा अनेक संघटना आज इटालींत आहेत. परदेशांत इटालिअन कंपन्या फक्त धरणें बांधण्याचीं कामें घेतात असेंहि नाहीं. इटालिअन कंपन्यांचे गट मध्यपूर्वेंतील देशांत, आफ्रिकेंत आणि दक्षिण अमेरिकेंत रस्ते, विमानतळ, बंदरें, शहरें, पूल इत्यादि अनेक प्रकारचीं कामेंहि करीत आहेत. आफ्रिकेंतील करीबा, व्होल्टा, कैनजी आणि रोशरीम हीं धरणें

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

दीपावलि शुभचिंतन



किर्लोस्कर

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.** किर्लोस्करवाडी, जि. सांगली

# दि कोल्हापूर शुगर मिल्स लि.,

## —कोल्हापूर—

★ **उत्कृष्ट दाणेदार साखरेचे** ★

महाराष्ट्रांत पहिल्या, अखिल भारतांत दुसऱ्या क्रमांकाचे

तसेंच

**रेक्टिफाइड व इतर स्पिरिट्स् आणि आतां—**

★ **ॲसेटिक ॲसिड** ★

यांचे निर्माते

दीपावलीनिमित्त आपल्या शुभेच्छा व्यक्त करीत आहेत.

एम. बी. लोहिया
जनरल मॅनेजर

मॅनेजिंग एजंटस्,
दि युनायटेड एजन्सीज प्रा. लि., कोल्हापूर.

मीलान शहरांतील एक कंपन्यांचा गट बांधीत आहे. इटालिअन कंत्राटदारांचें म्हणणें असें आहे कीं, इटालिअन कामगार कमी वेतनावर काम करण्यास तयार असतात हें तितकेंसें खरें नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी युरोपिअन कामगारांपेक्षा इटालिअन कामगारांचें वेतन कमी होतें. पण, आतां त्यांचे पगारहि सामान्यतः युरोपिअन कामगारांच्या बरोबरीचे झालेले आहेत. आस्वानच्या धरणामुळें इजिप्तमधील देवळांचे कांहीं प्राचीन अवशेष बुडून जाणार आहेत. तो तेथून हलवून उंच ठिकाणीं नेण्यासारख्या अवघड कामांतहि इटालिअन बांधकाम कंपन्या सहकार्य करीत आहेत. त्या ठिकाणीं इटालिअन कामगारांना आणि फ्रेंच, जर्मन आणि स्वीडिश कामगारांना सारखेंच वेतन मिळतें. फक्त अमेरिकन कामगारांना मात्र थोडेंसें अधिक वेतन मिळत असावें. इटालिअन लोक गैरसोयींच्या परिस्थितींत काम करण्यास तयार असतात हें म्हणणेंहि बरोबर नाहीं आणि तसें असलें तरी त्यामुळें कामाचा फायदाच होतो. इटालिअन कामगार हे देशाबाहेर जाण्यास मुळींच तयार नसतात. ते परदेशीं गेलेच तर कमींत कमी वेळांत अधिकांत अधिक कमाई करून स्वदेशीं परतण्याच्या हेतूनें जातात. म्हणून ते अधिक जोरानें आणि अधिक काळ काम करतात. अर्थात् त्यामुळें कामाचा उरक लवकर पडतो. दुसरें असें कीं इटालिअन कामगार हा आफ्रिकन मजुरांच्या खांद्याला खांदा लावून काम करण्यास तयार असतो. त्याच्या वागणुकींत निदान वरवर तरी वर्णश्रेष्ठत्वाची खूण दिसत नाहीं. अविकसित देशांचा आर्थिक विकास करण्याच्या कामांत इटालीला कांहीं विशेष स्थान आहे अशा विचारांचा प्रसार मिलान व रोममधील सरकारी नौकर आणि कंपन्यांचे जनतासंपर्क अधिकारी करीत असतात. उत्तर आफ्रिकेंत आणि मध्यपूर्वेत जेथें कामें चालू असतील तेथें इटालिअन लोक भूमध्य समुद्राच्या कांठाशीं राहणारे असल्यामुळें परके नाहींत असें भासविलें जातें. इतर ठिकाणीं इटाली ह्या देशानें वसाहतवादाचा पूर्वीच त्याग केला असल्याचें सांगण्यांत येतें. त्यामुळें इटालिअन लोकांच्या मदतीच्या मागें राजकीय हेतु नसतो असेंहि सांगण्यांत येतें. ब्रिटन आणि फ्रान्स ह्यांच्याशीं कंत्राटांच्या बाबतींत स्पर्धा करण्यांत ह्या धूर्ततेचा उपयोगहि होतो. पण अमेरिकन मदतीच्या बाबतींत ही गोळी लागू पडत नाहीं. एका इटालिअन कंत्राटदाराच्या मतानें नव्यानें विकास साध्य करणाऱ्या देशांत पैसे चारण्याच्या युक्तीनेंच कामें मिळवितां येतात. कांहीं वेळां कंत्राटाच्या रकमेच्या १० टक्केपर्यंत सुद्धां पैसा पेरावा लागतो.

### इटालिअन धरण कंपन्यांच्या अडचणी

पण, इटालिअन धरण बांधकाम कंपन्यांना कामें मिळविण्याच्या पद्धतींचा फारसा विधिनिषेध वाटत नाहीं. कारण, कामें मिळविण्याच्या तऱ्हा सर्व कंपन्यांना सारख्याच वापरतां येतात. धरणाच्या तऱ्हाच अलीकडे बदलत चालल्या आहेत आणि हीच त्यांची खरी अडचण आहे. आतांपर्यंत अमेरिकेबाहेर बांधण्यांत येणारीं सर्व धरणें मुख्यतः सिमेंटकॉंक्रीटचीं बांधलीं जात. प्रचंड खर्च येणारीं बहुतेक धरणें त्यांच्या बळकटपणासाठीं भव्यतेवर अवलंबून असत. पण, अलीकडे धरणांच्या भिंतींची रुंदी कमी करण्यांत येऊं लागली आहे. धरणांना विशिष्ट आकार देऊन बळकटी साधण्याचें व त्यांची किंमत कमी करण्याचें तंत्र प्रगत पावलें आहे. हें तंत्र वापरण्याच्या कामीं इटालिअन कंपन्या चांगल्याच वाकबगार झालेल्या आहेत. ह्याच्याउलट अमेरिकन धरण कंपन्या दगड आणि माती ह्यांचे प्रचंड थर पक्के करण्याचें तंत्र वापरतात. ह्या थरांच्या तोंडाला सिमेंट वापरण्यांत येतें; किंवा कांहीं धरणांत योग्य तितक्या पाण्याचा धरणाबाहेर निचरा करण्याची सोय करण्यांत येते. त्यामुळें धरण वाहून जाण्याची भीति राहात नाहीं. माती, दगड उचलून हलविण्यासाठीं लागणारीं मोठीं यांत्रिक अवजारें अमेरिका बांधूं शकते. त्यामुळें अमेरिकन कंपन्या मजुरींत बचत करूं शकतात आणि दगडामातीचीं धरणें बांधं शकतात. हीं धरणें त्यांत वापरण्यांत आलेल्या दगडामातीच्या केवळ वजनानेंच स्थिर राहूं शकतात. शिवाय अशीं धरणें कोठेंहि बांधतां येतात. अरुंद तोंडाच्या खिंडीची त्यासाठी आवश्यकता लागत नाहीं. पश्चिम पाकिस्तानांत मांगला येथें अशा प्रकारचें धरण बांधण्याचें काम एका अमेरिकन कंपन्यांच्या गटाला मिळालें आहे. ह्या धरणाची आखणी ब्रिटिश एंजिनिअर्सनीं केली आहे. धरणासाठीं १२·६ कोटी पौंड खर्च येणार आहे. कोणत्याहि आंतरराष्ट्रीय बांधकाम कंपनीला मिळालेल्या कामापेक्षा हें कंत्राट मोठें आहे. ह्या धरणाची नुसती घनताच छाती दडपून टाकणारी आहे. त्याचें बांधकाम ७·५ कोटी घनयार्ड होईल. बांधकामाची गति शिगेला पोंचली कीं, दर महिन्याला ४० लाख घनयार्ड माती आणि वाळू धरणाच्या बांधकामांत घट्ट रिचविली जाईल. गिझा येथील सर्वांत मोठ्या पिरॅमिडची घनता ३० लाख घनयार्ड आहे. धरणांत दर मिनिटाला लंडनमधील दुमजली बसइतका माल जागच्या जागीं बसविण्यांत येईल. अशा प्रकारचें धरण इटालिअन कंपन्याहि बांधूं शकतील. पण, आतांपर्यंत तरी सिमेंट कॉंक्रीटचीं धरणें बांधण्यांतच त्यांचा हातखंडा आहे.

# अमेरिकेंतील "महागाई" संबंधीं गैरसमज

पुणें येथील सोमाणी उद्योगसमूहाचे मालक व प्रतिभा प्लॅस्टिक इंडस्ट्रीजचे संचालक श्री. रामनाथ श्रीराम सोमाणी यांनीं अलीकडेच अमेरिकेचा दौरा पूर्ण केला व ते मायदेशीं परत आले. अमेरिकेशिवाय ते कॅनडा, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व स्वित्झर्लंड या देशांनाहि भेटी देऊन आले. या सव्वादोन महिन्यांच्या प्रवासांत त्यांनीं अमेरिका व युरोपमधील कारखाने, उद्योगधंदे आणि समाजजीवन पाहिलें. त्यासंबंधीं त्यांचे अनुभव उद्बोधक वाटण्यासारखे आहेत.

श्री. सोमाणी यांचा दौरा मुख्यतः त्यांच्या कारखान्यासाठी लागणारी आधुनिक यंत्रसामग्री खरेदीसाठी होता. त्याप्रमाणें त्यांनी बॅग मेकिंग मशीन, स्पेशल प्रोसेस प्रिंटिंग मशीन, तसेंच कंतान, कापड, कागद व बोर्ड यांस पॉलिथिन फिल्म चिकटविणारें मशीन, इत्यादि यंत्रांची खरेदी केली. पॉलिथिन बॅगज आणि त्यावर स्पेशल प्रिंटिंगचें काम करण्याचा कारखाना भारतांत त्यांचाच पहिला प्रयत्न आहे.

यंत्रांच्या खरेदीबरोबर श्री. सोमाणींनीं तिकडील समाजाचें जीवनहि बारकाईनें पाहिलें. त्यासंबंधीं त्यांना माहिती विचारली असतां ते म्हणाले, "अमेरिकेंतील राहणीचें मान, वस्तु, यंत्रें, फार महाग आहेत, अशी आपली कल्पना आहे. कारण आपण रुपयांत मिळवितों व डॉलरमध्यें खर्च करतों. (डॉलरची किंमत रुपयापेक्षा पावणेपांचपट अधिक आहे.) पण अमेरिकन माणूस डॉलरचें समीकरण त्याच्या श्रमामध्यें करतो. सर्वसाधारण अमेरिकन माणसाला ताशीं ३ डॉलर्स किंवा दर दिवसाला २४ डॉलर मिळतात.

एखाद्या कामगाराला शर्ट खरीदण्यास ३ डॉलर्स किंमत पडते आणि हे ३ डॉलर्स मिळविण्यास त्याला एकच तास काम करावें लागतें. आपल्याकडे मात्र एक शर्टची किंमत देण्यासाठी कामगाराला ५ दिवस काम करावें लागतें; म्हणजे जास्त मेहनत करून आपलें साध्य गांठावें लागतें.

मशिनरीच्या बाबतींतहि तसेंच म्हणतां येईल. तेथील मशिनरी भक्कम व मजबूत बांधणीची असते. त्यामुळें तिच्या रिपेअरीसाठी वरचेवर खर्च करावा लागत नाहीं.

रौप्यमहोत्सवी वर्षांतील बँकेच्या यशस्वी पदार्पणाचे प्रसंगीं बँकेचे सभासद, ठेवीदार व हितचिंतकांचें दीपावली शुभचिंतन !

# दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., जमखंडी

स्थापना : १९४० ] जमखंडी जि. विजापूर [ शाखा : बनहट्टी

( ३० जून १९६४ चे आंकडे )

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल | : रु. १,८३,८८० |
| गंगाजळी व इतर निधि | : रु. ४,२४,२५५ |
| ठेवी | : रु. २०,६८,७२९ |
| कर्जव्यवहारांतील गुंतवणूक | : रु. ८,५५,७८१ |
| सरकारी रोखे वगैरेंतील गुंतवणूक | रु. ६,५५,६१२ |
| ठेवींवरील व्याजाचे दर | : १ ते ६½% |
| कर्जावरील व्याजाचे दर | : ६ ते ९½% |
| डिव्हिडंड | : ६¼% |
| ऑडिट वर्ग | : 'अ' |

स्वतःच्या मालकीची ऑफिस बिल्डिंग व गोडाऊन्स, सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्‌ची सोय.

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

म. वृ. खाडिलकर, मॅनेजर. — श्री. म. अथणी, चेअरमन

आमचे ग्राहक, हितचिंतक, ठेवीदार व सभासदांस दीपावली व नूतन वर्ष आनंदाचें व समृद्धीचें जावो, ही प्रार्थना.

**********

महाराष्ट्र राज्यांत अग्रेसर असलेली नागरी बँक

# नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर

स्थापना : १९१० ] [ मुख्य कचेरी : अहमदनगर

: शाखा :

संगमनेर, श्रीरामपूर, वांबोरी, श्रीगोंदा, शेवगांव, बेलापूरगांव, पाथर्डी, नेवासा, जामखेड, मिरजगांव

| | |
|---|---|
| भाग भांडवल | रु. ५,४५,५८० |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | रु. ८,८०,८४८ |
| खेळतें भांडवल | रु. १,२३,५४,२३३ |

खास वैशिष्ट्यें

कार्यक्षेत्र :— संपूर्ण अहमदनगर जिल्हा.

कर्जपुरवठा :— औद्योगिक, विणकर व इतर संलग्न सोसायट्या.

सोयी :— सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय व खातेदारांना सर्व प्रकारच्या बँकिंगच्या सवलती दिल्या जातात.

झुं. सी. सारडा, चेअरमन. — ञ्यं. वि. निसळ, जनरल मॅनेजर.

व. रा. घूत, व्हाईस चेअरमन — पां. का. मुळे, मॅनेजर.

" नूतन वर्ष आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना सुखाचें जावो. "

सेवा – सहकार – सचोटी

हे आमच्या बँकेचे आधारस्तंभ होत.

# दि विटा मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि. विटें

स्थापना – १९३६ ] जिल्हा-सांगली [ ऑडिट वर्ग " अ "

— प्रगतीचें पाऊल —

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. २,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १,३२,८१० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २,०१,९१६ |
| ठेवी | रु. ११,२६,६१३ |
| खेळतें भांडवल | रु. १५,८१,५७८ |

– बँकेचीं वैशिष्ट्यें –

( १ ) बँकेनें अल्पावधींत बांधलेली स्वतःची भव्य इमारत.
( २ ) ठेवींवर आकर्षक व्याजाचे दर.
( ३ ) महाराष्ट्रांत प्रमुख ठिकाणीं चेक्स देण्याची व्यवस्था.
( ४ ) बँकेच्या स्वतःच्या इमारतींत बंदिस्त तळघरांत सभासदांचे व अन्य ग्राहकांचे मौल्यवान् जिन्नस, महत्त्वाची कागदपत्रें इत्यादि ठेवण्यासाठी अत्यंत अल्प खर्चांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची योजना.
( ५ ) बँकिंगच्या अन्य सौजन्यपूर्ण सवलती.

*लिहा अगर भेटा.*

स. वि. कोरे, प्रेसिडेंट. — व्ही. के. बोबडे, मॅनेजर. — च. ग. शहा, चेअरमन.

# दि आष्टा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., आष्टा.

र. नं. ९५१८ ] जिल्हा सांगली [ र. ता. २०–१–१९४७

सहकारी चळवळींत महाराष्ट्रांत अग्रेसर असलेल्या सांगली जिल्ह्यांतील वाळवे तालुक्यांत ग्रामीण भागांत स्थापन झालेली पहिली सहकारी नागरी बँक म्हणून ज्या बँकेचा नामोल्लेख करावा लागेल अशा बँकेंतील ता. ३०–९–१९६४ अखेरचे कांहीं आंकडे

| | |
|---|---|
| अधिकृत व वसूल शेअर भांडवल | रु. १,५०,००० |
| निधि | रु. ४०,००० |
| ठेवी | रु. ६,००,००० |
| गुंतवणूक | रु. १,४८,००० |
| कर्जे | रु. ६,००,००० |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० |
| ता. ३०–६–६४ चा निव्वळ नफा | रु. १८,४७५ |

बँकेंत सर्व प्रकारच्या ठेवी आकर्षक व्याजाच्या दरानें स्वीकारल्या जातात. अद्ययावत् बँकिंगचे व्यवहार केले जातात. दरासाठी समक्ष भेटा अगर पत्रव्यवहार करा.

एन. ए. रुकडे, मॅनेजिंग डायरेक्टर. — बापू रायगौंडा पाटील, चेअरमन.

# आर्थिक विकासाच्या मार्गांतील धोंड

## चलनवृद्धीचें स्वरूप व परिणाम

### सरकारच्या ठाम निर्धाराविषयीं खात्री पटली पाहिजे

अविकसित देशांतील सरकारवर त्याच्या द्रव्यविषयक धोरणा-संबंधीं गंभीर स्वरूपाची जबाबदारी असते. अप्रगत देशांतील मूलभूत स्वरूपाचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें ह्या धोरणाची आंखणी प्रामुख्यानें करण्यांत आली पाहिजे. अर्थव्यवस्थेच्या रचनेसंबंधींचे हे प्रश्न पुष्कळदा अतिशय चिंता उत्पन्न करणारे असतात. त्यांचें स्वरूप आनुषंगिक नसतें; मूलभूत रचनात्मक असतें. आधुनिक तंत्रप्रधान समाजांत योग्य तें स्थान मिळविण्या-साठी जें शिक्षण लागतें तें कमी प्रगत झालेल्या देशांतील बहुसंख्य लोकांना मिळालेलें नसतें. वस्तुस्थिति अशी आहे कीं अशा बऱ्याच देशांतून निरक्षर असलेल्या लोकांचा प्रश्नच गंभीर स्वरूपाचा झालेला आढळून येतो. रोगराईचा प्रतिबंध करण्याच्या साध्या संधीचा फायदा घेण्याची असमर्थता आणि निकस आहारानें उच्चाटन, ह्यासारखे प्रश्नसुद्धां पुष्कळदा चिंताजनक सामाजिक स्वरूप धारण करतांना दिसतात. झपाट्यानें बदलणाऱ्या समाजापुढें उभें राहणाऱ्या समस्या सोडविण्याच्या कामीं सरकारी संस्थांकडून करण्यांत येणारे प्रयत्न बऱ्याच वेळां अपुरे पडतात. लोकसंख्या वाढली आणि ती शहरांतून वाढू लागली म्हणजे आरोग्याच्या प्राथमिक सोयीसुद्धां कमी पडू लागतात. ग्रामीण भागांत राहत्या घरांचा जो किमान दर्जा मानला जातो त्यापेक्षा अधिक खर्च येणारीं घरें शहरांत बांधावीं लागतात. गतकालांत ज्या देशांची प्रगति सावकाश झालेली असते त्या देशांतील धंदेवाले एखादी नवी वस्तु करण्यासंबंधीं अगर वितरणाची नवी व्यवस्था आणण्यासाठी जी जोखीम घ्यावी लागते ती घेण्यास तयार नसतात. शिवाय, रस्ते, पूल, औद्योगिक शक्ति, इत्यादि सार्वजनिक उपयोगाच्या सोयींची व्यवस्था करणेंहि आवश्यक असते. अप्रगत देशांच्या ज्या सरकारांपुढें ह्या व अशा प्रकारचे इतर गंभीर प्रश्न उभे ठाकलेले असतील, त्यांनीं आपल्या द्रव्य-विषयक धोरणाचा मूलगामी विचार करणें आवश्यक आहे. असें केल्यानें अर्थव्यवस्थेच्या रचनेसंबंधींच्या पायाभूत अडचणींवर मात करतां येणें अधिक शक्य होतें. चलनवृद्धीसंबंधींसुद्धां अनेक प्रश्न विचारतां येण्यासारखे आहेत. विकास पावत असलेल्या देशांपुढील प्रश्न सोडविण्याच्या कामीं चलनवृद्धि मदत करू शकते काय ? चलनवृद्धि, वेगानें घडून येणाऱ्या विकासाचा अनिवार्य परिणाम आहे काय ? किंवा असेंहि विचारतां येईल कीं, चलनवृद्धीचे परिणाम इतके हानिकारक आहेत काय कीं, विकसित होणाऱ्या देशांच्या सरकारांनीं त्याविरुद्ध उत्साहानें लढलेंच पाहिजे ?

#### पार्श्वभूमि

वेगानें विकास घडवूं पाहणाऱ्या देशांत जरूरीच्या मानानें साधनसंपत्ति नेहमींच कमी असते; मग ती वस्तूंची असो अगर कुशल कामगारांची असो. विकास झपाट्यानें साधावयाचा असेल तर अंतर्गत उत्पादनापेक्षा अगर आयातीपेक्षा अधिक खर्च करण्याची प्रवृत्ति सर्वच समाजांत दिसून येते. समाज ह्या शब्दांत ह्या ठिकाणीं सरकार, व्यक्ति आणि धंदे ह्यांचा समावेश अभिप्रेत आहे. समाजांत ही प्रवृत्ति दिसू लागली कीं चलनवृद्धीची शक्यता उत्पन्न होते. करापासून मिळणारें उत्पन्न अगर लोकांच्या बचती-मधून मिळूं शकणारें कर्ज ह्यांच्यापेक्षा अधिक खर्च करण्याचें बंधन जेव्हां सरकार स्वतःवर लादून घेते तेव्हां ही परिस्थिति पुष्कळदा उद्भवते. उपलब्ध असणाऱ्या वस्तूंपेक्षा अगर सोयींपेक्षा अधिक वस्तु व सोयी विकत घेण्याचे प्रयत्न सुरू झाले कीं स्पर्धा सुरू होते आणि वस्तूंच्या किंमती वाढू लागतात. कुशल कामगारांचें काम मिळविण्याची स्पर्धा सुरू झाली कीं त्या कामगारांचे वेतनहि वाढूं लागते. मग, सरकारची इच्छा असो अगर नसो. पण उशिरानें का होईना सरकारलासुद्धां अधिक किंमती आणि अधिक वेतन द्यावें लागतें. पुष्कळदा हा खर्च त्याच्या कुवतीबाहेरचाहि असतो. एखाद्या विवक्षित वेळीं उपलब्ध असणाऱ्या वस्तूंच्या व सुखसोयींच्या उत्पादनाच्या खर्चापेक्षा अधिक पैसा खर्च करण्याचा प्रयत्न जोंपर्यंत लोक ( ह्यांत सरकार आलेंच ) करीत आहेत तोंपर्यंत किंमती वाढत जाण्याची प्रवृत्ति कायम राहते आणि चलनवृद्धि भासूं लागते. तथापि, किंमतींत झालेल्या सर्वच वाढी धोकादायक चलनवृद्धीच्या खुणा आहेत असें मात्र नाहीं.

#### चलनवृद्धीचा ताण


अन्नवस्तूंच्या किंमती एखाद्या हंगामांत पीक वाईट असल्यामुळें वाढू शकतील; पण, पुढील हंगामांत पीक चांगलें असल्यास किंमती उतरतात व परिस्थितीचा तोल सावरतो. ज्या चलनवृद्धीनें किंमती सतत एकसारख्या झपाट्यानें वाढतात अशी चलनवृद्धि मात्र चिंतेची बाब आहे. ह्या प्रकारच्या चलनवृद्धींत किंमती वाढल्या-मुळें उत्पन्नें वाढतात; पण त्याबरोबर पुरवठ्यांत मात्र वाढ होत नाहीं. मग किंमती सतत वाढतच जातात. अशा प्रकारच्या चलन-वृद्धीमुळें उत्पन्न होणारे प्रश्न पुष्कळदा इतके मोठे असतात कीं सरकारला विकासाची गति वाढवितां येणें अशक्यच होऊन बसतें. सामान्य विवेकबुद्धि आणि अनुभव ह्यांचाहि कौल असाच पडतो. एखाद्या देशानें चलनवृद्धीवर नियंत्रण ठेवण्याचे उपाय न योजतां झपाट्यानें विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला तर विकासाचा कार्यक्रम न आंखतां जितक्या वेगानें प्रगति झाली असती त्याहि-पेक्षा कमी वेगानें प्रगति झाल्याचें आढळून येण्याची शक्यता असते. तीव्र स्वरूपाची चलनवृद्धि चालूं राहिली, आणि वर्षानुवर्षें किंमती झपाट्यानें वाढत गेल्या, तर विकासाची गति मंदावेल आणि समाजरचनेवर अतिशय ताण पडल्याशिवायहि राहणार नाहीं. गेल्या कांहीं वर्षांत अशी उदाहरणें घडून आलेलीं आहेत आणि आजहि असे अनेक देश आहेत कीं, त्यांत अशा प्रकारचा ताण उघडपणें दिसत आहे. ब्राझिल आणि इंडोनेशिआ ह्या देशांत जिनसांच्या किंमती दरवर्षीं दुपटीपेक्षाहि अधिक वाढत आहेत. कांगोमध्यें किंमती वाढत आहेत, आणि दोन वर्षांपेक्षाहि कमी काळांत त्या दुपटीनें वाढतील असें दिसत आहे. अर्जेंटिना, चिली, कोलंबिआ, कोरिआ, युराग्वे ह्या देशांतूनहि किंमती दर तीन वर्षांच्या काळांत दुपटीनें वाढत आहेत. जगांतील जे अविकसित देश त्यांच्यापेक्षा अधिक सुदैवी असलेल्या देशांना गाठण्याचे प्रयत्न करीत आहेत, त्यांच्या सरकारांनीं चलनवृद्धी विरुद्ध उत्साहानें लढा देण्याचा निर्धार केला नाहीं तर तेथेंहि अशाच प्रकारची किंमतवाढ होणें अशक्य नाहीं.

### धोक्याचे इशारे

चलनवृद्धि मर्यादेपलीकडे झाली आहे, हें दर्शविणारे धोक्याचे दोन इशारे आहेत. एक, वेतन आणि किंमत ह्यांचा पाठशिवणीचा खेळ. राहणीचा खर्च जेव्हां झपाट्यानें वाढूं लागतो त्या वेळीं वेतनावर जगणारे आणि सेवानिवृत्त लोक प्राप्त परिस्थितींत समाधानी राहण्याचें नाकबूल करतात. त्यांना त्यांच्या उत्पन्नांत मधून मधून मोठ्या प्रमाणावर वाढ हवी असते; आणि त्यांचा ही मागणी न्याय्यहि असते. पण, मोठ्या प्रमाणावर वेतनवाढ झाल्यास खर्च वाढतो आणि पुन्हा किंमती वाढण्यास अनिवार्यपणें सुरुवात होते. लोकांचा पैशावरील विश्वास उडूं लागणें हा धोक्याचा दुसरा इशारा आहे. लोकांचे पैसे बँकेंतील ठेवींत असतात, विम्याच्या पॉलिसींत असतात, सामाजिक सुरक्षिततानिधींत असतात, सरकारी रोख्यांत असतात; अगर दुसऱ्या कांहीं रूपांत असतात. चलनवृद्धि मर्यादेबाहेर गेली कीं हचा पैशाचें वस्तु खरेदी करण्याचें सामर्थ्य घटत जातें आणि लोकांचा पैशावरील विश्वासच उडतो. मग अर्थातच पैसा अगर तत्समान इतर प्रकारची मालमत्ता घेण्याचें लोक बंद करूं लागतात. त्यामुळें देशाच्या सर्वच द्रव्यव्यवस्थेवर ताण पडतो. पैशाच्या रूपानें सरकार लोकांना जीं वचनें देतें त्याला अर्थ नाहीं असें त्यांना वाटूं लागतें. मग कामगार आधींच वाढलेल्या राहणीच्या खर्चाला तोंड देतां येईल इतकीच वेतनवाढ मिळण्यासाठीं लढा देत नाहींत, तर भविष्यकालांत राहणीच्या खर्चात जी वाढ होणें अपेक्षित असते तिला तोंड देण्याइतकी वेतन वाढ मिळण्यासाठी ते झगडा करूं लागतात. संप पसरूं लागतात आणि ते दीर्घ काल टिकतात. कामगार आणि मालकवर्ग ह्यांच्यांत संघर्ष सुरू होऊन राजकीय वातावरणांत कडवटपणा येतो. अशा परिस्थितींत बँकेंत पैसे ठेवणें, विम्यांत गुंतविणें अगर सरकारी रोख्यांत गुंतविणें हा मूर्खपणा आहे असें लोकांना वाटूं लागते. निरनिराळ्या प्रकारांनीं पैसे वांचवून आपला आणि आपल्या कुटुंबियांचा भविष्यकाल सुखकारक करण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं लोक त्यांच्याजवळ असलेला, बचत केलेला पैसा इतर मार्गांनीं खर्चून टाकूं लागतात.

### भांडवलाचा उलटा ओघ

एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवली पाहिजे. कोणत्याहि देशांतील बहुसंख्य लोकांना बचत करण्याचे फारच थोडे मार्ग उपलब्ध असतात. त्यांना बँकेच्या सेव्हिंग्ज खात्यांत पैसे ठेवतां येतात, विमा घेतां येतो, सोनें व परदेशी चलन घेतां येतें अगर स्थावर मालमत्ता घेतां येते. जे लोक स्वतःच आपआपल्या धंद्याचे मालक आहेत असे लोक सोडले तर इतर लोकांना ज्या मालमत्तेची किंमत वाढण्याची शक्यता आहे अशी इतर मालमत्ता विकत घेणें अवघड असते. बँका, सरकारी विकास बँका आणि विमा कंपन्या हीं सर्व एक महत्त्वाचें कार्य करीत असतात. व्यक्तीजवळ असलेल्या बचतीच्या छोट्या रकमा ह्या संस्था एकत्रित करतात आणि त्यामुळें उत्पादक गुंतवणूक करण्यासाठी लागणाऱ्या मोठ्या रकमा त्या उभ्या करूं शकतात. शिवाय ह्या पद्धतीमुळें आर्थिक दृष्ट्या बेताची कुवत असलेल्या लोकांना संरक्षण मिळतें. कुटुंबावर एखादी आपत्ति आली तर हे छोटे असामी आपल्या बचतीचा उपयोग करूं शकतात; किंवा वाटल्यास आपली व आपल्या कुटुंबाच्या भविष्यकालाची थोडीबहुत तरतूद करूं शकतात. पण, किंमती जर सारख्या वाढत असतील तर सर्व पैसे वरच्यासारख्या संस्थांच्या तो हवालीं करणार नाहीं. त्याला असें वाटेल कीं भविष्यकाल अतिशय अनिश्चित आहे; तेव्हां पैशाचा जो होईल तो उपयोग आतांच करावा आणि भविष्यकालाची

चिंता करण्याचें सोडून द्यावें; त्याची अशी प्रवृत्ति झाल्यास बचतींत घट होत जाते. किंवा त्यानें पैसे वांचविलेच तर तो सोनें अगर परदेशीय चलन घेऊन आपल्या भविष्यकालाची तरतूद करून ठेवील. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या १९६२ च्या वार्षिक अहवालांत असें म्हटलें आहे कीं गेल्या दशकांत आंतरराष्ट्रीय द्रव्य-विषयक व्यवहारांत कांहींशी दुर्दैवी प्रवृत्ति दिसून येत आहे. ज्या अविकासित देशांनीं चलनवृद्धि पत्करली आहे, त्या देशांकडून ज्या देशांतील चलनाला स्थैर्य आहे अशा देशांकडे खाजगी भांडवलाचा प्रवाह चालू झालेला आहे. वास्तविक भांडवलाचा प्रवाह विकासाच्या दृष्टीनें उलट दिशेनें जावयास पाहिजे. किंमती वाढतील अशी अपेक्षा असली तर लोक परदेशीय चलन विकत घेऊं इच्छितात. ज्या कारणासाठी ते असें करूं इच्छितात त्याच कारणासाठी परदेशीय लोक ज्या देशांत चलनवृद्धि आहे त्या देशांत पैसे गुंतविण्या-संबंधीं फारशी आस्था दाखवीत नाहींत. त्यांना अशी भीति वाटत असते कीं, परदेशीय हुंडणावळीचा भाव कमी झाल्यामुळें गुंतविलेल्या पैशांची किंमत घसरेल; त्यांची असा धोका पत्करण्याची तयारी नसते. ह्या परिस्थितीचा परिणाम असा होतो कीं चलनवृद्धि असलेल्या देशाच्या भांडवलांत घट होत जाते. विकास साधूं पाहणाऱ्या देशाला असें वाटतें कीं बाकीच्या जगानें त्यांत भांडवल गुंतवावें; पण, परिणाम मात्र असा होतो कीं, चलनवृद्धि असणारा देश बाकीच्या जगांत पैसे गुंतविणारा देश ठरूं लागतो. एखादी व्यक्ति स्थावर मालमत्ता विकत घेऊ-नहि बचत करूं शकेल. अशी व्यक्ति दुसऱ्या कोणाकडून तरी फक्त जमीन विकत घेत असेल तर ह्या व्यवहारापासून कांहीं विशेष गंभीर प्रश्न उत्पन्न होत नाहीं. पण, ज्या माणसानें आपली जमीन विकली असेल तो जमीन विकून आलेल्या पैशाचें काय करतो, हा मात्र महत्त्वाचा प्रश्न आहे. मोठ्या शहरांतून स्थावर मालमत्ता विकत घेतली जाण्याचा अर्थ बहुधा एखाद्या घराची अगर राहण्याच्या जागेची खरेदी असा असतो. घर अथवा राहण्याची जागा ह्यांच्याकडे आसरा ह्या दृष्टीनें एखादा माणूस पाहूं शकेल. पण, चलनवृद्धि चालू आहे तोंपर्यंत ज्याची किंमत वाढूं शकेल अशी ताब्यांतील मालमत्ता म्हणूनहि त्याकडे पाहतां येईल. आपल्या कुटुंबाला निवाऱ्याची जागा असावी म्हणून घराची अगर राहत्या जागेची खरेदी जशी करतां येईल, त्याच-प्रमाणें ती आपल्या भविष्यकाळाची तरतूद म्हणूनहि करतां येईल. असें करतांना माणूस त्याच्या दृष्टीनें आवाक्यांत असलेलें सर्वांत मोठें घर अगर राहती जागा विकत घेण्याचा प्रयत्न करील. म्हणजे असें कीं, विश्वसनीय बचतींचे दुसरे प्रकार उपलब्ध असते तर त्यानें जितकें जरुरीपुरतें घर अगर जागा विकत घेतली असती त्यापेक्षा अधिक मोठें घर अगर जागा तो विकत घेण्याचा संभव असतो.

## घरबांधणींत अवास्तव गुंतवणूक

ह्याचा अर्थ असा कीं चलनवृद्धि चालू असतां, एरव्हीं जितकी गुंतवणूक घरांत अगर बिऱ्हाडांत झाली असती त्यापेक्षा अधिक प्रमाणांत ह्या प्रकारच्या मालमत्तेंत गुंतवणूक होत जाते. ज्या साधनसंपत्तीचा उपयोग समाजाच्या गरजा भागविण्याचें सामर्थ्य वाढविण्यासाठी करतां आला असता तिचा उपयोग मोठी व विलासी घरें आणि राहत्या जागा बांधण्याकडे केला जातो. खरें म्हणजे हा साधनसंपत्तीचा दुरुपयोग आहे. कारण, लोकांना अशा प्रकारच्या राहत्या जागांची खरोखर गरज नसते. किंमती वाढण्याची अपेक्षा नसतांना समाजाला जें समाधान मिळालें असतें त्यापेक्षा अशा बांधकामापासून मिळणारें खरें समाधान कमी होईल. असें म्हणतां येईल कीं, आपल्या इच्छेपेक्षा अधिक मोठें घर बांधण्याऐवजीं ह्याच सामान्य माणसानें जर आपली बचत भाड्यानें देतां येण्यासारख्या छोट्या घरांत अगर राह-ण्याच्या जागेंत गुंतविली तर तें अधिक बरें होईल. पण, आधुनिक समाजांत ज्या वेळीं चलनवृद्धि होते त्या वेळीं सरकार ही संस्था सामान्य माणसाचें चलनवृद्धीच्या विपरीत परिणामापासून रक्षण करण्यासाठी उपाय योजते; आणि तें न्याय्यहि आहे. नफे-बाजापासून लोकांचें रक्षण करण्यासाठी सरकार भाड्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतें, हें आपण पाहतोंच. अशा प्रकारच्या नियंत्रणांचा एक परिणाम असा होतो कीं, भाड्यानें देण्यासाठी घर विकत घेणाऱ्या सामान्य व्यक्तीकडेहि ती व्यक्ति नफेबाज असल्यासारखें वागविण्यांत येतें. त्यामुळें अशा घरांची अगर गाळ्यांची परिस्थिति गुंतवणूक ह्या नात्यानें रोख्यांपेक्षा अगर विम्यापेक्षा अधिक चांगली राहात नाहीं. अनिश्चित भविष्य-कालासाठी थोडीशी तरतूद, असें स्वरूप ह्या गुंतवणुकीला येतें.

## वस्तूंचा सांठा करण्याची प्रवृत्ति

व्यक्तींकडून होणाऱ्या स्थावर मालमत्तेच्या संचयाप्रमाणेंच व्यापारधंदा करणारे लोकहि सांठेबाजी करतात. भविष्यकालांत किंमती आणि वेतनें ह्यांची वाढ होईल अशी त्यांची अपेक्षा असते. पण नुकत्याच गेलेल्या भूतकालांत त्यांची जितकी वाढ झाली त्यापेक्षा नजिकच्या भविष्यकालांत ती अधिक होईल किंवा कसें ह्यासंबंधीं निश्चिति नसते. किंवा त्या कमी वेगानें वाढतील काय, ह्या विषयींहि शंका असते. शिवाय, सरकार चलनवृद्धि थांबविण्याचे धैर्य दाखवील अशी शक्यताहि नेहमींच असते. लोक पापकृत्यांकडे ज्या दृष्टीनें बघतात त्याच दृष्टीनें सरकारें चलनवृद्धीकडे बघतात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. चलनवृद्धीला सरकारांचा विरोध असतो आणि टाळतां न येण्यासारखी वाईट गोष्ट म्हणूनच तीं चलनवृद्धीकडे पाहात असतात. शिवाय, वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी व्यापारधंदा करणाऱ्याला ज्या वाढत्या दरानें किंमती द्याव्या लागतील त्याच वेगानें त्या पदार्थाच्या विक्रीच्या किंमती वाढतील कीं नाहीं ह्याविषयीं त्याला शंका असते. त्याचप्रमाणें वेतनाच्या वाढत्या दराबद्दल, कामगारांना आपल्याच-कडे कामाला ठेवून घेण्यासाठी त्यांना द्यावा लागणाऱ्या बोनस-बद्दल किंवा चलनवृद्धीपासून कामगारांचा बचाव करण्यासाठी सरकारनें काढलेल्या हुकमांचें पालन करण्यासाठी येणाऱ्या खर्चाबद्दलहि त्याला अनिश्चितता वाटत असते. किंमती वाढणार असल्याबद्दल जरी त्याची खात्री असली तरी निकटच्या कालांत बाजार कसा राहील ह्याबद्दल त्याला कांहींच खात्री नसते. त्यामुळें भविष्यकालाविषयीं त्याचें मन अस्थिर असतें. तरीसुद्धां ज्या वस्तूंच्या किंमती वाढतील अशी त्याची अपेक्षा असते अशा कांहीं वस्तूंचा सांठा करून ठेवण्याची त्याची इच्छा असते. वस्तूंचा संचय करून त्याला ही गोष्ट करतां येते. पुढें लागणाऱ्या कच्च्या मालाची खरेदी तो करूं शकेल; किंवा ज्या मालाचें उत्पादन तो करतो त्या सर्वच मालाची विक्री करण्याच्या कामीं तो अनुत्साह दाखवूं शकेल. असें करण्यांत त्याच्या मालाच्या चालू किंमतीपेक्षा अधिक चांगल्या किंमती मिळूं शकतील अशी त्याची अपेक्षा असते. म्हणजे लोकांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी ज्या वस्तूंचा उपयोग करता आला असता त्यांचा उपयोग वस्तूंचा सांठा कर-ण्यासाठी करण्यांत येऊं लागतो; परिणामीं समाजहिताला बाधा पोंचते.

## सरकारी उपाय-योजना

भाड्यावर नियंत्रण ठेवण्याच्या उपायाप्रमाणेंच सामाजिक

## शेतकरी सहकारी संघ लि.
## कोल्हापूर

प्रमुख कचेरी : जुना राजवाडा, पोस्ट बॉक्स नं. २२१] कोल्हापूर फोन नं. १२५, ६२६ तार : शेतकरी

मुंबई शाखा : [२१७ सॅम्यूअल स्ट्रीट मांडवी मुंबई नं. ३. तार : कोऑपसंघ

| | | |
|---|---|---|
| शेअर्स भांडवल | रु. | ४ लक्ष |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | २५ लक्षांवर |
| खेळतें भांडवल | रु. | १ कोटीचेवर |

प्रगतिशील शेतकरी बैलछाप मिश्र खतेंच वापरतात.

ही दीपावली सर्व सहकारी बांधवांस सुखसमृद्धीची जावो, आणि त्यांचे अंतःकरणांत सहकाराची मंगल ज्योत प्रज्वलित राहो !

वि. शं. शिंदे नेसरीकर, कार्यकारी संचालक.
दा. गो. माने, अध्यक्ष.



चवदार पिठासाठी

## पिठाच्या चक्क्या

- बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
- मजबूत बांधणी
- अद्यावत् यंत्र योजना
- साईज१४", १६", १८"

फोन नं. १६९



उत्पादक–

## भिडे अँन्ड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.



धुळें जिल्हा सहकारी भू–विकास बँक लि., धुळें

*" ही दिपवाळी आमच्या शेतकरी बांधवांना सुखाची व समृद्धीची जावो !*

### धुळें जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचें एकमेव स्फूर्ति-स्थान

महाराष्ट्रांतील सर्व भू–विकास बँकांमध्यें अग्रेसर ठरलेली व सरकारची " अधिक धान्य पिकवा " मोहीम यशस्वी करून शेतीचा विकास व उत्पादन–वाढ यांना प्रोत्साहन देणारी

## " धुळें जिल्हा सहकारी भू-विकास बँक लि., धुळें "

★ संचालक मंडळ ★

(१) श्री. ग. तु. पाटील, एम. एल. ए., चेअरमन.
(२) श्री. द. भा. पाटील, व्हा. चेअरमन.
(३) श्री. त्र्यं. गं. पाटील, सभासद.
(४) श्री. मा. धं. पाटील, सभासद.
(५) श्री. ओ. सं. पाटील, सभासद.
(६) श्री. व. फ. अहिरराव, सभासद.
(७) श्री. रं. मा. पाटील, सभासद.

या बँकेनें ८ शाखा उघडून सहकाराची ज्योत तेवत ठेवली आहे. बँकेमार्फत इंजिन खरेदी, जमीन खरेदी, बंडींग, ट्रॅक्टर, विहीर खोदणें, जुन्या विहिरी दुरुस्त करणें, वगैरेसाठीं कर्ज दिलें जातें.

*ता. ३०/६/१९६४ अखेर*

| तपशील | | | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| (१) भाग भांडवल | ... | ... | रु. २६,८५,६९५ |
| (२) रिझर्व्ह फंड | ... | ... | रु. २,१८,३७१ |
| (३) इतर फंडस् | ... | ... | रु. ५०,०८९ |
| (४) मेंबरांकडील येणें कर्ज | ... | ... | रु. २,७९,४४,७७५ |
| (५) मुंबई लँड मॉर्गेज बँकेचे कर्ज | ... | ... | रु. २,५९,०९,०३० |
| (६) खेळतें भांडवल | ... | | रु. २,८८,६३,१८६ |
| (७) सन १९६३–६४ नफा | ... | ... | रु. ८६,१७४ |

*शेतकरी बांधवांनीं विहीर, एंजिन तगाई योजनेचा अधिकाधिक फायदा घ्यावा. आजवर या बँकेनें १३,००० शेतकऱ्यांना कर्जवांटप केलेलें आहे.*

सी. वि. राजे, व्यवस्थापक.
ग. तु. पाटील, एम. एल. ए., चेअरमन.

धुळें जिल्हा सहकारी भू–विकास बँक लि. धुळें.

दृष्ट्या महत्त्वाच्या वस्तूंच्या व सुखसोयींच्या किंमती नियंत्रित करूनहि सरकार चलनवृद्धीला आळा घालण्याचा प्रयत्न करूं शकतें. पण, ह्या उपायांचा रोख लक्षणांवर असतो; मूळच्या रोगावर नसतो. सामाजिक दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या वस्तूंच्या व सुखसोयींच्या उत्पादनाला सरकारनें जर आर्थिक मदत दिली नाहीं तर धंदा करणारे लोक त्यांचें उत्पादन करणार नाहींत. ज्या वस्तूंवर नियंत्रणें नाहींत त्या वस्तु निर्माण करण्याचे प्रयत्न करतील; ह्या वस्तु बहुधा फारशा महत्त्वाच्या नसतात. दुसरें असें कीं, कांहीं वस्तूंच्या किंमती नियंत्रित असतांना इतर वस्तूंच्या किंमती जर वाढत असतील तर नियंत्रित वस्तु खरेदी करण्याचें आकर्षण वाढतें आणि लोक त्या वस्तू अधिक प्रमाणांत खरेदी करण्याचे प्रयत्न करतील. अशा वस्तूंचा पुरवठा अपुरा आल्यास दुकानापुढें लोकांच्या रांगा लागतील, काळ्या बाजाराचा उद्‌भव होईल आणि ज्या वस्तु मिळण्याचा आपला हक्क आहे असें लोकांना वाटतें त्या वस्तु त्यांना न मिळाल्यामुळें सामाजिक असंतोषाचा सर्वत्र फैलाव होईल. ज्या देशांत वाहतूक व्यवस्था आणि सार्वजनिक सोयी ह्यांचा दर्जा खालावला आहे, त्या देशांत ह्यांपैकीं कांहीं प्रश्न तीव्र होतात. कारण, वाहातुकीचे व इतर दर नियंत्रित केलेले असतात आणि खर्चांत मात्र वाढ होत असते. अशा परिस्थितींत अर्थरचनेला असें कांहीं वेडेंवाकडें वळण लागतें कीं, तिची घडी पुन्हा बसविण्यासाठी कांहीं वेदना उत्पन्न करणाऱ्या योजना करणें आवश्यक होतें; तरच चलनवृद्धीला विराम देतां येतो. जरूरींच्या वस्तु उत्पादन करण्यासाठी सरकारनें जर आर्थिक मदत दिली तर मात्र हे प्रश्न उत्पन्न होत नाहींत. पण अशा मदतीमुळें सरकारच्या उत्पन्नावर खर्चाचा बोजा पडतो आणि योजनांचा विकास करण्यास पैसा अपुरा पडतो अगर तुटींच्या अर्थप्रकल्पाची कास धरावी लागते.

## आंतरराष्ट्रीय परिणाम

गंभीर स्वरूपाच्या चलनवृद्धीचे वाईट परिणाम फक्त देशांतील अंतर्गत व्यवस्थेपुरतेच मर्यादित राहात नाहींत. त्यामुळें कोणत्याहि देशाच्या आंतरराष्ट्रीय स्थानाचीहि घसरगुंडी होऊं लागते. एकसारख्या वाढत जाणाऱ्या किंमतीमुळें देशांतील पैशाचा प्रवाह परदेशीं जाऊं लागतो आणि परदेशीय भांडवल देशांत येण्यास प्रोत्साहन मिळत नाहीं हें वर दाखवून दिलेंच आहे; हें तर वाईट आहेच. पण चलनवृद्धीमुळें लोकांना परदेशांतून माल आयात करण्यास उत्तेजन मिळतें आणि माल निर्यात करण्याबाबत ते निरुत्साही होतात. देशांतर्गत किंमती वाढत असल्यामुळें, ज्या देशांतील किंमती स्थिर आहेत, त्या देशांकडून मालाची आयात करणें आकर्षक होऊं लागतें. अर्थातच देशांत निर्माण करण्यांत आलेला माल घेण्याऐवजीं लोक आयात केलेला माल घेऊं लागतात. त्याचबरोबर किंमती वाढत असतांना देशाच्या निर्यातीवर वाईट परिणाम होतो; कारण देशांतील मागणी निर्यातीच्या मालाकडे आकर्षित होते हें एक; आणि दुसरें म्हणजे परदेशीय बाजारपेठेंत निर्यातीचा माल विकणें त्यांच्या वाढत्या किंमतीमुळें फार खर्चाचें होतें. व्यापारांत उत्पन्न होणारी ही गैरसोय टाळण्याचा एकच मार्ग आहे. तो असा कीं, हुंडणावळीचा दर वाढत्या किंमतींइतक्याच अगर अधिक वेगानेंहि घसरूं देणें. परंतु हुंडणावळीच्या उतरत्या दरामुळें भांडवलाच्या निर्यातीस उत्तेजन मिळतें, व त्यामुळें चलनवृद्धि असलेल्या देशांपुढें गंभीर प्रश्न उत्पन्न होतो. हुंडणावळीचा दर जर घसरूं देण्यांत आला तर भांडवल देशाबाहेर पलायन करण्याची भीति असते; आणि तसें न करावें तर देशाची निर्यात कमी होते आणि आयातीची खरेदी अधिक होते. व्यवहारांत मात्र नेहमीं असें होतें कीं, कांहीं काळ हुंडणावळीच्या दराला आधार देण्यांत येतो आणि मग त्याची घसरण होऊं देण्यांत येते. मग नव्या खालच्या पातळीवर तो पुन्हा थोपवून धरण्यांत येतो. ह्या धोरणामुळें दोन्ही गैरसोयींचा मिलाफ करण्यांत येतो. किंमतीशीं तुलना करतां हुंडणावळीचा दर जोंपर्यंत आकर्षक असतो तोंपर्यंत आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांतील समतोलपणावर दाब राहतो. हुंडणावळीच्या दरांत बदल घडवून आणल्याचा अनुभव असल्यामुळें भांडवलाचे सावध मालक दरांत फेरबदल होण्याची अपेक्षा करीत राहतील. हुंडणावळीचा दर जोंपर्यंत चुकीच्या पातळीवर स्थिर करण्यांत आलेला राहील तोंपर्यंत आयातींत शक्य तितकी कपात करणें आवश्यक असतें. म्हणून आयातीवर अनेक प्रकारचीं बंधनें घातलीं जातात. पण ह्यामुळें उत्पादनाच्या प्रयत्नांना दुसरें अनिष्ट वळण लागतें. जो माल पूर्वी आयात केला जात होता त्याच्या उत्पादनासाठी साधनसंपत्ति निर्माण करावी लागते अगर असेल त्यांतून तिची व्यवस्था करावी लागते. चलनवृद्धि असलेल्या देशांना हें परवडणारें नसतें हें उघडच आहे. कारण हा माल देशांतच उत्पन्न करणें परवडणारें असतें तर तो पूर्वीच उत्पादन केला गेला असता. पूर्वी आयात करण्यांत येणाऱ्या मालाऐवजीं जो माल तयार करण्यांत येतो त्याच्या किंमती अर्थातच वाढत जातात. सर्वच अनिष्ट परिस्थिति जमून आली तर चलनवृद्धि अत्यंत वेगानें वाढत जाणें शक्य असतें. मग होणाऱ्या घडामोडीमुळें हुंडणावळीचा दर घसरूं लागतो आणि तसें होऊं लागल्यावर देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर नवीन दाब येऊं लागतो. आयातीसाठी अधिक किंमत द्यावी लागते आणि त्यामुळें देशांतर्गत किंमती चढ्या होण्यास आणखी मदत होते.

## हें थांबवितां येईल

चलनवृद्धीचा दोष सांचत जाणारा असला आणि त्याची गति झपाट्यानें वाढणारी असली तरी त्याचें निर्मूलन करतां येणें शक्य असतें. अर्थात् हें काम अवघड असतें आणि तें साध्य करण्याच्या प्राथमिक अवस्थेंत अर्थव्यवस्थेंत तात्पुरती अत्यावस्था माजणें शक्य असतें. पण, समजा कोणत्या तरी उपायांनीं चालू किंमतीपेक्षा अधिक असलेली खरेदीची शक्ति बाद करण्यांत आली तर किंमती अधिक वाढण्याचा दाब नाहींसा होईल. ही गोष्ट सरकारी खर्चाचा सरकारच्या उत्पन्नाशीं मेळ घालून अगर मागणीपुरवठ्यामधील तफावत भरून काढण्यासाठी लागणारी आयात करतां येण्याइतकी खरेदी परदेशांत करून करतां येईल. ह्या उपायांनीं गणितानें मोजतां येण्यासारखा परिणाम होईल. पण असा परिणाम झाला आहे असें लोकांच्या मनावर ठसल्याशिवाय त्याचा उपयोग होणार नाहीं. कांहीं कालपर्यंत लोकांना असेंच वाटत राहील कीं किंमती चढणार आहेत, आणि त्या अपेक्षेनेंच ते आपले व्यवहार करीत राहतील. परिणामीं किंमती स्थिर राहण्यास अडथळा उत्पन्न होतो. लोकांच्या मनांत किंमती वाढण्याचा काळ खरोखरी संपलेला आहे, अशी खात्री निर्माण करणें हें सरकारचें अतिशय कठीण आणि महत्त्वाचें काम आहे. ह्यांत पुन्हा अडचण निर्माण होते. कांहीं पदार्थांच्या व सुखसोयींच्या किंमती कृत्रिम रीत्या खालच्या पातळीवर ठेवण्यांत आलेल्या असतात. उदा. अन्न, वाहतुकीचे दर, विजेचे दर, इत्यादि. त्यांच्या किंमती वाढविणें भाग पडतें. पण सरकारच्या हेतूंच्या खंबीरपणाला किंमती वाढूं न देण्याच्या परिणामकारक उपायांचा पाठिंबा मिळाला तर त्याचा इच्छित परिणाम घडवून आणण्याच्या कामीं लवकर अगर उशिरां तरी चांगला फायदा होतो. चलनवृद्धीची

यंदाची दिवाळी आमचे हितचिंतकांना व सर्व सहकारी बंधूंना सुखाची व समृद्धीची जावो !

# कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर

मुख्य कचेरी : शिवाजी रोड, कोल्हापूर

तार : कोडिकोबँक ] स्थापना : १९३८ [ फोन नं. ३४२

सर्व थरांत विश्वासास पात्र, सहकारी व आर्थिक क्षेत्रांत आघाडीवर व रौप्यमहोत्सव साजरा करून उज्ज्वल यशाची मुहूर्तमेढ रोवलेली जिल्ह्यांतील एकमेव संस्था.

| | |
|---|---|
| (१) अधिकृत भांडवल | रु. १ कोटी |
| (२) खपलेलें भांडवल | रु. ८० लक्ष, ३६ हजार |
| सभासदांकडील | रु. ५८ लक्ष, ३६ हजार |
| सरकारनें घेतलेलें | रु. २२ लक्ष |
| (३) खेळतें भांडवल | रु. ७ कोटी, ८६ लक्ष |
| (४) रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. १३ लक्ष, ९ हजार |
| (५) ठेवी | रु. ३ कोटी, ५६ लक्ष |

नगरपालिका, जिल्हा परिषद व तत्सम संस्थांच्या ठेवी स्वीकारणेस सरकारची मान्यता असलेली.

आपली ठेव या बँकेंत ठेवून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला उत्तेजन द्याल अशी अपेक्षा आहे.

कोल्हापूर, ता.९-१०-६४ } मा. ह. भडभडे, जनरल मॅनेजर. व्ही. के. चव्हाण-पाटील चेअरमन.

# सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली

फोन नं. ३० तार : रयतबँक

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. | ५६,७३,१०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ७,६०,१३० |
| ठेवी | रु. | १,९३,३९,९८३ |
| खेळतें भांडवल | रु. | ४,४९,३७,८५९ |

(१) सांगली जिल्ह्यांत बँकेच्या १४ शाखा कार्य करीत आहेत.
(२) सरकारनें या बँकेचे रु. १४,५०,००० किंमतीचे शेअर्स घेतले आहेत.
(३) सहकारी संस्थांना शेतीचे गरजेसाठीं प्रामुख्यानें कर्जें दिलीं जातात.
(४) कायम ठेव द. सा. द. शे. ४ ते ५ टक्के व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.
(५) बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बाबासाहेब गोपाळराव पाटील
व्हा. चेअरमन

पंडित भाऊराव टाकवेकर
मॅनेजर

॥ दीपावली शुभेच्छा ॥

लक्ष्मीचा वरदहस्त

*दीपावली प्रसंगी पारंपरिक लक्ष्मीपूजनाबरोबर बेळगांव बँकेशी आपण व्यवहार सुरू करणें म्हणजे आजचे खरे लक्ष्मीपूजन ठरेल. त्यामुळे आपल्यावर सदैव लक्ष्मीचा वरदहस्त राहील.*

# दि बेळगांव बँक लि.

## बेळगांव

( स्थापना : १९३० ★ शेड्यूल्ड बँक )

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

खेळता निधी ३ कोटींहून अधिक

महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत एकूण ३४ शाखा

श्री. एच. एस. कुलकर्णी, मॅनेजर. एस. व्ही. कलघटगी, चेअरमन.

*बँकेचे सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांना नूतन वर्ष सुखाचें जावो !*

**********************************

सुवर्ण महोत्सव साजरा करणारी कोल्हापुरांतील पहिली आद्य सहकारी संस्था

# दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

( स्थापना सन १९१३ )

रजि. नं. १८३२२ ] [ फोन नं. ५०२

हेड ऑफिस :—५१४ वॉर्ड डी गंगावेस, कोल्हापूर.
शाखा :—१८५६ वॉर्ड ई राजारामपुरी ६ वी गल्ली, कोल्हापूर.

अधिकृत व खपलेलें

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. २,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. २,१३,३३५ |
| सभासद-संख्या | ४,६५६ |

सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात. रिकरिंग डिपॉझिट व दैनिक भिशीचे व्यवहार सुरू आहेत. सोने-चांदीचे जिन्नस, व्यापारी माल, व मुदत ठेवीचे तारणावर " ब " वर्ग सभासदांनाहि कर्जें देण्याची सोय आहे.

*बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.*

ए. ए. बोगार, मॅनेजर. दत्तात्रय नरहर कुलकर्णी, कणेरकर, प्रेसिडेंट.

चाल थांबविली जाते; किंवा तिचा वेग इतका कमी होतो कीं विकासाला असलेला धोका टळतो. पण एवढ्यानेंच संपत नाहीं. चलनवृद्धीमुळें विकासाला जी भलती दिशा लागलेली असते ती बदलतां येते. किंमती वाढत जाणार नाहींत, अशी लोकांची खात्री झाल्यावर पहिला दृश्य परिणाम असा होतो कीं, चलनवृद्धीमुळें ज्या प्रकारच्या गुंतवणुकीला जोर आलेला असतो, ती करण्यापासून लोक निवृत्त होऊं लागतात. तथापि, उत्पन्नें स्थिर झाल्यामुळें निर्माण झालेल्या नव्या परिस्थितींत योग्य अशा नव्या मालाला वाढती मागणी येईल हें लोकांना चटकन् कळूं लागतें; ह्या नव्या उत्पादनाची संघटना करण्यास वेळ लागतो आणि दरम्यान मालाची व रोजगारांची चणचण भासते. शिवाय, ज्या लोकांनीं मालाचा सांठा करण्याची जोखमी गुंतवणूक केलेली असते, त्यांना असें दिसूं लागतें कीं मालाच्या किंमतींत वाढ होऊन नफा मिळवत राहण्याचे दिवस संपलेले आहेत. आतां ह्या मालाचा सांठा करणें परवडणारें नसल्यानें ते लोक तो काढून टाकूं लागतात. निदान तसे प्रयत्न करतात. त्याचप्रमाणें जे लोक निर्यात होण्यासारखा माल निर्माण करीत होते आणि देशांतच विकत होते त्यांना ह्या मालाची मागणी बरीच कमी झाल्याचें आढळून येतें. निर्यात बाजारपेठांतून ते मागें पाऊल घेतात; कारण, देशांतील बाजारपेठेपेक्षा बाहेरची बाजारपेठ अधिक अनिश्चित असते. ज्या बाजारपेठा टिकवून धरणें कठीण असतें त्यांत पुन्हा प्रवेश करणें केव्हांहि अवघडच असतें. जें सरकार आपली अर्थव्यवस्था स्थिर पायावर उभी करण्याचे प्रयत्न करतें त्याला अशा प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावें लागतें.

### स्थैर्याशिवाय विकास कठीण

ह्या उपायांना दुसरा पर्याय म्हणजे चलनवृद्धि चालूच ठेवणें; पण हा मार्ग अधिकच वाईट आहे. आर्थिक वाढ होण्यासाठी ज्या दीर्घकालीन पैशाच्या गुंतवणुका कराव्या लागतात त्या स्थिरावलेल्या अर्थव्यवस्थेंतच करणें शक्य असतें. म्हणून ज्या उपायांनीं चलनवृद्धि संपुष्टांत येईल आणि आर्थिक जीवन स्थिर होईल असे उपाय सातत्यानें योजीत राहणें हें सरकाराचें अतिशय महत्त्वाचें कार्य आहे. कोणते उपाय योजावयाचे हें त्या त्या देशाच्या परिस्थितीवर अवलंबून राहील. पण तुटीचा अर्थसंकल्प न करणें, बचतीला उत्तेजन देणें आणि बँकांकडून देण्यांत येणाऱ्या कर्जावर नियंत्रणें ठेवणें, हे उपाय मात्र आवश्यकच आहेत. हे उपाय अमलांत आणणें सोपें नाहीं; पण आर्थिक विकास हें एक अवघड साध्य असून स्थैर्याशिवाय तें केवळ मृगजळ ठरण्याचा संभव असतो. एकदा प्राथमिक अडचणींवर मात केली कीं स्थैर्य अनुभवास येऊं लागून खऱ्या वाढीला प्रारंभ होतो. मग ह्या स्थैर्याच्या संधीचा फायदा घेणारे पैसे गुंतविणारे लोक लवकरच पुढें येऊं लागतात. द्रव्यविषयक स्थैर्याचे वातावरणांत विकासाचे कार्यक्रम अमलांत आणण्याचा सरकारचा ठाम निर्धार आहे अशी त्यांची खात्री मात्र झाली पाहिजे.

---

### पुनर्जन्मासंबंधीं संशोधन

माणसाला पुनर्जन्म असतो किंवा नसतो हा धार्मिक वादाचा प्रश्न आहे. तथापि पुनर्जन्माच्या विचारसरणीला पाठिंबा देणाऱ्या ३०० घटना आतांपर्यंत उपलब्ध झालेल्या आहेत. व्हर्जिनिआ विद्यापीठांतील एक मानसशास्त्रज्ञ डॉ. आर्यन स्टीव्हेन्सन ह्यांनीं ह्या सर्व प्रकरणांची शास्त्रीय पद्धतीनें छाननीहि केलेली आहे. ह्यासंबंधीं भारतांत संशोधन झालेलें नाहीं.

एक महत्त्वाचा निवाडा

## कारखान्यांतील कॅन्टीनमधील कामगार कारखान्यांतील कामगार होय.

### त्या कामगारांच्या विम्याच्या फंडाचा आपला हिस्सा कारखान्याच्या चालकानें भरला पाहिजे.

सिरपूर, कघाझनगर येथील सिरसिल्क लिमिटेड या कारखान्यांत एक कँटीन होतें. कायद्याप्रमाणें तें कॅन्टीन कारखान्यांत ठेवण्याची कारखान्याच्या चालकांवर सक्ति होती. कॅन्टीनकरितां लागणारें भांडवल कारखान्याचे चालक पुरवीत असत. सामान्यतः कॅन्टीनमधील कामगार नेमण्याचें काम कारखान्याच्या चालकांकडे असे आणि त्या चालकांच्या हुकुमतीखालीं ते कामगार काम करीत असत. तसेंच कॅन्टीनला लागणारीं भांडीं आणि फर्निचर कारखान्याचे चालकच पुरवीत असत.

या कॅन्टीनच्या कामगारांच्या विम्याच्या फंडाचा आपला हिस्सा कारखान्याच्या चालकानें भरावा असा हुकूम एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स कार्पोरेशनच्या रिजनल डायरेक्टरनें दिला. हा हुकूम पाळण्याचा प्रसंग आपणावर येऊं नये, या हेतूनें चालकवर्गानें तें प्रकरण हैदराबादच्या इन्शुरन्स कोर्टाकडे नेलें. एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स कायद्याखालीं कॅन्टीनमधील कामगार कारखान्यांतील कामगार होत, आणि म्हणून चालकवर्गानें त्या कामगारांच्या विम्याच्या फंडाचा आपला हिस्सा भरला पाहिजे असा निकाल इन्शुरन्स कोर्टानें दिला.

या निकालावर कारखान्याच्या चालकवर्गानें एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स कायद्याच्या क. ८२(२) खालीं हायकोर्टांत अपील केलें.

हायकोर्टांत चालकवर्गातर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, कारखान्यांतील कॅन्टीन ही स्वतंत्र संस्था असून तिचा कारभार कॅन्टीन कमेटीकडे होता. तसेंच कारखान्याशीं कॅन्टीनचा संबंध नसून त्याचा हिशेबहि वेगळा ठेवण्यांत येत असे. असें असल्यामुळें कॅन्टीनमध्यें काम करणारे कामगार कारखान्याचे कामगार नव्हते, आणि म्हणून त्या कॅन्टीनमधील कामगारांच्या विम्याच्या फंडाचा हिस्सा भरण्याची कारखान्याच्या चालकवर्गाला आवश्यकता नाहीं. हा युक्तिवाद हायकोर्टानें मान्य केला नाहीं.

एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स कायद्याच्या क. २ (९) मध्यें 'कामगार' या शब्दाची व्याख्या दिली आहे. तिचा आशय पुढीलप्रमाणें आहे :—

"ह्या कायदा लागू असणाऱ्या कारखान्यांत अथवा कारखान्याच्या कामाच्या संबंधांत मजुरीवर घेतलेला कोणताहि इसम 'कामगार' होय."

कारखान्यांत कॅन्टीन चालविणें ही कारखान्याच्या कामांपैकींच एक बाब आहे. कारण कारखान्यांतील कामगारांच्या फराळाची व्यवस्था करून त्यांची क्षुधाशांति करून कॅन्टीन त्या कामगारांचें कामांतील प्रावीण्य वाढवीत असतें. कारखान्यांत कॅन्टीन बांधणें कायद्यानें कारखान्याच्या चालकवर्गावर सक्तीचें केलें आहे. असें असल्यामुळें कॅन्टीनमध्यें काम करीत असलेले कामगार कारखान्याच्या कामाशीं संबंध असलेले काम करणारे इसम होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. अर्थात् कॅन्टीनचे कामगार हे कारखान्याचे कामगार होत आणि त्या कामगारांच्या विम्याच्या फंडाचा आपला हिस्सा कारखान्याच्या चालकवर्गानें भरला पाहिजे.

वरीलप्रमाणें निकाल देऊन हायकोर्टानें कारखान्याच्या चालकवर्गाचें अपील नामंजूर केलें.

(१९६४ ऑ. इं. रि. आंध्र प्रदेश, १९६४.)


# प्रत्येक आघाडी अटीतटीने लढवा







दिवाळी म्हणजे दुर्जनांवर सज्जनांची, असत्यावर सत्याची मात! आपणहि परकीय आक्रमकांवर व आपल्या अंतर्गत उणीवांवर विजय मिळवून समृद्धीच्या आणि भरभराटीच्या दिशेने वाटचाल करूंया. दुप्पट जोमाने काम करण्यासाठीं आपण स्वतःला वाहून घेऊंया; आणि खर्चात काटकसर करून आपली बचत राष्ट्रक्षणाच्या आणि प्रगतीच्या कारणीं लावूंया!



**प्रगतीचा नंदादीप सतत तेवत ठेवा!**

**जयहिंद**

महाराष्ट्र सरकारचे प्रसिद्धी संचालक, मुंबई.


[ स्थापना १९२१ ]

## गरगट्टी अँड सन्स

शहापूर–बेळगांव

धोबी, फॅमिली व शिंपी

पेटंट इस्त्रीचे कारखानदार



आमचे ग्राहकांस हें वर्ष सुखाचें जावो!


'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

# प्रत्येक आघाडी अटीतटीने लढवा





दिवाळी म्हणजे दुर्जनांवर सज्जनांची, असत्यावर सत्याची मात! आपणहि परकीय आक्रमकांवर व आपल्या अंतर्गत उणीवांवर विजय मिळवून समृद्धीच्या आणि भरभराटीच्या दिशेने वाटचाल करूंया. दुप्पट जोमाने काम करण्यासाठीं आपण स्वतःला वाहून घेऊंया; आणि खर्चात काटकसर करून आपली बचत राष्ट्ररक्षणाच्या आणि प्रगतीच्या कारणीं लावूंया!



**प्रगतीचा नंदादीप सतत तेवत ठेवा!**

**जयहिंद**

महाराष्ट्र सरकारचे प्रसिद्धी संचालक, मुंबई.



[ स्थापना १९२१ ]

## गरगट्टी अँड सन्स

शहापूर–बेळगांव

धोबी, फॅमिली व शिंपी

पेटंट इस्त्रीचे कारखानदार



आमचे ग्राहकांस हें वर्ष सुखाचें जावो!

# बँकिंगच्या कलेची कसोटी

## कर्जदाराला अडचणींतून बाहेर काढणें, हेंच खरें बँकिंग

" माझ्या सबंध आयुष्यांत मी एकही कर्ज बुडीत केलें नाहीं; चेक परत पाठवून मी अवखळ कर्जदारांना वठणीवर आणतों " अशी फुशारकी मारणाऱ्या बँकरला आज तरी कुणी विशेष मान देणार नाहीं. अवखळ कर्जदार नसतील तर, बँकर तज्ज्ञ असण्याची आवश्यकताच नाहीं. एकही कर्ज बुडीत होऊं न देणारा बँकर बहुमोल अनुभवाला मुकत असतो, हेंच खरें.

कर्जदाराच्या पतीबद्दल बँक आणि कर्जदार ह्यांचेमध्यें मतभेद असला म्हणजे तें खातें अवघड होऊन बसतें. प्रत्येक वेळेला कर्जदाराचें म्हणणेंच चुकीचें नसतें; बँकांमध्यें स्पर्धा चालते त्याचा फायदा पतवाला घेऊं शकतो. एका बँकेनें नकार दिला तरी दुसरी एखादी बँक सढळ हातानें कर्ज देऊं शकते.

### दृष्टिकोणांत फरक

एका बँकेनें नाहीं म्हटलें परंतु दुसऱ्या बँकेनें होय म्हणून कर्ज दिलें, अशीं उदाहरणें वरचेवर घडतात. एका मोठ्या बँकेकडे एका कारखान्याची ५०,००० रु. ची ओव्हरड्राफ्टची मर्यादा होती. ही मर्यादा कारखानदाराला अपुरी पडत होती. एकदां कारखान्याच्या मॅनेजिंग डायरेक्टरला बँकेचें पत्र आलें, " ५०,००० रु. ची मर्यादा ओलांडून तुम्हीं ५०० रु. आणखी काढले आहेत; त्याची ताबडतोब व्यवस्था करा. " मॅ. डायरेक्टरनें दुसऱ्या बँकेकडे जाऊन आपली व्यथा सांगितली आणि त्या बँकेनें डिबेंचरच्या तारणावर २,५०,००० रु. चा ओव्हरड्राफ्ट मंजूर केला; तिला कधींच पश्चात्तापाची पाळी आली नाहीं. कर्जदाराच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज सर्व बँकांचा बहुधा सारखाच असतो, परंतु दृष्टिकोणांत फरक पडतो.

दुसरी बँक कर्जाचें खातें मिळविण्याचा प्रयत्न करीत असली, एका कामासाठी दिलेलें कर्ज कर्जदार दुसऱ्या कामासाठी वापरीत असला, कर्जदार खेळत्या भांडवलाच्या मानानें जास्त धंदा करीत असला, एखाद्या विशिष्ट धंद्याला मंदी आली, म्हणजे त्या अडचणी निर्माण होतात. बँकांत स्पर्धा असेल, त्या वेळीं कर्जदाराबद्दल शक्य तेवढी माहिती मागवून आपलें मत बनविणें आणि तें कायम राखणें, हेंच इष्ट ठरतें; दुसऱ्या बँकेचें मत अधिक श्रेयस्कर मानणें मूर्खपणाचें आहे. कर्जदाराचें बँकेंतील खातें, त्याचप्रमाणें त्याच्या धंद्याचें ताळेबंद आणि हिशेब ह्यांवरून पुष्कळसें समजूं शकतें.

बँक मॅनेजरनें आपलें मत घाईनें बनवूं नये; परंतु त्याला चौकशीअंतीं कर्जदाराचा धंदा समाधानकारक नसल्याचें आढळलें, तर त्यानें काय करावें? कर्जाची सर्व रकम ताबडतोब भरण्यास सांगण्याची चूक करूं नये; असा तगादा हानिकारकच ठरेल. मुलाची वाढ फार झपाट्यानें होत आहे, म्हणून त्याचें अन्न तोडलें तर काय होईल? बहुधा कर्जदार मर्यादा वाढवून मागील. ती वाढवून दिली नाहीं, तर आधीचें कर्ज धोक्यांत यावयाचें; ह्या उलट आणखी कर्ज दिलें तर आधींच्या कर्जाबरोबर नवें कर्जहि बुडावयाचें. आणखी तारण मागणेंहि निरर्थक ठरायचें. कर्जदार म्हणजे लिमिटेड कंपनी असली तर बँक डिबेंचरची मागणी करूं शकेल—आधींच बँकेकडे डिबेंचर नसेल तर, वर्ग केलेलें असेल. तर इतर घेणेकरी तगादा करतील आणि आणखी कर्ज द्यावयाचें तें कंपनीच्या धंद्याच्या वाढत्या गरजा भागविण्यास पुरे पडून शिवाय ह्या तगाददारांमध्यें विश्वास निर्माण करण्यासहि पुरें पडलें पाहिजे.

### हिशेबाच्या पत्रकांची छाननी

बँकेकडे डिबेंचर असो वा नसो, कर्जदार कंपनीकडून बँकेनें मासिक, त्रैमासिक हिशेबाचीं पत्रकें मागविलीं पाहिजेत. ही पत्रकें कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं किंवा कंपनीच्या ऑडिटरांच्या देखरेखीखालीं किंवा विशेष परिस्थितींत बँकेनें नियुक्त केलेल्या अकौंटंटच्या देखरेखीखालीं तयार करण्यांत यावीत. त्यावरून कर्जदाराच्या धंद्याची प्रवृत्ति लक्षांत येऊं शकते. ही प्रवृत्ति असमाधानकारक असल्याचें आढळलें, तर बँक मॅनेजर त्याच्या कारणाविषयीं चौकशी करूं शकतो. ही हिशेबाचीं पत्रकें अडचण दर्शवितील, पण त्यांतून मार्ग कसा काढावयाचा, हें दाखवूं शकणार नाहींत. बँकेच्या कर्जाची रकम मोठी असेल, तर ती एखादा तज्ज्ञ अकौंटंट छाननीसाठी नियुक्त करते. अशा छाननीच्या आधारें बँका निर्णय करतात—कंपनी गुंडाळण्याची कारवाई करावयाची कीं काय? ज्यानें आपली सबंध हयात धंदा उभारण्यांत आणि वाढविण्यांत खर्च केली, पण आतां अडचणींत आला, अशाला " बँकेनें रिसीव्हर नेमण्याचें ठरविलें आहे " असें सांगणें बँकमॅनेजरला कठीण जातें; परंतु कर्तव्यकठोर होणें प्राप्त झाल्यावर तो तरी काय करणार?

कोणत्या परिस्थितींत रिसीव्हर नेमला जावा? खोटी बातमी पुरवून बँकेची फसवणूक करण्यांत आली आहे, फार मोठें नुकसान आल्यामुळें कंपनी पुढें चालविणें अशक्य आहे, डायरेक्टरांत भांडणतंटा असून सर्वसम्मत धोरण ठरवितां येत नाहीं, डायरेक्टर बोर्डालाच शेवट दिसूं लागला असून बोर्डच तसा ठराव करते, अशा वेळीं रिसीव्हरची नेमणूक क्रमप्राप्तच होते. पण जी कंपनी अडचणींत आहे पण तगूं शकेल, तिच्या बाबतींत काय करावें? कित्येक वर्षें धंदा कमी कमी होत चालला असून पूर्वस्थितीला तो येण्याची शक्यता नाहीं, कंपनीनें आवांक्याबाहेर धंदा केला आहे, पण आणखी एक-दीड लाख रुपयांचें कर्ज मिळालें तर खूप भरभराटीस येईल? आज धंदा बंद केल्यानें बँकेला येणारें नुकसान, बारा महिन्यांनीं किंवा पांच वर्षांनीं पूर्ण परतफेडीची शक्यता, त्याचप्रमाणें जास्ती नुकसान येण्याचाहि संभव, ह्यांतून बँकेनें काय पत्करावें?

नीट देखरेख केली, व्यवस्था नीट पाहिली तर आज असमाधानकारक असलेला धंदा नीट पायावर उभा राहील आणि चांगल्या किंमतीला विकतां येईल, अशा परिस्थितींत काय करावें? बँकेच्या अकौंटंटच्या द्वारां नियंत्रण ठेवणें हा एक मार्ग आहे. रिसीव्हरची नेमणूक हा मार्ग नवे नवे प्रश्न निर्माण करतो; त्यामुळें नव्या काळज्या उत्पन्न होऊं शकतात. पण, अशक्यप्राय शिखर चढण्यांत गिर्यारोहकाला जसा आनंद वाटतो, तसाच अवघड अडचणीवर मात करण्यांत मॅनेजरला वाटतो. बँकेला येणारें संभाव्य नुकसान टाळण्यांतला आनंद कांहीं औरच असतो. कर्जदाराची नादारातून सुटका करणें, हीच बँकिंगच्या कलेची कसोटी होय. कर्जदाराला स्वतःचें हित जेवढें समजतें, त्याहीपेक्षा बँकमॅनेजरला तें अधिक जाणता येण्याचा हा प्रश्न आहे.

॥ एकमेका साहाय्य करूं अवघे धरूं सुपंथ ॥

शेती विकास व ग्रामीण औद्योगिक विकासाकरितां सातत्यानें झटणारी एकमेव संस्था

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड

आपले

ठेवीदार, भागीदार व हितचिंतकांना यंदाची दीपावली सुखाची व समृद्धीची जावो अशी हार्दिक सदिच्छा व्यक्त करते.

चेअरमन : श्री. शामराव कदम

बँकेची आर्थिक स्थिति

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १००·०० लाख |
| वसूल भांडवल | रु. ४१·६८ लाख |
| ठेवी | रु. ९७·८७ लाख |
| गंगाजळी | रु. ५·१३ लाख |
| वाटलेलीं शेती व इतर कर्जें | रु. २३३·०० लाख |
| गुंतवणूक | रु. २८·०८ लाख |
| खेळतें भांडवल | रु. ३१०·२० लाख |

ठेवीचे आकर्षक दर

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| सेव्हिंग्ज खातें | ३ टक्के |
| स्पेशल सेव्हिंग्ज खातें | ३½ टक्के |
| कायम मुदतीच्या | ३½ टक्के ते ५½ टक्के |

बँकिंगचे सर्व व्यवहार–बिले वसुलीस घेणें व पाठविणें, ड्रॉफ्ट विकणें, मेल ट्रॅन्स्फर, सहकारी संस्थांना कॅश क्रेडिट, मालतारण, नजर गहाणावर पैसा पुरविणें असें व्यवहार करते. सेवेची संधि द्यावी.

वा. न. संत
मॅनेजर



★ ही दिवाळी आमचे सभासदांना, खातेदारांना व हितचिंतकांना सुखाची जावो ★

अल्पावधींत आम जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली

आणि

उत्तरोत्तर प्रगतिपथावर असलेली

# जनता सहकारी बँक लिमिटेड, सांगली

( कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली )

फोन नं. २४४ ] रजिस्टर नं. २४०९८ [ पोस्ट बॅग नं. ९८

ऑडिट वर्ग 'अ'— शाखा : मार्केट यार्ड —फोन नं. ४८४

प्रगतिपथावरील बोलके आंकडे ( दि. ३०–६–६४ अखेर )

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. ५,००,००० | एकूण ठेवी | रु. १५,०१,५५२ |
| वसूल शेअर भांडवल | रु. २,२५,६५० | एकूण खेळतें भांडवल | रु. ४०,९७,५२० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | रु. ७६,१७५ | एकूण वार्षिक उलाढाल ( Turnover ) | रु. ७,९७,४९,२४५ |

संपूर्ण सेवा ] —: खास वैशिष्टयें :— [ संपूर्ण सुरक्षितता

ज ) आकर्षक व्याजाचे दरानें सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
न ) बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
ता ) बँक सुरुवातीपासून २ टक्के डिव्हिडंड देत आहे.


एस्. एस्. पांड्याजी, मॅनेजर — आ. वसंत रावजी पाटील, व्हा. चेअरमन — एम्. एस्. कराळे, चेअरमन

## माझगांव येथील गोदीचा विस्तार

माझगांव येथील गोदीचा विस्तार करण्याच्या कामासाठी ब्रिटननें ४७ लाख पौंडांचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. भारताच्या नौदलांतील बोटी सर्वच ब्रिटिश बनावटीच्या आहेत. त्यांपैकीं बहुतेक आतां जुन्या झाल्या असून त्यांच्याऐवजीं नव्या बोटींची आवश्यकता आहे. माझगांव येथील गोदीचा विस्तार करण्याच्या कामासाठी सुमारें १३ लाख ६६ हजार पौंड खर्च करावे लागणार आहेत. हें काम पुरें होण्यास १० वर्षांचा अवधि लागेल. ब्रिटनचें नौदल आणि भारताचें नौदल ह्यांच्यांतील जुने संबंध लक्षांत घेऊन भारताला नव्या बोटी बांधणें शक्य व्हावें ह्या हेतूनें ब्रिटननें ही मदत देऊं केली आहे. मदतीचा उपयोग पहिल्या चार वर्षांत करावयाचा आहे. विस्ताराच्या कामांतील प्रगति पाहून आणखीहि मदत देण्याचा विचार ब्रिटन करणार आहे. ब्रिटनकडून मिळणारें हें संरक्षण-कर्ज आहे.

## कोळसा खाणींचें एकत्रीकरण

ज्या कोळसाखाणी चालविणें आर्थिकदृष्ट्या परवडत नाहीं त्यांचें दुसऱ्या खाणींशीं सक्तीनें एकत्रीकरण करण्यासाठी लोकसभेंत एक बिल मांडण्यांत येणार आहे. ते बहुधा अंदाजपत्रकी अधिवेशनांत मांडण्यांत येईल. अशा आंतबट्ट्याच्या खाणींचें स्वेच्छेनें एकत्रीकरण करण्याची योजना सरकारनें चालू केली होती. खाणींत दरमहा किमान ६,००० टन कोळशाचें उत्पादन झालें पाहिजे अशी अट मूळ योजनेंत होती. ती पुढें सरकारनें शिथिल केली होती. परंतु तरीहि खाणींच्या एकत्रीकरणांत फारशी प्रगति झाल्याचें सरकारला आढळून आलें नाहीं. त्यामुळें आतां सक्तीच्या एकत्रीकरणाची योजना अंमलांत आणण्यांत येणार आहे. कमी दर्जाच्या कोळशाचा वापर करून वीज-उत्पादन करणाऱ्या औष्णिक वीज केंद्रांचीच उभारणी ह्यापुढें करण्याचा सरकारचा विचार आहे.

दीपमाळ ही अुजळुनि आली दीपातुन अेका
अेकच होता वृक्ष तयाला फुटल्या शत शाखा।
तुमच्या प्रेमें वृक्ष फुलावा, अुजळाव्या ज्योती
मंगल दिवशीं फक्त शुभेच्छा या अमुच्या हातीं ॥

दीपावली शुभचिंतन !



बँक ऑफ महाराष्ट्र लि.
तुमची जिव्हाळ्याची बँक
आपल्या ९१ शाखांनिशीं तुमच्या सेवेस सिद्ध
6410



श्री. वा. काळे ह्यांचीं


★ कौटुंबिक व सामाजिक पुस्तकें ★

| | |
|---|---|
| कण आणि क्षण | रु. ३ = ५० |
| पुढें पाऊल | रु. २ = ०० |
| तुमचें स्थान कोणतें ? | रु. २ = ०० |
| दाणे आणि खडे | रु. ३ = ०० |
| कौटुंबिक हितगुज | रु. ३ = ०० |
| जयां अंगीं मोठेंपण | रु. ३ = ०० |

★ अभिनव पुस्तक मंदिर, पुणें ४. ★



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting



MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

## सरदारगृह

मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठीं सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दी दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

कुटुंबाचें आरोग्य व सुखशांतीकरितां

'नैसर्गिक' जीवनसत्त्वें असलेलें

सँडो ब्रँड ( रजिस्टर्ड ) ॲगमार्क

## शुद्ध व साजूक तूप

अवश्य वापरा.

## दीपावलीकरितां अन्नदात्यांस अभिवादन.

म. गो. कुलकर्णी,

फडतरे चौक, पुणे.

## रिगल बेकरी

डेक्कन जिमखाना, गोखले चौक, पुणें नं. ४

आमचेकडे सँडविच, ब्रेड, खारा माल व पेस्ट्रीज, जॅम्स, सरबतें, बिस्किटें, कन्फेक्शनरी व इतर तदनुषंगिक माल मिळेल.

प्रोप्रायटर — एस. एस. कुलकर्णी

## चितळे बंधु
## मिठाईवाले

श्रीखंड, बासुंदी, पेढे, बर्फी, गुलाबजाम, जिलेबी

मेवा-मिठाई व लोणी, चक्क्यासाठी सुप्रसिद्ध.

कुंटे चौक, पुणें २.

बाजीराव रोड, बँक ऑफ महाराष्ट्रसमोर पुणें २

डेक्कन जिमखाना, पुणें ४.

## दि बारामती अर्बन को-ऑ. बँक लि., बारामती

ही दीपावली बँकेचे सभासद, खातेदार व हितचिंतक यांना आनंदाची व सुखाची जावो.

खं. म. खंडागळे,

मॅनेजर.

राष्ट्रीय आणीबाणीचे प्रसंगीं राष्ट्रीय संरक्षणाची दुसरी आघाडी ( शेती व उद्योग ) मजबूत करण्याचे दृष्टीनें सक्रिय प्रयत्न करणारी औरंगाबाद जिल्ह्यांतील एकमेव सहकारी संस्था

## औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., औरंगाबाद

टेलिफोन नं. ४५३ — तारेचा पत्ता

पो. बॉ. नं. ३ — सहकार बँक

*बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.*

*बँकेची सर्वसामान्य माहिती : ३०सप्टेंबर १९६४*

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४५·३६ लाख |
| एकंदर निधि | रु. | ५·१३ लाख |
| खेळतें भांडवल | रु. | ४०४·१० लाख |
| एकूण ठेवी | रु. | १३७·०६ लाख |
| एकूण दिलेलीं कर्जें | रु. | ३१६·८० लाख |

-: ठेवींचे दर -

| | |
|---|---|
| चालू खातीं | ½ टक्का |
| सेव्हिंग्ज खातीं | ३ टक्के |
| मुदती ठेवी | ३½ ते ५ टक्के |

वर दर्शविलेल्या ठेवीवरील आकर्षक व्याजानें ठेवींचें प्रमाण दिवसें-दिवस वाढत आहे. बँकेंत ठेवी ठेवून आपणसुद्धां वरील व्याजाच्या दराचा लाभ घ्यावा अशी विनंती आहे.

केंद्र कार्यालय

गांधी चौक, औरंगाबाद

शाखा :—जालना, वैजापूर, सिल्लोड, कन्नड, पैठण, गंगापूर, भोकरदन, सोयगांव, अजिंठा, जाफाबाद, अम्बड, फुलंब्री, लासूर स्टेशन, बडिगोद्री, खुलताबाद, पाचोड, बनोटी, बदनापूर, नागद, पारध, औराळा, बिडकीन, शिउर, पिशोर, भराडी, औरंगाबाद तालुका, रांजणी, टेम्भुर्णी.

डी. ए. कुलकर्णी, बी. ए., एच. डी. सी., मॅनेजर.

रा. चिं. पाटील, एम. एल. सी. चेअरमन.

## भोर स्टेट बँक लि. चा विक्रम

### भागीदारांना भरलेल्या भांडवलाच्या एकूण दीडपट तरी रक्कम मिळण्याचा संभव

भोर स्टेट बँक लि. या बँकेच्या भोर, पुणें, शिरवळ, पाली अशा चार ठिकाणीं शाखा होत्या. ही बँक जुलै, १९६२ पासून स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेंत संचालक मंडळीनीं नोकर-चाकरांसह विलीन केली.

संचालक मंडळांत सर्वश्री म. व्यं. शिंगरे, य. द. खोले, नाना-साहेब थोपटे, गोविंददास देवी, बाबाराव धंडुके, ही मंडळी होती. त्यांत श्री. म. व्यं. तथा काकासाहेब शिंगरे, बँक विलीन करीपर्यंत कित्येक वर्षें चेअरमन होते.

जुलै, १९६२ पासून या बँकेचा व्यवहार स्टेट बँक ऑफ इंडिया पाहात असून, फक्त जून, १९६४ अखेरच दोन वर्षें तो पाहणेंचें ठरविलें होतें. परंतु भोर बँकेचे सर्व व्यवहार सरळ व समाधान-कारक असल्यामुळें, बँकेचे पूर्वींचे संचालक मंडळानें रिझर्व व स्टेट बँक ऑफ इंडियाचे अधिकारी मंडळींकडे विनंति केल्यामुळें एकंदर परिस्थितीचा विचार करून त्यांनीं आणखी दोन वर्षें (१-७-१९६६) पर्यंत सदर व्यवहार पाहण्याची मुदत वाढविली आहे.

**भागभांडवल**—स्टेट बँक ऑफ इंडिया भोर स्टेट बँकेच्या भागीदारांना सप्टेंबर १९६४ पासून तूर्त पहिला हप्ता म्हणून शेंकडा ८०टक्के भागभांडवल परत करीत आहे. पूर्वींचे संचालकांकडे चौकशी करतां, अद्याप बऱ्याच रकमा वसूल होत आहेत व होणार आहेत, सबब त्या मानानें यापुढील हप्तेहि आणखी ७०।८० टक्के (म्हणजे शंभराचे एकूण १५०।१६० रुपये) मिळून भाग भांडवलाच्या भरलेल्या रकमेच्या दीड पटीनें तरी एकूण रक्कम परत मिळेल अशी त्यांनीं प्रबळ आशा व्यक्त केली.

अशा तऱ्हेचा अत्यंत चोख व सचोटीचा व्यवहार या छोट्याशा भोर स्टेट बँकेनें गेलीं १८ वर्षें केला.

---

### हिंदी तंत्रज्ञांना आफ्रिकेंत मागणी

हिंदी तंत्रज्ञांना परदेशांतील सरकारांकडून मागणी येत असते. त्यांच्या मागण्यांचा विचार करून हिंदी तंत्रज्ञांची पाठवणी करण्याचें कार्य करण्यासाठी भारत सरकारनें स्वतंत्र विभाग उघडला आहे. आतांपर्यंत नेपाळ, नायजेरिआ, इथिओपिआ इत्यादि देशांना गरज लागली तेव्हां तंत्रज्ञ पाठविण्यांत आले. परंतु अलीकडे हिंदी एंजिनिअर्स, शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ इत्यादींना परदेशांतून अधिक प्रमाणावर मागणी येऊं लागली आहे. आशिआ वा आफ्रिका ह्या खंडांतील ज्या देशांत भारताचे राजदूत आहेत त्यांच्यामार्फत त्या त्या देशांच्या तंत्रज्ञ माणसांच्या गरजा अजमावण्याचें व त्या शक्य तितक्या पुऱ्या करण्याचेंहि प्रयत्न करण्यांत येत आहेत.

### कोलार येथील सोन्याच्या खाणी

कोलार येथील सोन्याच्या खाणींतील कामाच्या पद्धतींची पाहणी करून त्यांत सुधारणा सुचविण्यासाठी तज्ज्ञांची एक समिति लवकरच तेथें जाणार आहे. खाणीच्या चालकांना सल्ला देणारी ब्रिटिश कंपनी ह्या कामीं सहकार्य देणार आहे. त्याशिवाय भारत सरकारचे कांहीं तज्ज्ञहि खाणींची तपासणी करण्यासाठी जाणार आहेत. कोलार येथील खाणीमधील सोन्याच्या उत्पादनाचा खर्च इतर देशांतील खाणींशी तुलना करता बराच अधिक आहे. ह्या खाणींनीं १९६३-६४ सालीं ३४ लाख, ३८ हजार ग्रॅम सोन्याचें उत्पादन केलें. त्यामागील वर्षी सोन्याचें उत्पादन ३९ लाख, ६७ हजार ग्रॅम झालें होतें. खाणींत अपघात झाल्यामुळें उत्पादन घटलें, असें म्हणतात.




शास्त्रज्ञ डॉ. प्रफुल्लचंद्र राय यांनीं सर्टिफिकेट दिलेलें रुचकर आणि स्वादिष्ट



मुखशुद्धीचें

**चमन**

**चिमूटभर तोंडांत टाकतांच मुख सुगंधमय होतें.**

बाटली किंमत १ रुपया

*याचे सेवनानें तहान भागून आवाज खुलतो; करितां वक्ते, गवई, नटनटी, वगैरे लोकांना अत्यंत उपयोगी आहे. चमन तोंडांत टाकतांच लाळेबरोबर मिश्र होऊन श्वास सुगंधित होतो. लहान थोरांस, तसेंच गरोदर स्त्रियांनाहि उपयुक्त.*

इंग्लिश औषधें आणि अत्तरें बनविणार

**स्टार कंपनी, बेळगांव**

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा**

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः-युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

सेव्हिंग्ज बँक:-३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष-४½ टक्के, २ वर्षे-४¾ टक्के, ३ वर्षे-४¾ टक्के, ४ वर्षे-५ टक्के, ५ वर्षे-५½ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा-विस्तार

शाखा-१. मुंबई-फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर-मार्केटयार्ड, ११. इलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१-१२-१९६३

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ४,००,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., *जनरल मॅनेजर.*

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी *चेअरमन.*

**With Compliments**

***From***

# Konkan Stevedoring Company

**Belgaum**

# बार्शी सेंट्रल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना १९०६

हेड ऑफिस : बार्शी ( जि. सोलापूर )

( शाखा : वैराग )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ३,००,००० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | १,४५,५९० |
| रिझर्व्ह फंडस् | रु. | २,४०,३३४ |
| ठेवी | रु. | २१,२१,३२३ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २७,४३,२३७ |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

व. ह. उटगीकर
B. Com.
मॅनेजर

रा. गो. टिळक
ॲडव्होकेट
चेअरमन

# दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२९

★

| | | |
|---|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : | रुपये सहा लाख |
| खेळतें भांडवल | : | रुपये एक कोट |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : | रुपये सात लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुदतीच्या ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

| | | | |
|---|---|---|---|
| ९१ दिवस | ४¼% | ३ वर्षें | ५¾% |
| ६ महिने | ४½% | ४ वर्षें | ६% |
| ९ महिने | ४¾% | ५ वर्षें | ६¼% |
| १ वर्ष | ५¼% | ६, ७, ८ वर्षें | ६½% |
| २ वर्षें | ५½% | ९ व अधिक वर्षें | ६¾% |

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था

बँकेच्या शाखा : सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

के. डी. शिराळकर
मॅनेजर

श्री. एन्. पी. कानिटकर
ॲड्व्होकेट, चेअरमन

# दि बँक ऑफ कराड लि.

रजिस्टर्ड ऑफिस : १५ रविवार पेठ, कराड

श्री. ना. बा. बुधकर, B. A., LL. B., चेअरमन.
श्री. म. रा. देशपांडे, व्हा. चेअरमन

शाखा :
मुंबई, पुणें, सातारा, इस्लामपूर, तासगांव व विटें

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ५,४१,००० |
| रिझर्व्हज् | रु. | १,७३,००० |
| ठेवी | रु. | ८६,००,००० |
| इन्व्हेस्टमेंट्स ( सरकारी कर्जरोखे, वगैरे ) | रु. | २६,३८,००० |

मुदत ठेवः—६ महिने ते ९ वर्षेपर्यंत मुदतीच्या ठेवीचे दर :—द. सा. द. शें. ४ ते ६½ पर्यंत.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

म. वि. खंडकर,
जनरल मॅनेजर.

कराड, तारीख २९-१०-६४

कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., पेण.

—कुलाबा जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचें केन्द्रस्थान—

# कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

मुख्य कचेरी–पेण

व

१३ शाखांद्वारा, जिल्ह्याचे आर्थिक उन्नतीसाठी आपल्यापरीनें

जनतेची सेवा करीत आहे.

★

द. दि. तोतडे,
मॅनेजर

ना. य. नेने
चेअरमन

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

म्हणोनि सद्भाव जीवगत । बाहेरि दिसती फांकत ॥
स्फटिक गृहींचे डोलत । दीप जैसे ॥ —श्रीज्ञानेश्वरी

कै. चंद्रशेखर गोविंद आगाशे यांनीं स्थापिलेल्या व अहर्निश कष्ट करून वाढविलेल्या या साखर कारखान्याची सतत वाढ होण्यासाठीं संचालक मंडळ सदैव प्रयत्न करीत आहे.

स्पिरिटच्या नवीन मोठ्या मशिनरीच्या इरेक्शनच्या कामास सुरुवात झाली असून डिसेंबरमध्यें वाढत्या उत्पादनास सुरुवात होईल व स्पिरिटचें वार्षिक उत्पादन बारा लाख गॅलनपर्यंत होईल.

येत्या हंगामाचे साखरेच्या उत्पादनास नोव्हेंबरमध्यें सुरुवात होईल

आमचे ठेवीदार, भागीदार व हितचिंतक यांना दिवाळी व नूतन वर्ष सुखसमृद्धीचें व भरभराटीचें जावो.

गो. श्री. वाळिंबे, बी. कॉम.
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

शं. ल. लिमये, बी. एस्सी., एलूएल्. बी.
अध्यक्ष.

SCG-1 HIN

# नहीं –
# यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नवल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ४०८१२

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.